रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १६५ | पृष्ठे १० | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल
रायगड, शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५
किंमत ४ ₹

## हिंदी-मराठी वादातून तरुणाची आत्महत्या

**मुंबई :** लोकल प्रवासात हिंदी-मराठी झालेल्या वादातून १९ वर्षीय अर्णव खैरे या विद्यार्थ्याला मराठी बोलता येत नाही का? मराठी बोलण्याची लाज वाटते का?, असे बोलत काही तरुणांनी बेदम मारहाण केली. डोंबिवली ते ठाणे दरम्यान ही घटना घडली. झालेल्या मारहाणीमुळे अर्णव मानसिक तणावात होता. याच तणावातून या विद्यार्थ्याने कल्याणमध्ये आपल्या घरी येऊन गळफास घेत आत्महत्या केली. अर्णव खैरे (१९) असे या मयत विद्यार्थ्याचे नाव आहे. याप्रकरणी कोळशेवाडी पोलीस ठाण्यात अर्णवचे वडील जितेंद्र यांनी जबाब नोंदवला असून पोलीस याप्रकरणी पुढील तपास करत आहेत. दरम्यान, पान २ वर

इलेक्ट्रीशिअन पाहिजे
साई-इन हॉटेल, मुक्काम चोंढी, अलिबाग रेवस रोड येथे इलेक्ट्रीशिअन पाहिजे. सुस्वभावी, निर्वसनी. अर्जासह समक्ष भेटा

## अलिबागच्या पर्यावरणस्नेही उद्योजिका

# विद्याताईंनी घेतला अखेरचा श्वास





| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

अलिबागकरांसह देशविदेशातील पर्यटकांच्या जीभेचे चोचले पुरविणाऱ्या मयुर बेकरीच्या संस्थापक तथा पर्यावरण संवर्धनाचा विचार फक्त शब्दांत नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून जगभर पसरवणाऱ्या अलिबागच्या पर्यावरणस्नेही उद्योजिका विद्याताई वसंत पाटील यांचे बुधवारी (दि.२०) सकाळी ८.३० वाजता पुणे येथे निधन झाले.पर्यावरण संवर्धनाचा विचार फक्त शब्दांत नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून सर्वत्र पसरवणाऱ्या अलिबागच्या पर्यावरणस्नेही उद्योजिका

### पार्थिव अलिबागमध्ये अंत्यदर्शनासाठी

पाटील कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे पार्थिव दुपारी ४ वाजता अलिबाग येथील त्यांच्या निवासस्थानी आणण्यात आले. अंत्यदर्शन झाल्यानंतर सायंकाळी त्यांच्यावर रामनाथ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

विद्याताई वसंत पाटील यांचे आज सकाळी ८.३० वाजता पुणे येथे निधन झाले. त्या ७८ वर्षांच्या होत्या.

अल्पशा आजारानंतर त्यांनी अखेरचा श्वास घेतल्याची माहिती पाटील कुटुंबियांनी दिली. विद्याताई पाटील यांनी पर्यावरण संवर्धनाचा विचार आपल्या आयुष्याच्या सुरुवातीपासून जपला. त्यांचे जीवनकार्य हे फक्त व्यवसायापुरते मर्यादित नव्हते; तर त्यांनी जाणीवपूर्वक पान २ वर

## वेधक

### महिलेने केली शेजाऱ्याची हत्या

**विरार :** वसई, विरारमध्ये भीषण पाणीटंचाई भेडसावू लागली आहे. पाणी भरण्यावरून रहिवाशांमध्ये रोज भांडणे होत आहेत. विरारच्या जे.पी. नगर परिसरात तर हा वाद एवढा पेटला की, संतापाच्या भरात महिलेने डासांचा स्प्रे तोंडावर मारून शेजाऱ्याची हत्या केल्याची घटना मंगळवारी रात्री घडली. उमेश पवार असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव असून याप्रकरणी कुंदा तुपेकर या महिलेला पोलिसांनी अटक केली आहे. विरारमधील जेपीनगर भागात अनेक गृहसंकुले असून तेथे पालिकेच्या सार्वजनिक नळावरून नागरिकांना पाणी भरावे लागते. पाण्याचा दाब कमी असल्याने अनेकदा नळावर गर्दी होते, रांगा लागतात. त्यातून वादही होतात. शेजारी राहणारे उमेश व कुंदा यांच्या कुटुंबात नेहमी खटके उडायचे. क्षुल्लक कारणावरून सुरू झालेले भांडण एवढे वाढत गेले की, कुंदा हिने घरातून डास मारण्याचा स्प्रे आणला आणि तो थेट उमेश यांच्या तोंडावर मारला.

### लग्नाच्या प्रलोभनातून लैंगिक अत्याचार

**पनवेल :** सांगलीत राहणाऱ्या एका तरुणाने तळोज्यातील २७ वर्षीय तरुणीवर लग्नाच्या भूलथापा देत वर्षभर लैंगिक अत्याचार केले आहेत. तळोजा पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तळोजा येथे राहणारी पीडित तरुणी २०२४ मध्ये सांगली जिल्ह्यात जत येथे गेली होती. यावेळी जत एसटी बस स्टँडवर आरोपी प्रसाद माळीशी ओळख झाली होती. या ओळखीचे प्रेमात रुपांतर आरोपीने पीडितेला लग्नाचे प्रलोभन दाखवले. त्यानंतर अनेकदा पीडितेसोबत शारीरिक संबंध ठेवले होते. त्यामुळे पीडित तरुणी दीड महिन्यांची गरोदर होती. आरोपीने तिला गर्भपात करण्यास भाग पाडले तसेच लग्नाला स्पष्ट नकार दिला होता. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तळोजा पोलिसांकडे लेखी तक्रार दाखल केली.

# ६ तरुण पर्यटकांचा अंत



| माणगाव | सलीम शेख |

- महिंद्रा थार दरीत कोसळल्याने सहा ठार
- पुण्याहून कोकणात पर्यटनासाठी येणाऱ्या तरुणांचे मृतदेह दोन दिवसानंतर दरीत सापडले
- माणगाव ताम्हिणी घाटातील भीषण दुर्घटना

कोकणातील पर्यटन आणि निसर्गसौंदर्य अनुभवण्यासाठी पुण्याहून निघालेल्या सहा तरुणांचा प्रवास मृत्यूच्या दरीत कोसळून अंत झाला. पुणे उत्तम नगर येथून १७ नोव्हेंबर रोजी रात्रीचे सुमारास कोकणात महिंद्रा कंपनीची थार गाडीतून कोकणात निघालेल्या तरुण पर्यटकांच्या गाडीला ताम्हिणी घाटातील कोंडेथर गावाजवळ अपघात झाला. अतिअवघड वळणावर ५०० फूट खोल दरीत थार क्र. एमएच. १२ वायएन ८००४ ही कार कोसळून झालेल्या भीषण अपघाताने रायगड जिल्हा आणि पुणे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या अपघातात प्रथम शहाजी चव्हाण (वय २२ वर्षे रा. दत्त मंदीराचे जवळ, भैरवनाथ नगर, कोंढवे धावडे पुणे), पुनित सुधाकर शेट्टी (वय २० वर्षे रा. पाण्याचे टाकीजवळ, कोपरेगाव, उत्तमनगर पुणे), साहिल साधू बोटे (वय २४ वर्षे रा. कोपरेगाव, उत्तमनगर पुणे), महादेव कोळी (वय १८ वर्षे, रा. कोपरेगाव शाळेमागे, भैरवनाथ नगर, पुणे), ओंकार सुनिल कोळी (वय १८ वर्षे रा. कोपरेगाव शाळेमागे, भैरवनाथ नगर, पुणे), शिवा अरुण माने (वय १९ वर्षे रा. पुणे) या सहा तरुण पर्यटकांचा मृत्यू झाला असून या सहाही पर्यटकांचे मृतदेह बाहेर काढून माणगाव उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.

पुण्यातील१८ते२४वयोगटातील सहा तरुण १७ नोव्हेंबरच्या मध्यरात्री पुण्याहून पर्यटनासाठी कोकणात येत होते. ताम्हिणी घाटातील कोंडेथर येथे उताराचा धोकादायक भाग असून या वळणावर लोखंडी पान २ वर

### रेस्क्यू टीमचा संघर्ष

झाडीतून मृतदेहांपर्यंत पोहोचणे अवघड होते. माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, महामार्ग वाहतूक शाखेचे अधिकारी, माणगाव तहसीलदार व त्यांचे महसूल कर्मचारी, रोहा येथील सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानचे समर्पण रेस्क्यू टीम तसेच आपत्ती व्यवस्थापन दल यांनी संयुक्तपणे ३०० फुटांच्या दरीत उतरत जीवघेणा शोध सुरू केला. या मृतदेहाजवळ पोहोचण्यासाठी झाडे-झुडपे कापत रस्ता तयार करून, उंच दगडी, तीव्र उतार पार करत रेस्क्यू टीम मृतदेहांपर्यंत पोहोचली. दुपारी ३.१५ वाजण्याच्या दरम्यान दरीतील झाडात विखुरलेल्या अवस्थेत सहाही तरुणांचे मृतदेह मिळाले.

### ड्रोनच्या मदतीने तपास

दरीत सर्वत्र घनदाट झाडी असल्याने मानवी दृष्टी पोहोचणे शक्य होत नव्हते. ड्रोनच्या मदतीने गाडीचे भाग, मृतदेहांची जागा आणि उताराचा अंदाज घेण्यात आला. ज्यामुळे संपूर्ण ऑपरेशनला गती मिळाली. घटनेची माहिती मिळताच माणगाव तालुक्यातील नागरिक आणि पुणे इथून आलेले मृत तरुणांचे नातेवाईक मोठ्या संख्येने घटनास्थळी पोहोचले होते. या पर्यटक तरुणांचे वय १८ ते २४ दरम्यान असून आयुष्याची सुरुवातही नीट पाहू न शकलेल्या या सर्वांच्या मृत्यूने परिसरात शोककळा पसरली आहे. जीर्ण झालेले संरक्षण कठडे, असुरक्षित वळणे, रात्री पुरेशी प्रकाशव्यवस्था नसणे आणि वाढती वाहतूक या सर्व बाबींची मोठी पुनर्पडताळणी होण्याची आवश्यकता आहे. ही दुर्घटना ताम्हिणी घाटातील सुरक्षिततेची दयनीय अवस्था उघड करते आणि प्रशासन तसेच हा मार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे असल्याने या विभागावर मोठे प्रश्न उपस्थित केले जात आहे.

# विहिरीत पडून चिमुकल्याचा मृत्यू

| अलिबाग | प्रतिनिधी |

आंबेपूर आठवडा बाजार परिसरातील शापित म्हणून ओळखली जाणारी विहीर पुन्हा एकदा जीवावर उठली. यावेळी १० वर्षीय निरागस मित लवेश चिपळूणकर याचा बळी घेतला आहे. विशेष म्हणजे, या विहिरीने यापूर्वीही चार जणांचे जीव घेतले आहेत.

पोयनाड येथे पाचवीला शिकणारा मित शाळा सुटल्यावर वडिलांसोबत कोचरेकरांच्या मुलांच्या हळदी सोहळ्यास गेला होता. वडखळच्या खानावळीत कामानिमित्त वडील परत गेल्याने मित हळदीच्या मंडपात थांबला होता. हळद लावणाऱ्या मुलांना दिले जाणारे खाऊचे पैसे मिळाल्यानंतर मित खेळत-खेळत बाहेर पडला आणि दुर्दैवाने कुप्रसिद्ध विहिरीजवळ पोहोचला. पाय घसरल्याने तो थेट विहिरीत कोसळला.

विहिरीत गटाराचे पाणी मिसळत असल्याने आणि शैवालाचे दाट थर असल्यामुळे, उपस्थित कोणालाही तातडीने उडी मारण्याची हिंमत झाली नाही. काही लहान मुलांनी ओरडत जाऊन मोठ्यांना माहिती दिल्यानंतर मंडपातील नागरिक घटनास्थळी धावले, परंतु परिस्थिती अत्यंत बिकट होती.

मितचे काका चेतन चिपळूणकर यांनी धाडसाने पुढे येत पोलिसांसह मदतकार्य सुरू केले. पोलिसांनी दोरीच्या सहाय्याने विहिरीत उतरून काकांच्या मदतीने मितला बाहेर काढले. छातीतील पाणी काढण्याचे प्रयत्न झाले, मात्र तोपर्यंत तो गंभीर अवस्थेत होता. तातडीने शिंदे हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले असता, मित जवळपास २० मिनिटे पाण्यात अडकून असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. पुढील उपचारासाठी आलिबाग सिव्हिल हॉस्पिटलला हलवण्यात आले, परंतु जास्त प्रमाणात पाणी पोटात गेल्याने मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

## बेकायदेशीर कॉल सेंटरवर धाड

- १७ जणांना अटक, ७ जणांचा शोध सुरु
- ७ कोटींची फसवणूक आली उघडकीस

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

नवी मुंबईतील महापे येथे बेकायदेशीर कॉल सेंटरवर सायबर पोलिसांनी धाड टाकून त्याला सील ठोकले आहे. या प्रकरणी १७ जणांना अटक करण्यात आले आहे तर ७ पेक्षा अधिक लोकांचा शोध सुरु आहे. तसेच चार जणांना नोटीस बजावण्यात आली आहे. सट्टा बाजारात गुंतवणूकी वर कमी कालावधीत मोठा परतावा मिळेल असे आमिष दाखवून सामान्य जणांची फसवणूक केली जात असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला असून अनेक गोष्टींचा उलगडा होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

गगन अजितकुमार थापर, रोशन सुदेश घायवट, सत्यम रामशंकर यादव, महेश अभिमन्यु पाटील, संकेत चंद्रकांत सरतापे हर्षद सणस वय, पान २ वर

## छोटमला अटी शर्तीवर जामीन

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

दिलीप भोईर उर्फ छोटम आणि इतरांना मुंबई उच्च न्यायालयाकडून अटी शर्थीवर जामीन मंजूर करण्यात आला आहे. अलिबाग सत्र न्यायालयाने हत्येचा प्रयत्न (कलम ३०७) आणि इतर कलमांखाली ७ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावलेले दिलीप भोईर (उर्फ छोटम) आणि त्यांच्या साथीदारांना मुंबई उच्च न्यायालयाने दिलासा दिला आहे. उच्च न्यायालयाने आरोपींना काही अटी शर्थीवर जामिनावर मुक्त करण्याचे आदेश दिले आहेत.न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांच्या एकल पीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली, ज्यामध्ये १९ नोव्हेंबर २०२५ रोजी हा आदेश पारित करण्यात आला. रायगड-अलिबाग येथील सत्र न्यायालयाने ३० ऑक्टोबर रोजी दिलेल्या निकालानुसार, दिलीप भोईर आणि इतर आरोपींना दोषी ठरवून जास्तीत जास्त ७ वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. या निर्णयाला आव्हान देत आरोपींनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती आणि शिक्षेला स्थगिती मिळण्यासाठी अर्ज दाखल केले होते. या खटल्यात दिलीप भोईर यांच्यासह प्रभाकर गव्हाणकर, संतोष साळुंके, विकेश ठक्कर, पान २ वर

# अनिश्चिततेची टांगती तलवार कायमच

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक

| रायगड | प्रतिनिधी |

स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पार पाडावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर निवडणुकांच्या हालचाली गतिमान झाल्या खऱ्या पण काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याने आता पुन्हा एकदा पेच निर्माण झाला आहे. पुढील सुनावणी होईपर्यंत कोणत्याही निवडणुकीची घोषणा करू नये अशी सूचना सर्वोच्च न्यायालयाने केल्यानंतर कार्यकर्त्यांच्या डोक्यावर अनिश्चिततेची टांगती तलवार निर्माण झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या बाबतीत सातत्याने होत असलेली धरसोड या निमित्ताने पुन्हा एकदा चर्चेत आली असून आजवरच्या अनेक निर्णयांची यानिमित्ताने पुन्हा एकदा उजळणी झाली आहे.

तसा २०२२ पासून जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांचे पडघम वाजायला प्रारंभ झाला होता. मात्र ओबीसी आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाल्याशिवाय पुढील चित्र स्पष्ट होणार नव्हते. अखेर सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला. गट व गण यांचे आरक्षणही त्यावेळी निश्चित झाले होते. संभाव्य उमेदवारांनी मोर्चेबांधणीही पान २ वर




महाविकास आघाडीचा विजयाचा गुलाल | भाजपाच्या उमेदवाराने घेतली माघार

# विजयाची नांदी! प्रशांत नाईक बिनविरोध





| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

अलिबाग नगरपरिषद निवडणुकीत शेकाप, काँग्रेस आघाडीने विजयाचा गुलाल उधळला असून, भाजप, शिवसेना (शिंदे गट) युतीला पहिला धक्का दिला आहे. प्रभाग क्रमांक २ ब मधून शेकापचे उमेदवार प्रशांत नाईक हे बिनविरोध निवडून आले आहेत. प्रशांत नाईक यांच्यासमोर निवडणुकीत नामनिर्देशन पत्र दाखल केलेले भाजपचे संतोष साळुंखे यांनी गुरुवारी (दि.२०) आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतले. यानंतर शेकाप कार्यकर्त्यांनी शेतकरी भवन येथे जल्लोष साजरा करीत प्रशांत नाईक यांचे अभिनंदन केले.

अलिबाग नगरपरिषदेची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. २ डिसेंबर रोजी मतदानप्रक्रिया राबविण्यात येईल. नगरपरिषद निवडणुकीत शेकाप, काँग्रेस आघाडी व भाजप, शिवसेना (शिंदे गट) युती पान २ वर

पान १ वरून

## विद्याताईंनी घेतला अखेरचा श्वास

पर्यावरणपूरक मार्ग निवडून समाजाला आदर्श घालून दिला. पर्यावरण वाचलं तरच आपलं जगणं सुरक्षित राहील हा त्यांचा ठाम विश्वास याच विचारातून त्यांनी अलिबागमध्ये मयूर बेकरी या नावाने बेकरीची स्थापना केली. त्या काळात प्लास्टिकचा वाढता वापर ही मोठी समस्या होती. पण विद्याताई यांनी सुरुवातीपासूनच प्लास्टिकला पर्याय म्हणून कागद, कपडा आणि नैसर्गिक पॅकिंगचा अवलंब केला. त्यामुळे मयूर बेकरी हा व्यवसायच नव्हे तर समाजातील पर्यावरण-जागृतीचा केंद्रबिंदू बनला.

पर्यावरण संवर्धनासह विद्याताई यांचा सामाजिक सहभागही मोठा होता. स्थानिक महिला गट, स्वयंसेवी संस्था आणि विद्यार्थी यांच्या माध्यमातून त्यांनी वृक्षारोपण, प्लास्टिकविरहित उपक्रम, हरित जनजागृती अशा अनेक मोहिमा राबवल्या. त्यांचे मार्गदर्शन हे अनेक तरुण उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरले.

## ६ तरुण पर्यटकांचा दुर्देवी अंत

संरक्षण कठडा बसवण्यात आला आहे. मात्र वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा संरक्षित कठडा तोडून कार दरीत कोसळली. मोबाईल कॉल न लागल्याने तरुणांचे नातेवाईक व मित्रांनी वारंवार फोन करण्याचा प्रयत्न केला, तसेच सोशल मीडिया, व्हाट्सअप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु या तरुणांकडून कोणताही प्रतिसाद न आल्याने चिंतेचे सावट पसरले. अखेर पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील वारजे उत्तमनगर पोलीस ठाण्यात हे सहा जण हरवले असल्याची तक्रार पुणे शहर उत्तमनगर पोलीस ठाणे येथे १७ नोव्हेंबर २०२५ रोजी नोंदविण्यात आली.

१९ नोव्हेंबरच्या रात्री माणगाव पोलिसांनी ताम्हिणी घाटात शोधमोहीम सुरू केली. तेव्हा एका अवघड वळणावर लोखंडी संरक्षण कठडा तुटलेला आढळला. ड्रोन उड्डाण केल्यानंतर घनदाट झाडीत थार कारचा एक भाग चमकताना दिसला व अपघात निश्चित झाला. रात्र झाल्याने तपास मोहीम थांबवावी लागली. मात्र २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० पासून पुन्हा मोठ्या प्रमाणात रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात आले.

## बेकायदेशीर कॉल सेंटरवर धाड

विनायक चव्हाण, सुमित फडके, अक्षय शिर्के, अमित शिर्के, पंकज शेंडे, सुमेध कोरडे अतुल ठाकुर, मयुर गायकवाड गणेश डंगापुरे, गणेश पाटोळे, नरेश अहिरवार असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. तसेच श्रध्दा गजरे, प्राजक्ता गोळे, संतोष धोत्रे यांना नोटीस बजावण्यात आले आहे. या शिवाय शिव शर्मा, सचिन लोभे, अजहर जमादार सोनी, हरिष पवार, शॉन, लिजा उर्फ स्नेहल यांचा शोध सुरु आहे. सर्व आरोपी हे २१ ते ४९ वयोगटातील असून त्यात तरुणांचा भरणा अधिक आहे. आपण काय करतो याची जाणीव संशयित आरोपींना असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. तसेच कॉल सेंटर नेमके कोण चालवते, मालक कोण याबाबत सखोल तपास सुरु आहे.

गेल्या काही महिन्यापासून सट्टा बाजारात आमच्या सल्ल्याने गुंतवणूक करा कमी कालावधीत दुप्पट चौपट परतावा मिळेल अशा आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक करण्याच्या गुन्ह्यात वाढ होत होती. हा प्रकार नक्की कुठून चालतो याचा शोध सायबर पोलीस घेत होते. त्यातच त्यांना एक माहिती मिळाली. त्यानुसार नवी मुंबईलगत असणाऱ्या ठाणे बेलापूर या औद्योगिक पट्ट्यात असणाऱ्या महापे येथील मिलेनियम बिझनेस पार्क येथील इमारत क्रमांक तीन तिसऱ्या माळ्यावर एक कॉल सेंटर सुरु आहे. या कॉल सेंटरला कुठलीही परवानगी नसून बेकायदेशीर रित्या चालते.

या माहितीची शहानिशा गुप्त पद्धतीने करण्यात आल्यावर या कॉल सेंटरला कुठलीही परवानगी नाही. तसेच येथून सट्टा बाजारात भरघोस परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक केली जाते असेलही काही तांत्रिक पुरावे जोडण्यात आले. आणि योजनाबद्धरित्या मंगळवारी रात्री या कॉल सेंटरवर धाड टाकण्यात आली. त्यावेळी उपस्थित सर्वांनवर कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्या वर बेकायदेशीर रित्या कॉल सेंटर चालवणे, नागरिकांची फसवणूक करणे, नागरिकांची माहिती अनधिकृत रित्या प्राप्त करणे आणि आर्थिक फसवणूक करणे या प्रकरणी माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांना मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार हे कॉल सेंटर १ जानेवारी २०२५ पासून सुरु आहे. तसेच संगणक व अन्य तांत्रिक तपास जो आता पर्यंत करण्यात आला त्यानुसार सामान्य नागरिकांची ७ कोटी १ लाख ११ हजार ४०१ रुपयांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र हा तपास अद्याप पूर्ण झाला नसून त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## अनिश्चिततेची टांगती तलवार कायमच

सुरू केली मात्र पुन्हा राज्य निवडणूक आयोगाने संपूर्ण प्रक्रियेलाच स्थगिती दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आखाड्यात पुन्हा संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. २०२२ च्या ऑगस्ट महिन्यात राज्यातील २५ जिल्हा परिषद व २८४ पंचायत समिती अंतर्गत निवडणूक प्रक्रियेस राज्य निवडणूक आयोगाकडून एका आदेशाद्वारे स्थगिती देण्यात आली. अंतिम आरक्षण अधिसूचनेसह अंतिम मतदार याद्या प्रसिध्द करण्याच्या प्रक्रियेस स्थगिती बहाल करण्यात आल्यानंतर निवडणूक आयोगाचा पुढील आदेश येईपर्यंत या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करु नये असेही निर्देश दिले गेले. विशेषतः जुन्या पध्दतीनेच म्हणजे गट, गण संख्या व आरक्षणाबाबतचे धोरण अवलंबविले जाईल असे त्यावेळी सांगण्यात आले. सत्तेच्या विकेंद्रीकरणाची प्रक्रिया राबविण्यामध्ये जिल्हा परिषदांचे स्थान महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणूस जिल्हा परिषदेच्या कुठल्या ना कुठल्या घटकाशी जोडलेला आहे. म्हणूनच जिल्हा परिषदेला मिनी मंत्रालय असेही म्हटले जाते. दुसऱ्या फळीच्या कार्यकर्त्यांना या ठिकाणी राजकीय अवकाश मिळतो.राज्यात रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरात लवकर घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेला असताना पुन्हा मध्येच महापालिका तसेच जिल्हा परिषदांच्या सदस्य संख्येचे गुऱ्हाळ सुरू झाले. पुन्हा प्रभाग रचना, पुन्हा प्रभागांचे आरक्षण आणि पुन्हा नव्याने सोडत ही कसरत पुन्हा एकदा पार पडली. गेल्या पाच वर्षात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात वारंवार बदल करण्यात आले आहेत. पालिकांच्या सदस्य संख्येत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे ३ लाखांपेक्षा अधिक व ६ लाखांपर्यंत लोकसंख्या असलेल्या पालिकेत निवडून आलेल्या सदस्यांची किमान संख्या ६५ इतकी तर कमाल संख्या ८५ इतकी असेल. जिल्हा परिषद सदस्यांची संख्या कमीत कमी ५० आणि जास्तीत जास्त ७५ करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये कमीत कमी ५५ आणि जास्तीत जास्त ८५ अशी सदस्य संख्या तोवर होती.

वस्तूतः जिल्हा परिषद रचना यापूर्वी जाहीर झाली होती. आरक्षण सुटले. कोणता गट, गण कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित आहे हे निश्चित झाल्यानंतर इच्छुक उमेदवार बाशिंग बांधून गतिमान झाले होते. विविध पक्षातील अनेक इच्छुक उमेदवार कामाला लागले होते. राज्य शासनाने पुन्हा वाढीव सदस्य संख्येचा निर्णय रद्द केला. दहा वर्षापासून गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या आणि निवडणूक लढू इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये सातत्याने गोंधळ निर्माण झाला. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या संदर्भात वरचेवर नवनवे निर्णय घेतले गेल्याने संभाव्य उमेदवार मोर्चेबांधणीला लागले की लगेच एखादा नवा निर्णय येत गेला, त्यामुळे उमेदवारही भांबावून गेले. डिसेंबर २०१९ मध्ये बहुसदस्य प्रभाग पद्धत रद्द झाली होती. त्यानंतर मार्च २० मध्ये नगराध्यक्षांची नगरसेवकांमधून निवड व एक सदस्य प्रभाग पद्धत लागू करण्यात आली. सप्टेंबर, ऑक्टोबर २०२१ मध्ये महाविकास आघाडी सरकारने पुन्हा बहुसदस्य प्रभाग पद्धत तीन सदस्य प्रभाग पद्धत आणली. जुलै २२ मध्ये नगराध्यक्ष आणि सरपंचांची थेट निवडणूक तर ३ ऑगस्टला महापालिका आणि जिल्हा परिषदांमध्ये २०१७ नुसारच प्रभागांची रचना असेल असा निर्णय घेण्यात आला.

या सर्व बदलांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका केव्हा पार पडतात आणि या निवडणुका पार पडेपर्यंत आणखी कोणकोणते नियम बदलले जातात यासंदर्भात कार्यकर्त्यांचा जीव टांगणीला लागलेला होता. आता एकदाची पालिका निवडणुकांची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यातच पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण मर्यादा ओलांडल्यावरून नव्या कार्यक्रमाच्या घोषणेस निवडणूक आयोगाला मनाई केल्याने महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती या निवडणुकांसाठी इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांना पुन्हा एकदा अनिश्चिततेच्या फेऱ्यात अडकावे लागले आहे.

## विजयाची नांदी! प्रशांत नाईक बिनविरोध

यामध्ये लढत होणार आहे. या पार्श्वभूमीवर आघाडीने युतीला पहिला धक्का देत विजयाचा गुलाल उधळला आहे. नगरपरिषद निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची मुदत २१ नोव्हेंबरपर्यंत आहे. गुरुवारी (दि.२०) प्रभाग क्रमांक २ ब मधील भाजपचे उमेदवार संतोष साळुंखे आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतले. यामुळे आघाडीकडून नगरसेवक पदासाठी निवडणूक लढविणारे प्रशांत नाईक हे बिनविरोध निवडून आले आहेत. बिनविरोध निवडून आल्यानंतर शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील, जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार अक्षया नाईक, नगरसेवक पदाच्या उमेदवार ॲड. मानसी म्हात्रे यांच्यासह इतर उमेदवार तसेच शेकाप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रशांत नाईक यांचे अभिनंदन केले.

## हिंदी-मराठी वादातून तरुणाची आत्महत्या

लोकलमधली झुंडशाही, मराठी-हिंदी वाद कोणत्या टोकाला पोहचला हेच या घटनेवरून दिसून येत आहे. पोलिसांनी अर्णवच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी अर्णवच्या कुटुंबियांनी केली आहे.

वडील जितेंद्र खैरे यांनी दिलेल्या तक्रारीनूसार कल्याण पूर्व तिसगाव नाका येथील सहजिवन रेसिडेन्सीमध्ये राहणाऱ्या अर्णव खैरे हा मुलुंडच्या केळकर कॉलेजमध्ये सायन्स शाखेत शिकत होता. मंगळवार, १८ नोव्हेंबर रोजी तो नेहमीप्रमाणे कल्याणहून लोकलने कॉलेजकडे निघाला होता. ट्रेनमध्ये गर्दी असल्याने गर्दीत अर्णवने हिंदीत थोडा आगे हो... असे बोलला. इतक्यात आजूबाजूच्या चार ते पाच जणांच्या टोळयांनी तुला मराठी बोलात येत नाही का?, अशी विचारणा करत तूला मराठी बोलण्याची लाज वाटते का?, असे म्हणत त्याला ठोशांनी बुक्क्यांनी मारहाण केली. या घटनेने घाबरलेला अर्णव ठाणे स्टेशनला उतरला आणि मागील लोकलने मुलुंडला गेला. त्याने प्रॅक्टिकल पूर्ण केले. पण मानसिक तणावामुळे कॉलेज अर्ध्यातून सोडून दुपारी घरात परतला. याच दरम्यान अर्णवने वडिलांना फोन करून आपली आपबीती व्यक्त केली. सायंकाळी सातच्या सुमारास वडील घरी आले असता घराचा दरवाजा आतून बंद होता. शेजाऱ्यांच्या मदतीने दार उघडण्यात आले. बेडरूममध्ये अर्णवने ओढणीने गळफास घेतल्याचे आढळले. तातडीने रुख्मिणीबाई हॉस्पिटलमध्ये नेले असता डॉक्टरांनी त्याला रात्री ९.०५ वा. मृत घोषित केले यानंतर अर्णव याच्या वडिलांनी कल्याण कोळशेवाडी पोलीस ठाण्यात याप्रकरणी जवाब नोंदवला असून पोलिसांनी नोंद करत वडिलांच्या जबाबानुसार तपास सुरू केला आहे. मात्र या घटनेने परिसरामध्ये खळबळ उडाली आहे. दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या घटनेचा सखोल तपास करून या प्रकरणी मराठी तरुण आहेत की मराठी याचा शोध घेऊन कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. मनसे नेहमी मराठी माणसाच्या पाठी उभी आहे. जर या घटनेत मराठी माणसं असतील तर त्यांना पाठीशी घातल्या जाणार नाही, असं मनसेचे पदाधिकारी योगेश गव्हाणे म्हणाले.

## छोटमला अटी शर्तीवर जामीन

मकरंद भोईर आणि इतर अनेक जणांचा समावेश आहे.

**न्यायालयाचा निर्णय आणि अटी**

उच्च न्यायालयाने आरोपींचे अर्ज मंजूर करत खालील आदेश दिले आहेत.

- आरोपींना प्रत्येकी १५,००० रुपयांच्या पी.आर. बाँडवर आणि तेवढ्याच रक्कमेच्या एका जामीनदारासह मुक्त करण्याचे आदेश दिले आहेत.
- अपिलाचा निकाल लागेपर्यंत आरोपींनी फिर्यादी किंवा जखमी व्यक्तींशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही संपर्क साधू नये.
- अटींचे उल्लंघन झाल्यास जामीन रद्द होईल आणि आरोपींना शिक्षा भोगावी लागेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.
- हा अंतरिम दिलासा असून, अपिलाच्या अंतिम सुनावणीवर याचा परिणाम होणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.


### महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग,**
**पनवेल पिनकोड - ४१० २०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०
ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ३७
(ई-निविदा) सन २०२५-२६

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www. mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण ३ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक २१.११.२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक २८.११.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
**दिनांक :-**

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**

**विमाका/ कोवि/२०२५-२०२६/२११**

### PANVEL MUNICIPAL CORPORATION,
**PANVEL**
**NOTICE INVITING TENDERS**

Online bids are invited from bidders to perform of the following work on behalf of the Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel (here-in- after called the CORPORATION) and will be received online on the website www.mahatenders.gov.in as per time schedule (key dates) in the notice published on the above website.

| Sr. No | Name of Work | Earnest Money (Rs.) | Cost of tender form (Rs.) |
|---|---|---|---|
| 1. | Purchase of 10 nos. of Truck Mounted Road Sweeping Machines for daily cleaning of Roads in Panvel Municipal Corporation area including Operation & Comprehensive Maintenance of Road Sweeping Machines and Supplying Manpower for period of 5 Years. | 3.06 lakh | 3000/-+5% G.S.T. |

**Key Dates: -**

| Sr.No | Description | Date & Time |
|---|---|---|
| 1 | Publish Date | 20/11/2025 at 15:00 |
| 2 | Document Download Start Date | 20/11/2025 at 15:00 |
| 3 | Document Download End Date | 27/11/2025 at 15:00 |
| 4 | Pre-Bid Meeting | 24/11/2025 at 12:00 |
| 5 | Bid Submission start date | 20/11/2025 at 15:00 |
| 6 | Bid Submission end date | 27/11/2025 at 15:00 |
| 7 | Bid opening date | 28/11/2025 at 15:00 |

SD/-
**Additional Commissioner**
**Panvel Municipal Corporation**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे बामणगांव, ता. अलिबाग येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| बामणगांव | २१७ | ०-४६-३० पो.ख.०-०६-६० ०-५२-९० | १०.२८ | १) श्री.विजय पांडुरंग पाटील, २)श्रीम.आनंदी पांडुरंग पाटील, |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व त्यामध्ये कुणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क अधिकार नाही, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २१/११/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील.**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५०

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**
**मुदतवाढ सूचना**

ई निविदा सूचना क्र. ५४/२०२५-२०२६ (मुंबई) करीता दिनांक ०४/११/२०२५ रोजी संपादक, दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक मुंबई तरूणभारत, मुंबई, दैनिक कृषिवल, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या :https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा येथील सांडपाणी निःसारण योजनेच्या खराब झालेल्या एचडीपीई पाइपलाईनच्या जोडामधील गळती ऑनलाईन पद्धतीने रोखणे. | ₹३८,७०,३४९.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०१/१२/२०२५ पर्यंत : https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.
सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे मानतर्फे झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्र.६५/३ क्षेत्र ०-२१-१० हे.आर. आकार ५ रुपये ५१ पैसे, ही भातशेती मिळकत आमचे म्हणजेच १) श्री. कल्पेश काशिनाथ कवळे, २) श्री. नितेश काशिनाथ कवळे ३) श्रीमती जयश्री जयवंत कवळे ४) श्री. निलेश जयवंत कवळे ५) श्रीमती रुपेश जयवंत कवळे ६) सौ. रुपाली विलास नाईक ७) श्रीमती सिंधु गजानन पाटील रा. लोणारे, पो.थळ, ता. अलिबाग अशांचे सामाईक खुद्द ताबा कबजा वहिवाटीत पुर्ण कसणुकीत असून आमचे नावे संरक्षित कुळ म्हणून इतर हक्काचे सदरी ७/१२ दप्तरी आहेत. सदर मिळकतीचा आम्ही कुणाही त्रयस्थ इसमांबरोबर विक्रीचा व्यवहार केलेला नाही. किंवा सदर मिळकतीच्या व्यवहारापोटी कुणाही त्रयस्थ इसमांकडून कोणत्याही प्रकारची मोबदला रक्कम स्वीकारलेली नाही. सदर मिळकत ही शारदा आत्माराम घरत वगैरे यांनी विक्रीस काढल्याचे आम्हास समजले आहे. सदर मिळकतीचा शारदा आत्माराम घरत वगैरे यांनी आमचे अपरोक्ष विक्रीचा व्यवहार केल्यास त्यास आमची हरकत राहणार आहे. सबब सदर मिळकतीची विक्री शारदा आत्माराम घरत वगैरे यांना अन्य तिऱ्हाईत इसमांस करता येणार नाही. किंवा अन्य तिऱ्हाईत इसमांचा हस्तक्षेप करता येणार नाही. किंवा तसे केल्यास आम्ही मिळकतीचे कबजेदार म्हणून आम्हाला कायदेशीर कारवाई करणेचा हक्क राहणार आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. २१-११-२०२५

**कल्पेश काशिनाथ कवळे**
**रा. लोणारे, थळ, ता. अलिबाग**

### उपविभागीय अधिकारी यांचेपुढे चालू असलेल्या कुळवहिवाट/अधिकार अभिलेख संबंधीच्या दाव्यातील पक्षकारांना द्यावयाची नोटीस

क्र आरटीएस कात.५/अर्ज क्र.१२१/२०२५

**जाहीर नोटीस**

१) श्री. अब्दुल अजिज अब्दुल मलिक — अपिलार्थी
रा. श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि.रायगड
विरुध्द
१) कै. शौकत अब्दुल गफुर धांदरुक (मयत) — उत्तरार्थी
१.१) श्री.अ. शकुर महमद लोगडे
१.२) श्री.अहंमदसाब ममहमद लोगडे
१.३) श्री.ईस्माईल महमद लोगडे
१.४) श्रीम नुरजहा शौकत धांदरूत
सर्व रा.घोली मोहल्ला, श्रीवर्धन, श्रीवर्धन, जि. रायगड

सामनेवाला क्र.१.२, १.३ यांस यावरुन कळिवणेत येते की, मौजे श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन येथील फेरफार क्र.२६४३ नोंद मंजूर करणेबाबत अपील दाखल केले आहे. सदर प्रकरणी सुनावणी उपविभागीय अधिकारी, श्रीवर्धन यांचे कार्यालयात दिनांक ०४/१२/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता करण्याचे ठरविले आहे. तरी तुम्ही अथवा तुमचे प्रतिनिधी यांनी तुमचा कोणताही पुरावा असल्यास त्या पुराव्यानिशी तुमचे म्हणणे मांडण्यासाठी सदरहू दिवशी, सदरहू जागी व वेळी माझ्यापुढे हजर राहिले पाहिजे. उपनिदिष्ट वेळी व जागी अशा तऱ्हेने तुम्ही उपस्थित न राहिल्यास तुमच्या अथवा तुमच्या प्रतिनिधीच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निकाल केला जाईल. यापुढील सुनावणीची तारीख घेण्याची जबाबदारी सर्वस्वी तुमची राहिल याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- श्रीवर्धन
दिनांक :- २०/११/२०२५

सही/-
**(महेश पाटील)**
उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन
उपविभाग श्रीवर्धन

### जाहिर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडुन कायम खरेदी करणार असुन तशी बोलनी आमचे अशिल व मिळकतीचे मालक मध्ये सुरू आहे....

**मिळकतीचे वर्णन**

मालकाचे नाव : १) श्री. रामदास नारायण तळकर
रा.तळा ता.तळा, जि.रायगड
२)प्रसाद राधाकृष्ण पंडीत
रा.अरूंदा, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग

| मौजे | गट.नं | भो.ग. वर्ग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|---|
| मालाठे | ३१३ | १ | ०.८३.०० ०.१८.०० १.०१.०० | ०.३४ |

तिचे कोणतेही भागावर कोणाचेही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसा, हक्क, लिज, चार्ज, पोटगी, वहिवाट, (जाण्या येण्याचा मार्ग), इजमेंटरी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी हरकत अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य ते कागदपत्रे पुराव्या सहीत सादर करावे...

मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहित धरून आमचे आशिल व्यवहार पुर्ण करतील. व मागाहुन कोणाचीही तक्रार हरकत राहील्यास ती विचारात घेतली जाणार नाही हे सर्वास कळावे.

माणगांव
दिनांक :- २०/११/२०२५

सही /-
**(ॲड. पी.एम.जाधव)**
B.Com., LL.B. At. Post.
Indapur, Tal. Mangoan,
Dist. Raigad

### जाहीर नोटीस

दिनांक :- २०/११/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे खडसांबळे ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे खडसांबळे ता. सुधागड जि. रायगड**

**मिळकतीचे वर्णन :-**

| कब्जेदाराचे नांव | स.नं./हि.नं. | क्षेत्र. हे आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.संभाजी त्रिंबक चिपळेकर | २७/९/ ब | ०-३४-०० | ०-१२ |
| | २७/९/अ | ०-३५-०० | ०-१३ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुरव्यासहीत १४ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक -२०/११/२०२५

सही /-
**श्री. राहुल जे. भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

### जाहीर नोटीस

दिनांक :-२०/११/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे खडसांबळे ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे खडसांबळे ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | स.नं. हि. नं. | क्षेत्र.हे आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.राजेश शांतीलाल शहा वैगरे १ | २६/१ | ०-६३-२० | ९-१९ |
| | २३/१/ब | ०-२०-०० | ०-१२ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुरव्यासहीत १४ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण-पाली - सुधागड
दिनांक- २०/११/२०२५

सही /-
**श्री. राहुल जे. भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही मौजे भायमळा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील विद्यमान मालक श्री. संजय पांडूरंग पाटील यांच्या नावे असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. मिळकतीचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत व ती विकणेचा त्यांस पुर्ण हक्क अधिकार आहे.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतीचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून आमचे अशिल नियोजित खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**

मौजे भायमळा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ११३ एकूण क्षेत्र १ हे. २२.६० आर, आकार १६ रूपये ६३ पैसे पैकी श्री. संजय पांडूरंग पाटील यांच्या मालकीच्या ० हे. ४० आर, आकार ५ रूपये ४२ पैसे या मिळकतीपैकी ० हे. १५.१० आर एवढे क्षेत्र.
सदरचे ० हे. १५.१० आर मिळकतीस चतुःसीमा :-
पूर्वेस:- मौजे भायमळा गट नं. १२० या मिळकतीची हद्द.
पश्चिमेस :- मौजे भायमळा गट नं. ८६ या मिळकतीची हद्द.
दक्षिणेस :- मौजे भायमळा गट नं. ११३ पैकी उर्वरित मिळकत.
उत्तरेस :- मौजे भायमळा गट नं. ८६ व १२१ या मिळकतींच्या हद्दी.

अलिबाग
तारीख : २१/११/२०२५

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## निवडक



### नेरळ येथे नेत्र तपासणी शिबीर संपन्न

**नेरळ :** अभिनव ज्ञान मंदिर, लक्ष्मी नेत्रपेढी पनवेल आणि कर्जतचे सामाजिक कार्यकर्ते विजय हरिश्चंद्रे यांच्या संकल्पनेनुसार, अभिनव ज्ञान मंदिर मधील शालेय विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सामाजिक कार्यकर्ते विजय हरिश्चंद्रे, तसेच शाळेचे खजिनदार पद्माकर गांगल, नंदकुमार मणेर, डॉ. शर्वांनी कुळकर्णी, सुभाष नातू आदी उपस्थित होते. या नेत्र तपासणी शिबिरात एकुण ७०० विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. यावेळी लक्ष्मी नेत्र पिढीच्या डॉ. अक्षता गायकवाड, डॉ. झेनब मलिका, मैथली मराठे यांनी तपासणी केली. या शिबिरादरम्यान विजय हरिश्चंद्रे यांनी, मोबाईल फोन अति वापरल्यामुळे मुलांच्या दृष्टीमध्ये होणारे दुष्परिणाम विशद केले. तसेच, असे प्रकार टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना मोबाईलपासून दूर राहावे, असे आवाहन त्यांनी केले.




### चैतन्य कुंभार उद्योग पुरस्काराने सन्मानित

**रसायनी :** स्विफ्टनलिफ्ट मीडिया ग्रुप यांच्यावतीने चैतन्य कुंभार यांना महाराष्ट्र उद्योग पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्विफ्टनलिफ्ट मीडिया ग्रुप ही एक मीडिया आणि इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी आहे. मराठी भाषेत व्यवसाय आणि उद्योगांशी संबंधित कार्यक्रम आयोजित करून तरुणांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देते. ही कंपनी महाराष्ट्र उद्योगरत्न पुरस्कार आणि महाराष्ट्र बिझनेस अचिव्हर अवॉर्ड्र्ससारख्या पुरस्कार सोहळ्यांचे देखील आयोजन करते. त्यामुळे मराठी यशस्वी उद्योजकांना ओळख मळिते. त्साठी या पुरस्कार सोहळ्यांचे आयोजन करण्यात येते. चैतन्य कुंभार हे खालापूर तालुक्यातील चौक तुपगाव येथील रहिवाशी असून ते सेलिब्रिटींचे फोटो,रील्स बनविणे व इव्हेंट सादर करणे यात अग्रेसर आहेत. दरम्यान, सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते त्यांना महाराष्ट्र उद्योग पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### वाहनाची काच फोडून रोकड लंपास

**पनवेल :** कळंबोली उपनगरात व्यापाऱ्याच्या वाहनाची काच फोडून तब्बल ४ लाख रुपयांची रोकड लंपास केली आहे. याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उलवे येथे राहणारे संबंधित व्यापारी कळंबोली प्रभाग ११ येथील इमारतीमध्ये ट्रेडिंगचा व्यवसाय करतात. सकाळी त्यांनी त्यांचे वाहन कार्यालयासमोर उभे केले होते. दुपारी वाहनाकडे परतल्यावर काच फुटल्याचे त्यांना आढळले. आतमध्ये ठेवलेल्या पिशवीतील ४ लाखांची रोकड चोरीला गेल्याचे लक्षात येताच त्यांनी कळंबोली पोलिसांत धाव घेतली.




### रंजना गांधारे शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान

**कोलाड :** कोलाड येथील रा.जि.प. शाळा गोवे केंद्र उपशिक्षिका रंजना गांधारे यांना महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषद महाराष्ट्र यांच्यातर्फे 'राज्यस्तरीय शिक्षक रत्न नागरी पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा कार्यक्रम रत्नरगिरीतील वि. दा. सावरकर नाट्यगृहामध्ये पार पडला. यावेळी प्रदेश अध्यक्ष डॉ. सखाराम वाघमारे, सचिव प्राचार्य गोपीनाथ सगर तसेच सर्व पदाधिकारी उपस्थित होते. रंजना गांधारे या गेल्या १५ वर्षांपासून अध्यापनाचे कार्य करतात. शैक्षणिक कार्यासोबतच विविध क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान आहे. विद्यार्थ्यांना संपूर्ण कलागुणांमध्ये मार्गदर्शन करतात. क्रीडा स्पर्धेत नाट्य व कला स्पर्धेत त्यांचा सहभाग आहे. त्यांना आजपर्यंत विविध पुरस्काराने सन्मानित केलेले आहे. विविध पत्रिकेमध्ये त्यांच्या कविताही प्रसिद्ध आहेत, अशा अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेल्या उपशिक्षिका रंजना गांधारे यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## तळा हायस्कूलच्या मैदानाची दुरवस्था

### अतिक्रमणामुळे मुलांना खेळण्यास अडचण; प्रशासनाचे दुर्लक्ष



> १९५२ सालापासून हे मैदान कार्यरत आहे. या मैदानावर लगोरी, खो-खो, क्रिकेट, धावणे यांसारख्या स्पर्धा सहज पार पाडल्या जात होत्या. मात्र, सद्यस्थितीत मैदानावर खासगी वाहनांची पार्किंग, बांधकामाचे मटेरियल पडलेले आहे. तसेच, या ठिकाणी बांधण्यात आलेल्या व्यायामशाळेचे रूपांतर वाहनतळ म्हणून झाले आहे. त्यामुळे मुलांना खेळण्यास अडचण निर्माण होते. याबाबत प्रशासनाला कळवूनही प्रशासन कोणत्याही प्रकारची दखल घेत नाही.- मंगेश देशमुख, सचिव, शिक्षण प्रसारक मंडळ, तळे विभाग

**| तळा | प्रतिनिधी |**

**तळा शहरात असलेल्या गो.म. वेदक हायस्कूल समोरील मैदानाची अत्यंत दुरवस्था झाली आहे. या मैदानावर विविध साहित्यांचे अतिक्रमण झाल्याने मुलांना खेळ खेळण्यास अडचण निर्माण होत आहे. तसेच, नगरपंचायतीच्या घंटा गाड्या आणि इतर वाहने या ठिकाणी दिवस रात्र उभी केली जातात. त्यामुळे मैदानाला पार्किंगचे स्वरूप आले आहे. त्यामुळे स्थानिकांसह पालकवर्गातून नाराजीचे सुर उमटत आहेत.**

गो.म. वेदक हायस्कूल समोरील मैदान हे तळा शहराच्या मध्यवर्ती भागात असल्याने शालेय विद्यार्थ्यांसह येथील नागरिकांना क्रीडा व फेरफटक्यासाठी अत्यंत सोयीचे आहे. त्याचबरोबर विविध राजकीय, शैक्षणिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी या मैदानाला अधिक पसंती असते. तसेच, गो.म. वेदक विद्यालयासह रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेचे विद्यार्थी देखील या मैदानाचा खेळासाठी उपयोग करीत असतात. परंतु, पावसाळ्यानंतर या मैदानाची अत्यंत दुरवस्था झाली आहे. त्यातच या मैदानासमोरच तळा शहराला पाणी पुरवठा करणारी टाकी बांधण्यात येत आहे. त्यामुळे त्या कामाचे सर्व बांधकाम साहित्य संबंधित ठेकेदाराकडून मैदानावर ठेवण्यात आले आहे. त्यामध्ये बऱ्यापैकी लोखंडी साहित्यांचा व खडीचा समावेश आहे. त्यामुळे शाळेतील मुले त्या मैदानावर खेळत असताना त्यांना दुखापत होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. तसेच, तळा नगरपंचायतीच्या कचरा उचलणाऱ्या घंटा गाड्यांसह खासगी वाहने देखील दिवसरात्र याच ठिकाणी उभ्या केल्या जातात. त्यामुळे या मैदानाला पार्किंगचे स्वरूप आले असून विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मैदान अपुरे पडत आहे. काही दिवसांतच शाळेतील विद्यार्थ्यांच्या हिवाळी मैदानी स्पर्धांना सुरुवात होणार आहे. मात्र, मैदानावर असलेल्या अतिक्रमणामुळे मुलांना विविध खेळ खेळताना मोठी अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे तळा नगरपंचायत प्रशासनाने या गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष देऊन संबंधित मैदानावरील अतिक्रमण लवकरात लवकर हटवावे आणि मैदान मुलांना खेळण्यासाठी मोकळे करावे, अशी मागणी शहरवासीयांकडून केली जात आहे.



## मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

**| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |**

मुरूड-जंजिरा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता २ डिसेंबरला निवडणूक व ३ डिसेंबर मतमोजणी होणार आहे. त्या अनुषंगाने गुरूवारी (दि.२०) मुरूड नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान केंद्राध्यक्ष व इतर मतदान अधिकारी यांचे पहिले प्रशिक्षण यशस्वीरित्या संपन्न झाले.

यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी सर्व मतदान कर्मचाऱ्यांना त्यांच्या कायदेशीर जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांची जाणीव करून दिली. तसेच, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण येऊ नये म्हणून एलसीडी प्रोजेक्टरच्या माध्यमातून चित्रफित दाखवुन मार्गदर्शन केले. तसेच, ईव्हीएम मशीन हाताळणीची प्रशिक्षण प्रक्रिया अत्यंत अचुकपणे पार पाडण्यासाठी प्रशिक्षित केले. त्यानंतर, ईव्हिएम सीलींग व हाताळणी मतदान यंत्रे सील करण्याची तांत्रिक पध्दत आणि त्यावेळेस घ्यावयाची दक्षता या बाबत अधिकाऱ्यांना निवडणूक प्रक्रियेबाबत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी नायब तहसीलदार राजेश्री साळवी, क्षेत्रीय अधिकारी अमित सांगळे, संतोष कचरे, मंडळ अधिकारी मंगेश इंगुळकर, नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, कर निरीक्षक अनिकेत जगदाळे, बांधकाम इंजिनिअर अनिकेत वाजे, अधिराज चौलकर, पल्लवी डोंगरीकर, संजय बामुगडे, जयेश चोडणेकर आदिंसह क्षेत्रिय अधिकारी, शिक्षक वर्ग, ग्रामपंचायत कर्मचारी व नगरपरिषद कर्मचारी उपस्थित होते.

## गावठी दारूचा साठा उद्ध्वस्त



**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल शहर पोलिसांच्या विशेष पथकाने विनापरवाना अवैधरित्या विक्रीसाठी गावठी दारू निर्मितीचा साठा उद्ध्वस्त केला असून या प्रकरणी एकाला तब्यत घेतले आहे.

पनवेल तालुक्यातील भांगरपाडा गाव जवळील प्रस्तावित डी-मार्ट जवळील जंगलात खाडीच्या बाजूला विनापरवाना अवैधरित्या विक्रीसाठी गावठी दारू निर्मिती केली जात असल्याची माहिती वपोनि नितीन ठाकरे यांना मिळाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, पोलीस शिपाई सूर्यकांत काकडे, पोलीस हवालदार कारंडे, पोलीस शिपाई गाभाले, पोलीस हवालदार प्रवीण मेथे आदींच्या पथकाने त्या ठिकाणी जाऊन हजारो रुपये किमतीची कच्ची दारूचे नवसागर द्रव्य जागीच नष्ट केले. तसेच, त्या ठिकाणी असलेला पातेले, काचेच्या बाटल्या व इतर वस्तू हस्तगत केल्या आहेत.



• अलिबाग नगरपरिषद प्रभाग क्रमांक १ मधील प्रचाराचा शुभारंभ शेतकरी कामगार पक्षाचे नगरपरिषदेचे नेतृत्व प्रशांत नाईक यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आला. अलिबाग शहरातील हिराकोट तलावाजवळील सप्तशृंगी मातेच्या साक्षीने विजयाचा निर्धार यावेळी शेकापच्या कार्यकर्त्यांनी केला. प्रभाग १ मधून संतोष गुरव आणि संध्या पालवणकर निवडणूक लढवीत आहेत. या प्रचारावेळी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नाईक देखील उपस्थित होत्या.

### मित्राने चोरली सोन्याची चेन

**| पनवेल | प्रतिनिधी |**

निहार मंजू हा पनवेल येथे राहत असून, त्यांच्या वडिलांचा बुल्स ग्रीन्स ट्युलिप येथे सदनिका आहे. निहार हा त्यांच्या मित्रांसह या ठिकाणी गेले. त्यानंतर बाहेर फेरफटका मारून आले आणि बेडरूममध्ये झोपले. निहार सकाळी झोपेतून उठला असता, त्याच्या गळ्यातील दोन तोळ्याची सोन्याची चेन आणि डोक्यातील ग्रे रंगाची बिनी कॅप कुठेच सापडली नाही. याबाबत मित्रांना विचारणा केली. त्यावेळी व्हेन डिसूजा नावाचा त्याचा मित्र तेथे नव्हता. सीसीटीव्ही कॅमेरे पाहिले असता, व्हेन डिसूजा हा लिफ्टमधून बिनी कॅप घालून जाताना दिसून आला. त्यानंतर त्यांनी पनवेल पोलिसांत गुन्हा दाखल केला.

### अंबे स्मृती समोरील रस्त्याचे भूमिपूजन



**| रसायनी | प्रतिनिधी |**

दांड-रसायनी रस्त्यावरील टिसीआयसमोर अंबे स्मृति वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था झाली होती. या रस्त्यावरुन प्रवास करताना प्रवासी वर्गाला विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे अंबे स्मृती ते लक्ष्मी वसाहतीतील नागरिकांनी माजी सरपंच संदिप मुंढे यांना याबाबत सांगितले. त्यांनतर मुंढे यांनी प्रयत्न करुन पाठपुरावा करत रस्त्याचा प्रश्न मार्गी लावला. दरम्यान, अंबे स्मृती समोरील या रस्त्याचे भुमिपुजन गुरुवारी (दि.२०) सरपंच उमा मुंढे, सदस्या संगिता भोईर, स्वप्नाली मैदर्गीकर यांच्याहस्ते करुन काम सुरु करण्यात आले. या रस्त्याचे काम सुरु झाल्याने तेथील रहिवाशांना आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पाणीसाठवण टाकीचे लोकार्पण



**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

बेलोशी ग्रामपंचायत अंतर्गत वळवळी आदिवासी वाडी येथे उसर गेल इंडिया कंपनीच्या कॉर्पोरेट पर्यावरण दायित्व विभागाच्या सिईआर अंतर्गत पाणीसाठवण टाकी बांधण्यात आली. या टाकीचा उद्घाटन सोहळा गुरूवारी (दि.२०) बेलोशी ग्रामपंचायतीमार्फत आयोजीत करण्यात आला. गेल कंपनीचे कार्यकारी निर्देशक अनुप गुप्ता यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्याचबरोबर धोकवडे तलाव सरक्षंण भिंत, महाजने नदी सरक्षंण भिंत, कळकीचा टेप येथील बंधारा, गाणीच्या तलावास सरक्षंण भिंत इत्यादी कामांचे उद्घाटन झाल्याचे जाहीर करण्यात आले.

गेल कंपनीच्या कॉर्पोरेट पर्यावरण दायित्व सिईआर अंतर्गत विविध उपक्रमाव्दारे शाश्वत विकासाला चालना देते. या कंपनी परिसरातील आसपासच्या गावाच्या अनेक सार्वजनिक विकासात्मक कामे हाती घेतली आहेत. यावेळी गेल कंपनीचे कार्यकारी निर्देशक अनुप गुप्ता, महाप्रबंधक मानव प्रसंसाधन विभागाचे जितिन सक्सैना, उप महाप्रबंधक जी.एस. नागेवाडी, बेलोशी ग्रामपंचायतीचे प्रशासक अधिकारी अनिल गोतकर, अधिकारी देवगंना वेटकोळी, कृष्णा भोपी, नारायण कातकरी, संदिप भोईर, गणिता कारभारी, उदय सांदणकर, प्रचिती पाटील, नंदकुमार काटले, अनंता औचटकर यांच्यासह गिरीष पाटील, नरेश ठाकूर, केतन भोपी, रोशन भोपी, सुधाकर भोपी, मुकेश भोपी, प्रविण राणे यांची उपस्थिती होती.

१४ वर्षांची तेजस्वी परंपरा | कार्तिकी गायकवाडच्या हस्ते उद्घाटन

## संगीत प्रतिष्ठानच्यावतीने दीपोत्सवाचे आयोजन

**| रसायनी | प्रतिनिधी |**

जगातील एकमेव संजीवन समाधी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत ज्ञानोबारायांच्या संजीवन समाधीला यंदा ७२९ वर्षे पूर्ण झाली. या पवित्र दिनाचे औचित्य साधत पंडित कल्याण गायकवाड संगीत प्रतिष्ठानच्यावतीने भव्य दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. आध्यात्म, भक्ति आणि परंपरेचा संगम घडवणाऱ्या या उपक्रमाला यावर्षी १४ वर्षे पूर्ण झाली आहेत.



संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीच्या तेजस्वी स्मृती चेतवणारा दीपोत्सव भाविकांसाठी भक्तिसंवेदना, आध्यात्मिक ऊर्जा आणि सामूहिक साधनेचा एक अविरत सोहळा ठरला. या कार्यक्रमाचे उद्घाटन गायिका कार्तिकी गायकवाड आणि गायक कौस्तुभ गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात स्वरभूषण पूनमताई नळकांडे यांच्या सुमधुर अभंगवाणीने झाली. कृपाळू उदार माझा ज्ञानेश्वर, टाळी वाजवावी, ज्ञानराज माझी योग्यांची माऊली, कोणे गावी आहे हा सांगावा असे एकापेक्षा एक अभंग त्यांनी सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सालाबादप्रमाणे यावर्षीदेखील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यामान्यवरांचासन्मानकरण्यात आला. तसेच, या दीपोत्सवात रांगोळीकार राजश्री भागवत यांनी डोळ्यांची पारण फेडणारी रांगोळी साकारून उपस्थितांना विलक्षण कलानुभूती दिली.

या सोहळ्यात संदीप राक्षे लिखित 'निमित्तमात्र' या कथासंग्रहाचा लोकार्पण सोहळाही संपन्न झाला. कार्यक्रमाचा शेवट कार्तिकी गायकवाड हिने 'मोगरा फुलला' हा अभंग गाऊन वातावरणात चैतन्य निर्माण केले व कौस्तुभ गायकवाड यांनी 'देव निवृत्ती याने धरले दोन्ही कर' हा समाधीचा अभंग गाऊन उपस्थित श्रोत्यांना भावनाविवश केले होते.

या कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप राक्षे, गणेश नळकांडे, राजेश टाकळकर, विजय मानकर, साहेबराव कवडेकर, पोपट कदम, राजेंद्र येवला, रामदास ठोंबरे, अमोल ठोंबरे, काव्या गायकवाड, गायिका श्रद्धा साळुंके, मनोज कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

## यश संपादनासाठी चिकाटी आवश्यक

### प्राचार्य डॉ.जनार्दन कांबळे यांचे प्रतिपादन



**| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |**

स्पर्धा परीक्षेत यश मिळवायचे असेल तर विद्यार्थ्यांनी अथक परिश्रमाने जिद्द व चिकाटीने अभ्यास करून यश प्राप्त करावे. तसेच, गुणवत्तेची कास धरावी. त्यामुळे जीवनात आपल्याला उचित ध्येय गाठता येते. स्पर्धा परिक्षांचा जास्तीत जास्त अभ्यास करुन भविष्यात आपण देखील आयपीएस सारखे अधिकारी बनु शकाल. त्या करिता जिद्द व कसोटी लाख मोलाची आहे, असे प्रतिपादन वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे यांनी केले. मुरूड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयातील एनएसएस युनिट १०च्यावतीने विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

## चिपले ते मोरबे मार्गाची दुरवस्था



**| पनवेल | प्रतिनिधी |**

चिपले ते मोरबे मार्गाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून या रस्त्यात मोठमोठे खड्डे तयार झाले आहेत. या मार्गावर सतत वाहनांची वर्दळ असल्याने नागरिकांना दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. तसेच, पनवेल-बदलापूर हा महत्त्वाच्या राष्ट्रीय मार्ग देखील याच ठिकाणी असल्याने वाहतूक कोंडीची गंभीर परिस्थिती उद्भवत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने तातडीने यामार्गावरील खड्डे बुजवून रस्ता दुरुस्त करावा, अशी जोरदार मागणी परिसरातून होत आहे.

## शिकारीला परवानगी?

राज्यात सध्या बिबट्यांनी धुमाकूळ घातला आहे. गेल्या शुक्रवारी नाशिकमध्ये भर वस्तीत व भर दुपारी तब्बल दोन तास बिबट्याने सर्वांना वेठीला धरले होते. त्याच्या हल्ल्यांमध्ये एका वनसंरक्षकासह पाच जण जखमी झाले. यानंतर सोमवारी पुन्हा भोसला मिलिटरी स्कूलच्या आवारात बिबट्याचे दर्शन झाल्याने पळापळ झाली. त्यानंतर काल बुधवारी नागपुरात भर वस्तीत बिबट्या शिरला. अनेक ठिकाणी नागरिकांवरचे बिबट्यांचे हल्ले वाढत चालले असून मध्यंतरी त्याने काही लहान मुलांना उचलून नेल्याच्या घटनाही घडल्या आहेत. एकूण जंगले व रानेवने अपुरी पडू लागल्याने बिबटे आता सर्रास माणसांच्या वस्तीत येऊ लागले आहेत. पुणे जिल्ह्यात तर कहर झाला आहे. तिथे जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरुर या चार तालुक्यांमध्ये तब्बल १२०० बिबटे असून नद्यांचे पूल किंवा गोठे यांच्या आसपास सर्रास त्यांचा वावर दिसून येतो. या चार तालुक्यांमध्ये धरणे व कालवे यांचे विपुल पाणी उपलब्ध आहे. त्यावर घनदाट ऊस बाराही महिने उभा असतो. शिवाय भीमाशंकरचे जंगलही नजीक आहेच. उसाच्या शेतांमध्ये लपणे व वस्ती करणे बिबट्यांना सोईचे ठरते. मात्र त्यांना त्या प्रमाणात खाद्य उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे मग ते मानवी वस्तीत शिरून कोंबड्या, कुत्रे व गाई-गुरे मारण्यास सवकले आहेत. संध्याकाळनंतर एकट्यादुकट्याने वावरणे वा प्रवास करणे जोखमीचे झाले आहे. पूर्वी बायामाणसे दूर दूर डोंगरांमध्ये निर्भयपणे एकट्याने कामे करीत असत. ते आता अवघड बनले आहे. बिबट्या, वाघ, सिंह हे प्राणी आपल्या भक्ष्याचा नेहमी गळा पकडतात. त्याचा प्रतिकार करण्यासाठी जुन्नर भागातील शेतकरी महिला काटेरी पट्टा गळ्याभोवती लावून बाहेर पडत असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. आदिवासी भागातील शाळांमधल्या उपस्थितीवरही याचा परिणाम होऊ लागला आहे. मुंबई व ठाण्यासारख्या घनदाट वस्त्यांमध्येही बिबट्यांचे दर्शन अधूनमधून होत असते. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या परिसरात शंभर चौरस किलोमीटरमध्ये तब्बल ५४ बिबटे आहेत. याखेरीज वाघ वगैरे वेगळेच. त्यामुळे हे जंगल अपुरे पडत चालले आहे हे उघड आहे.

### गोळ्या घाला– गाडगीळांची सूचना

एकूणच, बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी दीर्घकालीन उपाय करण्याची गरज निर्माण झाली आहे. सरकारचे वनखाते नेहमी दोन उपाय सुचवते. एक म्हणजे बिबट्यांचे कुटुंबनियोजन करणे आणि एका ठिकाणचे बिबटे उचलून दुसऱ्या अधिवासात सोडणे. पण हे दोन्ही उपाय काहीसे कुचकामी ठरू लागले आहेत. बिबट्यांना पकडून त्यांच्यावर कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करणे हे कठीण आणि खर्चिक आहे. शिवाय जादा झालेले बिबटे दुसऱ्या अधिवासात सोडणार तरी कुठे असाही प्रश्न आहे. कारण, आज देशात सर्वत्र बिबट्यांची संख्या वाढत चालली आहे. बिबट्यांच्या मादीला एका वेळी दोन किंवा तीन पिल्ले होतात व त्यांच्या जगण्याचा दर जवळपास शंभर टक्के असतो. शिवाय बिबट्या हा मनुष्यवस्तीच्या जवळ राहून जुळवून घेणारा प्राणी आहे. वाघ सहसा एकांतप्रिय असतो. त्याला मानवाचा सहवास आवडत नाही. त्यामुळे तो घनदाट जंगलात आतमध्ये राहणे पसंत करतो. बिबट्याचे तसे नाही. तो भरपूर रहदारी व माणसांची ये-जा असलेल्या भागांमध्येही लपून राहू शकतो. त्यामुळे या वाढत्या संख्येबाबत निराळा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. अलिकडेच पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांनी बिबट्यांना सरळ गोळ्या घालून मारले तरच त्यांची संख्या कमी होऊ शकेल असे मत व्यक्त केले. बिबट्यांना बंदुकीने मारण्याची परवानगी सरकारने द्यायला हवी असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांच्यासारख्या ज्येष्ठ अभ्यासकाने ही सूचना केल्याने तिचा गांभीर्याने विचार करायला हवा.गाडगीळांचे म्हणणे असे की, बिबट्यांच्या शिकारीला स्थानिक शेतकऱ्यांना सशर्त परवानगी द्यावी व त्याची कातडी त्यांनाच बक्षिस द्यावी. त्याची किंमत त्यांनी ग्रामसभेत जमा करावी. वन्यप्राण्यांचे रक्षण करा असे शहरांमध्ये राहून बोलणे सोपे आहे. पण प्रत्यक्ष ज्यांना बिबट्यांच्या दहशतीखाली वावरावे लागते त्या बायका, मुले, माणसे यांच्या दृष्टीने विचार करा असे ते म्हणतात. माणसांचा विकास हा आजवर जंगलांचा आणि तिथल्या प्राण्यांचा बळी घेत आलेला आहे. म्हणून माणसानेच स्वतःवर काही निर्बंध लादून घेतले. पण त्यामुळे हा समतोल वन्य प्राण्यांच्या बाजूने अवास्तव झुकत असेल तर त्याचा फेरविचार करावा लागेल असा गाडगीळ यांच्या म्हणण्याचा सारांश आहे.

### माकडे, डुक्कर, हत्ती, हरिणे

गाडगीळांच्या म्हणण्याशी तमाम भारतभरातले शेतकरी व गावकरी सहमत होतील. कारण आज बिबटेच नव्हे तर रानडुकरे, हरणे, वाघ, हत्ती यांच्यामुळे होणारा उपद्रव सर्वत्र वाढला आहे. एका आकडेवारीनुसार गेल्या पाच वर्षात महाराष्ट्रात विविध जंगली प्राण्यांच्या हल्ल्यात सुमारे साडेतीनशे लोकांचे बळी गेले आहेत. जखमी झालेले आणखी वेगळे. सिंधुदुर्ग, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी गेल्या अनेक वर्षांपासून हत्तींच्या कळपांची दहशत आहे. हे कळप झुंडीने येतात व सर्व पिके नष्ट करतात. घाटावर तीच स्थिती हरणांची आहे. कोकणात माकडांचाही प्रचंड उपद्रव आहे. आंबे, नारळ किंवा कोणतीही फळे तर सोडाच पण ते झाडावरचा पालाही ओरबाडून खातात. खाण्याहून अधिक नुकसान करतात. यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकरी वारंवार करतात. पण वन खाते काहीही करत नाही. मात्र जराही कोठे माकडाची किंवा हरणाची शिकार झाल्याचा संशय आला की चौकशांचा फेरा सुरू होतो. एकेकाळी भारतात अनिर्बंध शिकारी झाल्याने चित्ता नामशेष झाला. वाघ संकटात आला. त्यामुळे शिकारीवर सरसकट बंदी घालण्यात आली. त्याचा शेतीवर काय परिणाम होईल याचा विचार करण्यात आला नाही. त्याचा परिणाम म्हणून हरणे, डुकरे यांची संख्या बेसुमार वाढली. उत्तर भारतात नीलगायींचा उपद्रव असाच वाढला. गाडगीळ यांचे म्हणणे असे आहे की जगात कोठेही शिकारीला बंदी नाही. कारण, हे प्राणी नष्ट होणाऱ्यातील नाहीत. भारतानेही हाच मार्ग आता स्वीकारायला हवा. त्यांच्या शिकारी थांबवल्या की त्यांचे पुनरुत्पान वेगाने सुरु होतेच. अर्थात गाडगीळांचे म्हणणे सहजासहजी मान्य होण्यातले नाही. याचे कारण एक समाज म्हणून आपण मर्यादा पाळायला शिकलेलो नाही. एकदा शिकारीला परवानगी मिळाली की, मर्दुमकी दाखवण्यासाठी वा उगाच गंमत म्हणून बिबट्या किंवा वाघांच्या शिकारी सुरू होतील. हरणे मारून खाल्ली जातील. डुकरांच्या शिकारी सध्या कोकणात चोरून होतातच. त्या सर्रास होऊ लागतील. गाडगीळ सशर्त परवानगी देण्याचे म्हणत आहेत. पण सरकारच्या कोणत्याच अटीशर्ती मानायच्या नाहीत ही आपली सार्वत्रिक परंपरा आहे. कारखाने, रस्ते, वीजप्रकल्प उभारताना भांडवलदार आणि घरे बांधताना सामान्य माणसे असल्या अटी धाब्यावर बसवत असतात. त्यामुळे काही अटी घालून शिकारीला परवानगी देणे गरजेचे असले तरी वाटते तितके सोपे नाही.

विचार

# बंदरांच्या आधुनिकीकरणातून अर्थशक्तीचा उदय

***भारताचा सुमारे ९५ टक्के व्यापार समुद्रमार्गे होतो. समुद्र हा भारताच्या व्यापाराचा जीवनमार्ग आहे. कच्चे तेल आणि कोळशापासून इलेक्ट्रॉनिक्स, कापड आणि कृषी उत्पादनांपर्यंत देशाच्या आयात आणि निर्यातीचा मोठा भाग व्यस्त बंदरांमधून जातो. जागतिकीकरणामुळे पुरवठा साखळ्यांमध्ये खोलवर परस्परावलंबन निर्माण झाले असून भारत एक प्रमुख उत्पादन आणि ऊर्जा केंद्र म्हणून उदयास आला आहे.***



**प्रा. सुखदेव बखळे**

जागतिक सागरी शक्ती म्हणून स्वतःला स्थापित करण्याच्या उद्देशाने एक धाडसी पाऊल उचलून भारताने 'मेरीटाईम इंडिया व्हिजन २०३०' (एआयव्ही) लाँच केले. २०२१ मध्ये सुरू झालेल्या या परिवर्तनकारी रोडमॅपमध्ये १५० हून अधिक धोरणात्मक उपक्रमांचा समावेश आहे. बंदरांचे आधुनिकीकरण, शिपिंग क्षमता वाढवणे आणि क्षमता आणि कौशल्य विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून अंतर्गत जलमार्गांना बळकट करणे हे या दृष्टिकोनाचे उद्दिष्ट आहे. केवळ मालवाहतुकीचा आराखडा न राहता 'एमआयव्ही २०२०' हे व्यापार, गुंतवणूक आणि रोजगारासाठी एक उत्प्रेरक आहे. यामुळे भारताच्या आर्थिक विकासाचा आणि जागतिक स्पर्धात्मकतेचा मार्ग मोकळा होतो. भारताचे सागरी क्षेत्र वेगाने वाढत आहे. बंदरे, किनारी नौवहन आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये विक्रमी कामगिरी भारताला आर्थिक विकासाच्या नवीन मार्गावर पुढे नेत आहे. या क्षेत्राची प्रगती राष्ट्राला बळकट करण्यात त्याची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करते. भारताच्या बंदर क्षेत्राने प्रचंड परिवर्तनकारी झेप घेतली आहे. बंदरांची एकूण क्षमता १४० कोटी टनांवरून २७६.२ कोटी टन झाली आहे. क्षमतेतील ही वाढ आधुनिकीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विकासात होणाऱ्या मोठ्या गुंतवणुकीचे प्रतिबिंब आहे. मालवाहतुकीचे प्रमाणदेखील प्रभावीपणे वाढले, ९७.२ दशलक्ष टनांवरून १५९.४ दशलक्ष टन मालवाहतूक झाली. यावरून सागरी व्यापारात आणि बंदरांच्या कार्यक्षमतेत प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते.

२०२४-२५ मध्ये प्रमुख बंदरांमधून ८५.५ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली. २०२३-२४ मध्ये या बंदरांमधून ८१.९ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली होती. कामकाजात लक्षणीय सुधारणा झाल्यामुळे जलवाहतुकीचा सरासरी वेळ ९३ तासांवरून फक्त ४८ तासांवर आला आहे. यामुळे एकूण उत्पादकता आणि जागतिक स्पर्धात्मकता आणि या क्षेत्राची आर्थिक ताकददेखील वाढली आहे. या क्षेत्राचा निव्वळ वार्षिक अधिशेष १,०२६ कोटी रुपयांवरून ९,३५२ कोटी रुपयांपर्यंत झपाट्याने वाढला आहे. तो महसूल निर्मिती आणि खर्च व्यवस्थापनात सुधारणा दर्शवतो. ऑपरेटिंग रेशो ७३ टक्क्यांवरून ४३ टक्क्यांपर्यंत सुधारणे हे संवहनी आणि फायदेशीर बंदर ऑपरेशन्सच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. भारताचे शिपिंग क्षेत्र सातत्याने विकसित होत आहे. भारतीय ध्वजांकित जलवाहतुकीची संख्या १,२०५ वरून १,५४९ पर्यंत वाढली आहे. ती देशाच्या व्यापक सागरी उपस्थितीचे संकेत देते. भारतीय ताफ्याचे एकूण टनेजदेखील दहा दशलक्ष ग्रॉस टनांनी वाढून १.३५ कोटी ग्रॉस टन झाले आहे. त्यांची शिपिंग क्षमता अधिक मजबूत आणि अधिक सक्षम होण्याची अपेक्षा आहे. किनारी शिपिंगमध्येही लक्षणीय गती दिसून आली आहे. मालवाहतूक ८.७० दशलक्ष टनांवरून १६.५० दशलक्ष टन झाली आहे. यामुळे कार्यक्षम, परवडणाऱ्या आणि पर्यावरणपूरक वाहतुकीच्या पद्धतींकडे कल वाढतो.

भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरणाने (आयडबल्यूएआय) म्हटले आहे, की ते १४.६० दशलक्ष टन मालाची विक्रमी वाहतूक करेल. ही आंतरदेशीय जलवाहतूक क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक घटना आहे. २०१४ च्या १.८० दशलक्ष टनाच्या तुलनेत ही वाढ ७१० टक्के आहे. 'आयडब्ल्यूएआय'ने 'हल्दिया मल्टीमोडल टर्मिनल' (एमएमटी) आयआरसी नॅचरल रिसोर्सेस सकडे सोपवले आहे. सरकार आणि खासगी क्षेत्राच्या भागीदारीमध्ये अंतर्गत जलमार्ग पायाभूत सुविधांचे अपग्रेडिंग आणि बहुमॉडेल वाहतुकीला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. जागतिक बँकेच्या मदतीने बांधलेल्या पश्चिम बंगालमधील टर्मिनलची क्षमता ०.३० दशलक्ष टन आहे. प्रवासी जलवाहतूक आणि रोप-पॅक (वाहने आणि वाहने वाहून नेणारी जहाजे) ची लोकप्रियतादेखील बरीच वाढली आहे. २०२४-२५ मध्ये ७.५ कोटींहून अधिक वाहने त्यातून प्रवास करतील. यावरून दिसून येते, की लोक सुरक्षित आणि कार्यक्षम प्रवासासाठी जलद गतीने जलआधारित वाहतुकीचा अवलंब करत आहेत. २०३० मध्ये बंदरे, जहाजबांधणी आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये एकूण ३-३.५ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची योजना आहे.

जहाजबांधणीला चालना देण्यासाठी आणि सागरी परिसंस्थांना पुनरुज्जीवित करण्यासाठी अलीकडेच जाहीर केलेल्या ६९ हजार ७२५ कोटी रुपयांच्या ऐतिहासिक पॅकेजसह इंडिया टू कॉन्टिनेंटल वर्ल्डवाइड त्याच्या विशाल किनाऱ्याचा वापर करून स्थापनेसाठी एक धोरणात्मक मार्ग तयार करत आहे. लक्ष्यित वाटप आणि धोरणात्मक उपक्रम एकूण दृष्टिकोनाशी सहज जोडलेले आहेत. त्यामुळे प्रस्तावित गुंतवणूक यशस्वी होते. प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. सागरी विकास निधी (एमडीएफ) भारताच्या नेव्हिगेशनल क्षमता आणि जहाजबांधणी क्षमतेच्या विस्तारासाठी दीर्घकालीन वित्तपुरवठा करेल. याव्यतिरिक्त, २४ हजार ७३६ कोटी रुपयांच्या खर्चासह सुधारित जहाज बांधणी वित्तीय सहाय्य योजना (एसबीएफएएस) देशांतर्गत खर्चाशी संबंधित तोटे दूर करेल. १९,९८९ कोटी रुपयांच्या खर्चासह, जहाज बांधणी विकास योजना (एसबीडीएस) ग्रीनफील्ड क्लस्टर्स, यार्डचा विस्तार आणि जोखीम कव्हरेजला प्रोत्साहन देते. याव्यतिरिक्त, विशाखापट्टणममध्ये ३०५ कोटी रुपये खर्चून बांधलेले 'इंडियन शिप टेक्नॉलॉजी सेंटर' (आयएसटीसी) हे जहाज डिझाइन, संशोधन आणि विकास, अभियांत्रिकी आणि कौशल्य विकासाचे राष्ट्रीय केंद्र आहे.

ईशान्य भारतातील अंतर्देशीय जलमार्ग पायाभूत सुविधांच्या विकासात एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करण्यात आली आहे, जी देशाच्या नदी नेटवर्कद्वारे वाहतूक आणि व्यापाराला महत्त्वपूर्ण चालना देते. या गुंतवणुकीपैकी सुमारे तीनशे कोटी रुपयांचे प्रकल्प आधीच पूर्ण झाले आहेत तर उर्वरित प्रकल्प अद्याप पूर्ण झालेले नाहीत. त्यात कनेक्टिव्हिटी आणि प्रादेशिक व्यापार वाढवणे समाविष्ट आहे. या प्रदेशात मोठ्या प्रमाणात पर्यटन सुरू करण्याची तयारी सुरू आहे. हावडा येथील हुगळी कोचीन शिपयार्डमध्ये २५० कोटी रुपयांच्या एकत्रित गुंतवणुकीसह दोन लक्झरी क्रूझ जहाजे बांधली जात आहेत. हे जहाज ब्रह्मपुत्रा नदीतून प्रवास करेल. सरकारच्या 'क्रूझ इंडिया मिशन'अंतर्गत आसामच्या नदी पर्यटनाच्या लँडस्केपमध्ये ते बदल घडवून आणील, अशी अपेक्षा आहे. भारताला 'सागरमाला प्रकल्प' हा 'समुद्री भारत व्हिजन २०३०' आणि 'समुद्री अमृत कल व्हिजन'चा एक प्रमुख आधारस्तंभ आहे. हा कार्यक्रम लॉजिस्टिक्स खर्च कमी करणे, व्यापार कार्यक्षमता वाढवणे आणि हरित वाहतूक नेटवर्कद्वारे रोजगार निर्माण करणे यावर केंद्रित आहे. याअंतर्गत, २०३५ पर्यंत ५.८ लाख कोटी रुपयांचे ८४० प्रकल्प राबवले जातील. त्यापैकी १.४१ लाख कोटी रुपयांचे २७२ प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

भारताचे सागरी क्षेत्र एका निर्णायक दशकात प्रवेश करत आहे. तिथे नवीन कायदे, मोठे प्रकल्प आणि जागतिक गुंतवणूक महत्त्वाकांक्षा 'सागरी भारत व्हिजन, २०३०' ला आकार देत आहेत. हरित तंत्रज्ञान आणि डिजिटल नवोपक्रमावर भर देऊन भारत केवळ त्याच्या व्यावसायिक मागण्या पूर्ण करण्यासाठीच नाही, तर सागरी क्षेत्रात एक नेता म्हणून उदयाला येण्यासाठीही सज्ज होत आहे. हे लक्षात घेऊन 'सागरी अमृतकाल व्हिजन, २०४७' तयार केले जात आहे. तो भारताच्या सागरी पुनरुत्थानाचा दीर्घकालीन रोडमॅप आहे. त्यात बंदरे, किनारी नौहरगोहन निर्माण यांचा समावेश आहे. 'हरित नेव्हिगेशन' उपक्रमांसाठी सुमारे ८० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राखून ठेवण्यात आली आहे.

# हवामान न्यायावर भारताचा भर

**सुयोग आंग्रे**

ब्राझीलमधील बेलेम येथे आयोजित काप ३० परिषदेने हवामान बदलाबाबत विकसित देशांची तीव्र असंवेदनशीलता उघड केली आहे. हवामान बदलाच्या आव्हानाचा सामना करण्यासाठी जागतिक प्रयत्नांना जवळपास तीन दशके लागली आहेत. या संदर्भात, संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या काप परिषदा त्यांच्या भूमिकेवर टिकून राहण्यास सक्षम नाहीत. या वार्षिक परिषदा विरोधाभासांचे व्यासपीठ बनल्या आहेत. ऐतिहासिक दृष्ट्या जगातील सर्वात मोठे प्रदूषण करणारे विकसित देश उर्वरित जगाकडून परिस्थिती सुधारण्यासाठी खूप अपेक्षा करत आहेत, परंतु त्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध करून देण्याची तयारी दाखवत नाहीत. विकसनशील देशांचे म्हणणे आहे की त्यांना दरवर्षी १.३ ट्रिलियन डॉलर्सची गरज आहे. तर विकसित देशांनी २०३५ पर्यंत केवळ ३०० अब्ज डॉलर देण्याचे आश्वासन दिले आहे. त्यातही बहुतांश रक्कम कर्ज म्हणून दिली जाईल. यामुळे गतिरोध आणखी वाढणे स्वाभाविक आहे. विकसित देशांची दुहेरी वृत्ती आणि भू-राजकीय अस्थिरतेच्या सध्याच्या परिस्थितीत भारत गंभीर, न्याय्य आणि तत्त्वावर आधारित मार्ग दाखवत आहे. या मालिकेतील पहिला मुद्दा म्हणजे समानता आणि हवामान न्याय यावर जोर देणे. पॅरिस कराराचे स्वरूप अचानक बदलता येणार नाही याची आठवण भारताने जगाला करून दिली. विकसित आणि विकसनशील देशांमधील विकासाच्या पातळीत मोठा फरक असल्याचा भारताने पुनरुच्चार केला आणि या संदर्भात, सामायिक जबाबदारीचे प्रयत्न कमकुवत केल्याने विश्वास कमी होईल. या दिशेने मागणी अगदी सोपी आहे की जे देश आधीच मोठ्या प्रमाणात प्रदूषण करत आहेत त्यांनी केवळ उत्सर्जन कमी केले पाहिजे असे नाही तर विकसनशील देशांना आवश्यक ते समर्थन देखील दिले पाहिजे. विकसित देशांनी २०५० पूर्वी निव्वळ शून्य उत्सर्जनाची पातळी गाठली पाहिजे, जेणेकरून विकसनशील अर्थव्यवस्थांसाठी योग्य पाया तयार करता येईल यावर भारताने भर दिला आहे. त्याच्या अनुपस्थितीत, जागतिक हवामान फ्रेमवर्क असमानता वाढवण्याचे केवळ एक माध्यम आहे. भारताच्या पर्यावरणीय चमूने स्पष्टपणे सांगितले आहे की प्रदान करण्यात येणारी आर्थिक संसाधने ही बेलआउट नसून कलम ९.१ अंतर्गत कायदेशीर बंधन आहे. त्यात हवामान वित्ताची सर्वमान्य व्याख्या, अनुकूलन वित्त आणि अंदाजे सवलतीच्या संसाधन प्रवाहात १५ पट वाढ करण्याची मागणी केली आहे. यासाठी अब्जावधी नव्हे तर अब्जावधी डॉलर्सची आवश्यकता असेल. या क्रमाने, भारताने खाजगी वित्त किंवा कर्ज आणि प्रचंड पॅकेजेसवर अवलंबून राहण्याचा गैरसमजही उघड केला आहे. अशा उपाययोजनांमुळे कर्जाचे संकटच वाढते. त्यामुळे प्रत्यक्ष अनुदानास प्राधान्य द्यावे. विकसनशील देशांनी त्यांची ऊर्जा प्रणाली बदलून शेतीला लवचिक बनवण्याची अपेक्षा जग करू शकत नाही. या सगळ्यामागे काय आहे, विकसनशील देश महागड्या कर्जावर जास्त व्याज देण्यात व्यस्त आहेत. भारतातीळ पर्यावरण तज्ज्ञांच्या मते , तंत्रज्ञानाची उपलब्धता हा हक्क असला पाहिजे आणि सौदेबाजीची चिप नाही. हवामान बदलाच्या आव्हानाचा सामना करण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान बौद्धिक संपदा हक्कांच्या नावाखाली विकसनशील देशांसाठी अगम्य आहे. त्यामुळे बौद्धिक संपदा आणि बाजारातील अडथळे दूर केले पाहिजेत. त्यावर उपाय आधीच अस्तित्वात आहे, अशीच परिस्थिती आहे, मात्र त्याच्या उपलब्धतेत अडथळे येत असल्याने समस्या अधिकच बिकट होत चालली आहे. हे निष्काळजीपणा पेक्षा कमी नाही. भारताने सीईबीएएमसारख्या एकतर्फी हवामान शुल्काकडे लक्ष वेधले जे केवळ कलम ३.५ चे उल्लंघन करत नाही तर हवामान धोरणाला संरक्षणवादाचे साधन बनवते. भारताने स्पष्टपणे इशारा दिला की अशा उपायांमुळे बहुपक्षीयतेच्या भावनेला धक्का पोहोचतो. याद्वारे, अशा देशांना लक्ष्य केले जाते ज्यांना शाश्वत विकासासाठी धोरणात्मक उपायांची आवश्यकता आहे. हवामान बदलाची वाढती समस्या सोडवण्यासाठी भारताच्या बोलण्यात आणि कृतीत फरक नाही. त्याच्या यशामुळे त्याच्यावर विश्वास निर्माण होतो. डेटा दर्शवितो की भारताने २००५ पासून उत्सर्जनाची तीव्रता ३६ टक्क्यांहून अधिक कमी केली आहे आणि २०३० चे नॉन-जीवाश्म क्षमतेचे लक्ष्य पाच वर्षे लवकर गाठले आहे. भारताने २५६ पेक्षा जास्त स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षमता विकसित केली आहे. हायड्रोजन, अणुऊर्जा आणि जैवइंधन यांच्यावर खोलवर परिणाम करणाऱ्या मोहिमा सुरू करण्यात आल्या आहेत. समाजाच्या सहभागातून दोन अब्जाहून अधिक झाडे लावण्यात आली आहेत. इंटरनॅशनल सोलर अलायन्ससारख्या अनेक जागतिक मंचांच्या नेतृत्वाशीही ते संबंधित आहेत. या काप परिषदेचे सार हे आतापर्यंत समोर येत आहे की, हवामान बदलाच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी संक्रमण काळात, व्यापार युद्धासारख्या परिस्थितीच्या छायेखाली, श्रीमंत देश त्यांच्या आवश्यक भूमिकेपासून दूर जात आहेत. तर भारताने दाखवून दिले आहे की प्रामाणिक मार्ग कसा असतो. विकसित देश त्याचा अवलंब करायला तयार आहेत का, हा प्रश्न आहे.

लोकसंसद

## कीर्तनकारांच्या मुखी घोडे लावण्याची भाषा शोभते का ?

महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार, प्रबोधनकार निवृत्ती देशमुख अर्थात इंदुरीकर महाराज यांच्या मुलीचा साखरपुडा काही दिवसापूर्वी संगमनेर येथील वसंत लॉन्स येथे पार पडला या इव्हेंटमध्ये साऱ्यांचे अंदाज चुकवत महाराजांनी या साखर पुड्यावर मोठ्या प्रमाणात खर्च केल्याने ते चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत इंदुरीकर महाराज फेमस झाले ते आपल्या विनोदी कीर्तनाच्या शैलीने मात्र आता मुलीच्या साखर पुड्याच्या निमित्ताने या कार्यक्रमात प्रचंड खर्च करुन उधळपट्टी केल्याने त्यांच्यावर संपूर्ण महाराष्ट्रातून आणि सोशल मीडियामधून टिका होत असल्याने पुन्हा एकदा ते चर्चेत आले आहेत इंदुरीकर महाराज यांची कन्या ज्ञानेश्वरी देशमुख आणि साहिल चिलाप यांचा साखरपुडा संपन्न झाला साहिल चिलाप हे बांधकाम व्यावसायिक असून त्यांचा मुंबईमध्ये मोठा व्यावसाय आहे, सोबतच त्यांच्या मुळ गावी पुणे जिल्ह्यातल्या जुन्नरमध्ये त्यांची बागायती शेती देखील असल्याची माहिती समोर येत आहे पोरींनी लग्नात गॉगल घालून नाचू नये, गालांना मेकअप करु नये, डोळ्याखाली खाचात रंग भरु नये, लिपस्टिक लावू नये, वरात काढू नये आणि काढलीच तर त्यात नाचू नये आशा एक ना अनेक गोष्टी सांगून अनेकांना घायाळ करत असत, लग्नं साधीचं केली पाहिजेत, लग्न साधं केलं तरी मुलं होतात, कमी माणसं बोलवावीत, लग्नाचा फालतू खर्च कमी करुन तो पैसा सामाजिक कार्याला दिला पाहिजे, लग्नात बडेजाव करु नये, गाड्या अन् घोड्यांचे प्रदर्शन करु नये असे आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून सांगायचे हा उपदेश चांगलाच आहे त्यामुळे त्यात दुमत नाही त्यांनी ज्या, ज्या गोष्टींवर टिकाटिप्पणी केली होती त्या सर्व गोष्टी त्यांच्या या सोहळ्यात साजऱ्या झाल्याचे वृत्त आहे त्यांची मुलगी गॉगल घालून कारच्या सनरुफमध्ये उभी राहुन नाचलीय त्यामुळे महाराजांच्या उपदेशाला तडा गेलाय म्हंटले तरी वावगे ठरणारं नाही लोका सांगे ब्रम्हज्ञान आणि स्वतः मात्र कोरडे पाषाण म्हणायची वेळ आली आहे दरम्यान त्यांनी म्हंटले आहे की लोकांनी आम्हाला घोडे लावलेत हि भाषा त्यांना शोभते का ? अतिशय प्रतिकूल विषय मांडत सामान्य लोकांच्यावर प्रहार केला आहे ज्या गोष्टींवर टिका केली आहे तिचं गोष्ट त्यांनी केली असेल तर ती नैतिकदृष्ट्या चूकचं म्हणावी लागेल एखादी प्रसिद्ध व्यक्ती जेंव्हा लोकांना चार गोष्टी सुनावते आणि त्यांच्या हातून त्याचं गोष्टी घडतात तेंव्हा लोक त्यावर तोंडसुख घ्यायला मागे पुढे पहात नाहित मग तो कोणी का असेना, त्याची गय केली जात नाही हे या निमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले आहे!

**राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

दिनविशेष

## जागतिक दूरदर्शन दिन

जागतिक दूरदर्शन दिन दरवर्षी २१ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. माहिती, ज्ञान, मनोरंजन आणि संवाद ही त्याची चतुसूत्री आहे. म्हणूनच जागतिक दूरदर्शन दिनाची सुरुवात संयुक्त राष्ट्रांनी १९९६ मध्ये केली. त्याच वर्षी, संयुक्त राष्ट्रांनी पहिल्या जागतिक दूरदर्शन मंचाचे आयोजनही केले. या फोरममध्ये जगभरातील मीडिया व्यक्तिमत्त्वांनी टेलिव्हिजनच्या वाढत्या महत्त्वावर चर्चा केली. तेव्हापासून, संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने दरवर्षी २१ नोव्हेंबर हा जागतिक दूरदर्शन दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. माहितीच्या प्रसारामध्ये टेलिव्हिजनची भूमिका आणि जागतिक स्तरावर निर्णय घेण्याच्या प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याची त्याची क्षमता अधोरेखीत करण्यासाठीही हा दिवस साजरा होतो.. आता बाजारात 4k, HD, LCD, LED असे अनेकप्रकारचे टिव्ही आल्याने आत्ताच्या पोरांना त्याचं विशेष कौतुक वाटत नाही. प्रत्येकाच्या हातात मोबाईल आल्याने तर ही उत्सुकता शुन्यच झाली आहे. पण १९७०-८० दरम्यान पुर्ण गल्लीत एक टिव्हिचा काळा डब्बा असला तरी भारी काहीतरी वाटायचं. खाटेवर बसलेले बाबा जे सांगतील तेच चॅनल सर्वांना बघाव लागणार. कधी रामायण कधी महाभारत तर कधी अमिताभ यांचा एखादा जुना मुव्ही.? युनायटेड नेशन्सने १७ डिसेंबर १९९६ रोजी एक समिती तयार केली. त्यांनी समाजाच्या मनात दूरगामी परिणाम करणारे तसेच आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पैलूंशी संबंधित माहितीच्या जागतिक देवाणघेवाण करणारे माध्यम म्हणून टेलिव्हिजनचे महत्त्व ओळखले. त्यासाठीच समितीने २१ नोव्हेंबर हा जागतिक दूरचित्रवाणी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. टेलिव्हिजन हे जनसंवादाचे असे माध्यम आहे ज्याद्वारे तुम्ही शिक्षण, बातम्या आणि मनोरंजन उपक्रमांशी जोडलेले राहता, तुमच्यापर्यंत माहिती पोहोचवण्यासाठी हे एक उत्तम माध्यम आहे. ब्लॅक अँड व्हाईटपासून सुरू झालेला हा प्रवास आज स्मार्ट टीव्हीपर्यंत पोहोचला आहे. आज क्वचितच असे घर असेल जिथे टीव्ही नाही. टीव्ही हे आपले मनोरंजनाचे साधन तर आहेच, पण त्याद्वारे आपल्याला देशात आणि जगात घडणाऱ्या घटनांची माहितीही मिळते. आजही इंटरनेट आणि मोबाइल क्रांतीच्या युगात क्रिकेट असो किंवा निवडणुकीचे कव्हरेज, आपल्यापैकी बहुतेकजण मोबाइलऐवजी टीव्हीवर पाहणे पसंत करतात. जागतिक दूरचित्रवाणी दिन दरवर्षी २१ नोव्हेंबर रोजी जगभरात दूरदर्शनचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने साजरा केला जातो.दूरदर्शन जे संवाद आणि जागतिकीकरणात महत्त्वाची भूमिका बजावते. त्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी तो दरवर्षी जगभरात साजरा केला जातो. कारण, दूरदर्शन हे असे जनसंवादाचे माध्यम आहे, जे मनोरंजन, शिक्षण, बातम्या आणि राजकारणाशी संबंधित सर्व क्रियाकलापांची माहिती आणि ज्ञान देते. हे शिक्षण आणि मनोरंजन या दोहोंचेही उत्तम स्रोत आहे. माहिती देऊन समाजात महत्त्वाची भूमिका बजावते. पहिला जागतिक दूरचित्रवाणी मंच २१ नोव्हेंबर १९९६ रोजी झाला आणि संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने हा दिवस जागतिक दूरचित्रवाणी दिन म्हणून घोषित केला. संप्रेषण आणि जागतिकीकरणामध्ये टेलिव्हिजन नाटकांच्या भूमिकेबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी स्थानिक आणि जागतिक स्तरावर या दिवशी बैठका आयोजित केल्या जातात. जागतिक निरिक्षण दिन प्रसारमाध्यमांची भूमिका मान्य करतो. लेखक, पत्रकार, ब्लॉगर्स आणि या माध्यमाशी संबंधित इतर लोक या दिवसाचा प्रचार करण्यासाठी एकत्र येतात. दूरदर्शन प्रसारणाच्या उदयोन्मुख आणि पारंपारिक प्रकारांमधील परस्परसंवाद आपल्या समुदायांना आणि आपल्या ग्रहाला भेडसावणाऱ्या महत्त्वाच्या समस्यांबद्दल जागरूकता वाढवण्याची एक अद्भुत संधी निर्माण करतो. 'जागतिक दूरचित्रवाणी दिन' हा सरकार, वृत्तसंस्था आणि व्यक्तींच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. जागतिक दूरचित्रवाणी दिन जगभरात एक शक्तिशाली इलेक्ट्रॉनिक माध्यम म्हणून दूरदर्शनचे कायमस्वरूपी महत्त्व ओळखतो. हे शिक्षण आणि माहिती प्रदान करताना जागतिक कनेक्टिव्हिटी सक्षम करते. दरवर्षी असोसिएशन ऑफ कमर्शियल टेलिव्हिजन, असोसिएशन ऑफ टीव्ही अँड रेडिओ सेल्स हाऊसेस आणि ग्लोबल टीव्ही ग्रुप एकत्रितपणे विविध उद्योगातील कलाकारांसह जागतिक दूरदर्शन दिनाचा प्रचार करतात. टीव्ही संप्रेषण तसेच जागतिकीकरणाला प्रोत्साहन देते आणि मनोरंजनाचे साधन म्हणूनही काम करते. जागतिक दूरदर्शन दिन टीव्हीचे आश्चर्यकारक महत्त्व अधोरेखित करतो.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२१ नोव्हेंबर**

१) श्री.प्रकाश सीताराम रानडे कोळी-वाडा, अलिबाग, २१-११-१९४४

२) श्रीम.शामला शरद बोरवणकर विद्यानगर, अलिबाग, २१-११-१९४७

३) श्री.राजेंद्र भास्कर पवार वरसोली, अलिबाग २१-११-१९५५

४)श्री.कमलाकर महादेव ठाकूर श्रीबाग-२,अलिबाग दि.२१-११-१९४५

## ज्वेलर्स मालकाची दुकानातच हत्या

**पालघर :** भाईंदर पूर्वेला सुशांत पाल या ५१ वर्षीय व्यक्तीची हत्या केल्याची घटना बुधवारी (दि.१९) उघडकीस आली आहे. नवघर पोलीस ठाणे हद्दीमध्ये सोनल पार्क बिल्डिंग क्रमांक एकच्या तळमजल्यावर ज्वेलरी बनवण्याचे दुकान असलेले दुकानदार सुशांत पाल हे मयत अवस्थेत मिळून आले. त्यांच्या डोक्यावर खोलवर जखमा झालेल्या होत्या. मंगळवारी रात्री दोन ते अडीच वाजेपर्यंत ते राहत असलेल्या दुकानात जोरजोरात आवाज येत असल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर कोणीतरी अज्ञात व्यक्तीने त्यांच्या डोक्यावर कोणत्यातरी मोठ्या जड वस्तूने मारल्याने डोक्यात अनेक जखमा झालेल्या आहेत. या घटनेची पोलिसांना बुधवारी दुपारी माहिती मिळाली. पोलिसांना माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेवून शवविच्छेदनासाठी पंडीत भीमसेन जोशी रुग्णालयात पाठवला आहे. तसेच फॉरेन्सिक व्हॅनद्वारे तपास सुरू केला आहे. तसेच या घटनेची गंभीर दखल घेऊन ही हत्या का केली, कोणी केली व कशासाठी केली याचा तपास सुरु आहे, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक धिरज कोळी यांनी सांगितले.

# बसस्थानक इमारतीचा प्रश्न ऐरणीवर

## डागडूजीअभावी बनलेय धोकादायक; परिणामी प्रवाशांचा वावरही पूर्णतः कमी






### इमारतीबाहेर उभारला वाहतूक कक्ष

मुळातच बसस्थानकाची इमारत देखभाल, दुरुस्तीअभावी धोकादायक झाल्याने अशा इमारतीत हा कक्ष उभारणे अशक्य होते. आगार प्रशासनाने नवी शक्कल लढवत हा कक्ष इमारतीबाहेर उभारला आहे. तसे पाहिल्यास एकीकडे जुन्या बसस्थानकाची इमारत हक्काची असतानाही दुसरीकडे धोकादायक स्थितीमुळे वाहतूक कक्षाची शेड आगार प्रशासनाला नाईलाजास्तव इमारतीबाहेर उभारावी लागली आहे.

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

चिपळूणच्या मुख्य बाजारपेठेतील जुन्या बसस्थानकाची इमारत देखभाल, दुरुस्ती अभावी धोकादायक झाली आहे. त्याचे छप्पर कोणत्याही क्षणी कोसळण्याच्या स्थितीत आहे. त्यामुळे प्रवाशांचा वावरही पूर्णतः कमी झाला आहे. एकीकडे बसस्थानकाची हक्काची इमारत असतानाही दुसरीकडे धोकादायक स्थितीमुळे एसटी वाहतुक कक्षांसाठीची शेड आगार प्रशासनाला नाईलास्तव इमारतीच्या बाहेर उभारावी लागली आहे.

जुना एसटी बसस्थानक सुस्थितीत कधी होणार? जुना चिपळूण बसस्थानक इमारतीची वेळीच देखभाल, दुरुस्ती झाली असती तर हा मन:स्ताप आगार प्रशासनाला सहन करावा लागला नसता. मध्यवर्ती बसस्थानकातून सुटणाऱ्या बसेस खाडी परिसरासह गुहागर मार्गाकडे जाण्यासाठी जुन्या बसस्थानकातून निकडणी करून पुढे नियोजित प्रवासासाठी जातात. त्या मार्गावरच्या प्रवाशांना बाजारपेठेतील खरेदीनंतर पुन्हा प्रवासाला निघण्यासाठी हे सोयीस्कर पडत असल्याने कायमच या बसस्थानकात प्रवाशांची गर्दी असते. असे असताना गेली कित्येक वर्षे या बसस्थानकाच्या इमारतीची देखभाल व दुरुस्ती न झाल्याने ही इमारत धोकादायक बनली आहे.

काही वर्षापूर्वी पावसाळ्यात या इमारतीच्या एकाबाजूचे छप्पर जमीनदोस्त झाले तर उर्वरित छपराची दयनीय स्थिती झाल्याने ते कोणत्याही क्षणी कोसळू शकते. अशा प्रकारामुळे त्यातील प्रवाशांचा वावर पूर्णतः कमी झाला असून प्रवासी ऊन, पाऊस सहन करत बसस्थानकाबाहेर उभे राहून एसटीची वाट पाहत असतात. यामुळे बसस्थानकाची इमारत केवळ नावालाच उरली आहे, असे बोलले जात आहे. मात्र त्या ठिकाणी मद्यपींचा वावर कायम असतो.

यावर उपाय म्हणून काही दिवसापूर्वी आगार प्रशासनाने या बसस्थानकात स्वतंत्र एसटी कर्मचाऱ्याची नेमणूक केली आहे. यामुळे खासगी पार्किंग बंद झाले. नेमणूक करण्यात आलेले कर्मचारी बसस्थानकात येणाऱ्या बसेसच्या नोंदी करतात.

# उघड्या चेंबरमध्ये चिमुकला कोसळला

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

ठाणे शहरातील राबोडी परिसरात २० फूट उघड्या चेंबरमध्ये चिमुकला कोसळल्याची घटना घडली आहे. हा प्रकार लक्षात येताच आजूबाजूच्या नागरिकांनी धाव घेत या चिमुकल्याला बाहेर काढले. हमदान कुरेशी (२) असे या मुलाचे नाव असून सुदैवाने त्याचा जीव वाचला आहे.



राबोडी येथील हमदान हा मंगळवारी दुपारी आई आणि मोठ्या भावासह मेंटल हॉस्पिटल परिसरात राहणाऱ्या नातेवाईकांकडे आला होता. घरी परतण्यासाठी त्यांचे वडील रिक्षा आणण्यासाठी गेले होते. त्यावेळी धर्मवीरनगर येथून जात असता हमदानचा तोल गेला आणि तो स्ट्रॉम वॉटर पाइपलाइनच्या उघड्या गटार चेंबरमध्ये पडला. ही बाब लक्षात येताच स्थानिक तरुणांनी घटनास्थळी धाव घेतली. यातील एका तरुणाने चेंबरमध्ये उतरून हमदानला बाहेर काढले. चिमुकल्याला तातडीने ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेले. तेथून त्याला ज्युपिटर रुग्णालयात हलवण्यात आले. घटनेची माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, नौपाडा कोपरी प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त, स्थानिक लोकप्रतिनिधी, उपनगर अभियंता, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान तसेच बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभागाचे अभियंता यांनी घटनास्थळी धाव घेतली. उघड्या चेंबरचे झाकण लोखंडी पाइपमुळे बंद होत नव्हते. त्यामुळे लोखंडी पाइप ग्रँडर व गॅस कटरच्या सहाय्याने कापून बाजूला करण्यात आला आणि चेंबर बंद केला गेला.

## थंडीच्या प्रमाणात झाली वाढ

**चिपळूण :** गेल्या आठवड्यापासून थंडीचे प्रमाण वाढले असून शहर आणि ग्रामीण भागात सुद्धा गारवा प्रचंड वाढला आहे. त्यामुळे शेकोटी पेटू लागल्या असून शेकोटीजवळ सामूहिक गप्पा सुद्धा रंगू लागल्या आहेत. ग्रामीण भागात आठवडाभरापासून जिल्ह्यात हिवाळ्याची चाहूल लागली होती; मात्र मागील चार दिवसांत गारवा वाढला आहे. शनिवारपासून पारा खाली आल्यानंतर शहरासह ग्रामीण भागात थंडीचे प्रमाण जाणवत आहे. त्यामुळे नागरिकांनी शेकोट्यांचा आधार घेण्यास सुरुवात केली आहे.

# सुरक्षेसाठी स्थानक परिसरात सुविधा वाढवा

## रेल्वे प्रवासी महासंघाची मागणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

पश्चिम रेल्वेच्या अनेक स्थानकांत विविध सुविधांची कमतरता आहे. त्यामुळे नियमित प्रवाशांची गैरसोय होत आहे, याकडे महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाने रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधले आणि प्रवासी सुरक्षेसाठी रेल्वे स्थानकांच्या परिसरात सुविधा वाढवण्याची मागणी केली. विविध रेल्वे स्थानकांचे स्टेशन मॅनेजर आणि लोहमार्ग पोलीस अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत प्रवासी सुरक्षेबाबत चर्चा करण्यात आली.



पश्चिम रेल्वे मार्गावर अलीकडेच एका गर्भवती महिलेला वैद्यकीय सुविधेअभावी त्रास सहन करावा लागला. राम मंदिर स्थानकाच्या आवारात रुग्णवाहिका नसल्यामुळे महिलेची स्थानकातच प्रसूती झाली. त्या घटनेनंतर पश्चिम रेल्वे मार्गावरील सुविधांच्या कमतरतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाने अत्यावश्यक जीवनरक्षक मेडिकल सुविधा, प्रथमोपचार औषधे, स्ट्रेचर, व्हीलचेअर, रुग्णवाहिकांची उपलब्धता, पिण्याचे पाणी, शौचालये, सरकते जिने, सीसीटीव्ही आदी मुद्द्यांबाबत प्रशासनाशी चर्चा केली. यावेळी महासंघाचे अध्यक्ष अभिजीत धुरत, महासंघाचे पश्चिम रेल्वे उपाध्यक्ष राजेश पंड्या आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## ट्रकच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**मुंबई :** गोवंडी परिसरातून भरधाव वेगात धावणाऱ्या एका ट्रकने मंगळवारी दुचाकीवरून जाणाऱ्या तिघांना धडक दिली. या अपघातात सरस्वती पूछला (४२) या महिलेचा मृत्यू झाला. सरस्वती या भाच्यासोबत दुचाकीवरून जात होत्या. शिवाजी नगर सिग्नल परिसरात वेगात आलेल्या ट्रकने त्यांना धडक दिली. यात दुचाकीवर बसलेले सरस्वतीसह तिघे गंभीर जखमी झाले. त्यांना तात्काळ गोवंडीमधील शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी सरस्वती याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

# शेवग्याच्या शेंगाचे दर वाढले

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

सहज उपलब्ध, स्वस्त आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पौष्टिक असल्याने शेवग्याची शेंग जेवणाच्या थाळीत पूर्वापार सामावून गेली आहे. कधी वरणात, सूपमध्ये, कधी भाजीत तर सांबारचं पानही शेंगेशिवाय हलत नाही. मात्र हीच शेंग सध्या बाजारात दिसेनाशी झाली आहे. कारण एरव्ही ५ रुपयांना मिळणारी एक शेंग ३० ते ३५ रुपयांपर्यंत पोहोचली आहे. लहरी हवामान, परतीच्या पावसाचा फटका शेंगा उत्पादनाला बसल्याने मुंबई एपीएमसी बाजारात शेंगांचे दर गगनाला भिडले आहेत. महाराष्ट्रातील पुणे, नाशिक तसेच गुजरात, कर्नाटक आणि तामिळनाडू येथून शहरातील ग्राहकांची मागणी भागवण्यासाठी नियमित माल येत असतो. मात्र लांबलेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात फुलगळती झाली, तर अनेक शेंगा काळवंडल्याने विक्रीयोग्य मालाच्या प्रमाणात मोठी घट झाली आहे. व्यापाऱ्यांच्या मते नवीन उत्पादन बाजारात यायला किमान एक ते दीड महिना लागणार आहे. त्यामुळे शेवग्याच्या शेंगांचे दर आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे सांगितले जात आहे. इतर भाज्यांच्या दरातही लक्षणीय वाढ झाली आहे.

## खारघरकरांची खड्ड्यांमधून होणार सुटका

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

वसाहत तसेच मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने सर्वत्र धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे नागरिकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने खारघरमधील रस्तेदुरुस्ती केली जाणार आहेत. खारघरमधील रस्त्यांचे पालिकेने पावसाळ्यापूर्वी डांबरीकरण केले होते. मात्र पहिल्याच पावसात रस्ते वाहून गेल्यामुळे खड्ड्यांतून मार्ग काढावा लागत होता. त्यामुळे नाराजी व्यक्त केली जात होती. याविरोधात खारघर तसेच पालिका मुख्यालयावर मोर्चे, आंदोलने करण्यात आली. तसेच निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यामुळे पालिकेकडून रस्ते डांबरीकरणाचे काम पुन्हा हाती घेण्यात आले आहे. तसेच १५ दिवसांत शहरातील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण पूर्ण केले जाईल, असे आश्वासन पालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये यांनी दिले आहे.

# शुल्लक कारणावरून विद्यार्थ्यांना बेदम मारहाण

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पाणी आणण्यासाठी उशीर झाल्याच्या शुल्लक कारणावरून एका शिक्षकाने विद्यार्थ्यांना बेदम मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. शिक्षकाने विद्यार्थ्यांवर निर्माण केलेल्या दहशतीमुळे विद्यार्थी शाळेत जाण्याऐवजी जंगलात लपून बसू लागल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विद्यार्थ्यांच्या छळाची ही कर्म कहाणी कळताच पालकांच्या संतापाचा स्फोट झाला. त्यांनी गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या कार्यालयावर धडक देत या शिक्षकावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

१४ नोव्हेंबर रोजी शिक्षक लोकनाथ जाधव यांनी विवेक बिपिन भोरे, साईनाथ मोरघा, स्वप्निल मोरघा, चेतन अनेक, प्रमोद जंगली या विद्यार्थ्यांना १ किलोमीटर लांब असलेल्या झऱ्यावर पाणी भरायला पाठवले, दूर अंतर असल्याने या विद्यार्थ्यांना पाणी आणण्यात उशीर झाला. इतका उशीर का झाला, असा आरडाओरडा करत या शिक्षकाने विद्यार्थ्यांना बेदम मारहाण केली. हे चित्र पाहताच उर्वरित विद्यार्थी आपला बचाव करण्यासाठी जंगलात लपून बसले. ही बाब पंचायत समितीच्या प्रशासकीय विभागाला कळूनही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.

विद्यार्थ्यांना शिक्षा म्हणून शाळेच्या अंगणात उभे करणे, कानाखाली मारणे, शिकवण्याऐवजी मोबाईलमध्ये रमणे, वारंवार उशीरा शाळेत येणे या सर्व प्रकारांनी पालक संतापले आहेत. यामुळे येथील विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ उद्भवली आहे.

### शिक्षकावर कारवाई करण्याची मागणी

> जांभूळ माथा शाळेतील शिक्षकाच्या वर्तुणुकीबाबत समजले आहे. संबंधित विभागाला या प्रकरणाची शहानिशा करून उचित कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.
>
> - मनोज रानडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर

**देवरूखचे नाव जाणार जागतिक पातळीवर** | **कृषी क्षेत्राला मोठी चालना**

# 'सप्तलिंगी लाल भाता'ला मिळणार नवी ओळख

**। संगमेश्वर । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर तालुक्यातील सुपीक दरी, सप्तलिंगी नदीचे पवित्र जल आणि स्थानिक शेतकऱ्यांची परंपरागत शेतीकला यांच्या मिलाफातून निर्माण झालेला लाल भात आता एका नव्या ओळखीसह समोर येत आहे. 'सप्तलिंगी लाल भात' या नावाने हा औषधी, चविष्ठ आणि पौष्टिक भात अधिकृतपणे ब्रँड केला जाणार असून, त्याला राष्ट्रीय स्तरावर नेण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. यामुळे तालुक्याच्या कृषी क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे.



संगमेश्वर तालुका ॲग्रोस्टार शेतकरी उत्पादक कंपनी आणि कृषी संकल्प प्राईड शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या सक्रीय सहकार्यातून हा प्रकल्प साकारला जात आहे.

कोकणातील भौगोलिक परिस्थिती आणि योग्य हवामानामुळे या भागातील लाल तांदळाला एक विशिष्ट नैसर्गिक सुगंध, चव आणि औषधी गुणधर्म प्राप्त झाले आहेत. याच भौगोलिक वेगळेपणाचा उपयोग करून देवरूखची ही ओळख आता जागतिक पातळीवर नेण्याचा प्रयत्न केला जात आहे.

सप्तलिंगी लाल भात हा आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत गुणकारी मानला जातो. यामध्ये लोहाचे प्रमाण मुबलक असल्याने तो रक्तवर्धक असून शरीरातील दाह कमी करण्यास मदत करतो. यातील उच्च फायबरमुळे पचनाच्या तक्रारी कमी होतात आणि पोट हलके राहते. तसेच नैसर्गिक अँटीऑक्सिडंट्स आणि मॅग्नेशियममुळे हृदयाचे आरोग्य उत्तम राहण्यास आणि रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत होते. विशेष म्हणजे, याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्याने रक्तातील साखर वाढण्याचे प्रमाण मंदावते, ज्यामुळे मधुमेही रुग्णांसाठी हा भात लाभदायी ठरतो. याशिवाय झिंक, बी-विटामिन्स आणि खनिजे यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते.

### आरोग्यासह अर्थव्यवस्थेचाही बनणार कणा

**उत्पादन, गुणवत्ता आणि मार्केटिंग या तिन्हींची सांगड घालत संगमेश्वर तालुक्यातून एक मजबूत ग्रामीण औद्योगिक ब्रँड उभा राहत आहे. 'सप्तलिंगी लाल भात' हा उपक्रम केवळ तंदुरुस्तीपुरता मर्यादित नसून तो स्थानिक अर्थव्यवस्था, पर्यटन आणि शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाचा एक नवा अध्याय ठरणार आहे. देवनगरी देवरुखची ही अनोखी नैसर्गिक देणगी आता आरोग्यासह अर्थव्यवस्थेचाही कणा बनणार असल्याचे दिसून येत आहे.**

# निवडक

## मानसिक तणावातून विद्यार्थ्याची आत्महत्या

**ठाणे :** कल्याणमधील तिसगाव नाका येथे एका तरुणाने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली आहे. काही दिवसांपूर्वी या तरुणाला लोकल ट्रेनमध्ये हिंदीत बोलल्याने चार ते पाच मराठी तरुणांनी मारहाण केली होती. तेव्हापासून तो मानसिक तणावात होता. अर्णव खैरे असे त्या तरुणाचे नाव असून तो कल्याण पूर्व येथील तिसगाव नाका येथे राहायचा. अर्णव मुलुंडमधील एका कॉलेजमध्ये शिकत होता. तो दरोरज कल्याणवरून ट्रेनने मुलुंडला जायचा. काही दिवसांपूर्वी ट्रेनमध्ये अर्णवचा एका प्रवाशासोबत वाद झाला होता. त्यावेळी अर्णव हिंदीत त्यांच्याशी बोलत होता. त्यावेळी त्या प्रवाशाने अर्णवला मराठी येत नाही का? मराठीत बोलायची लाज वाटते का? असे विचारले. त्यांचा हा वाद विकोपाला गेला. त्यानंतर त्या प्रवाशासोबत असलेल्या तरुणांनी अर्णवला बेदम मराहाण केली. या मारहाणीमुळे अर्णव प्रचंड तणावाखाली होता. तो ट्रेनमधून प्रवास करायला घाबरायला लागला होता. त्याला त्या घटनेचा मानसिक धक्का बसला होता. या तणावातून त्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या प्रकरणाने पुन्हा एकदा 'मराठीहिंदी' वादाचे विषारी राजकारण, भाषिक भेदभाव आणि त्याचा तरुणांच्या मनावर होणारा परिणाम यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. कोळसेवाडी पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे. रेल्वेमधील मारहाणीबाबत पोलिसांकडून स्वतंत्र तपास सुरू करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

## धुळीच्या समस्येवर पाण्याचा उपाय



**खेड :** दापोली-खेड-भरणे या मुख्य मार्गावर सतत वाहतूक सुरू असते. या रस्त्याची दुरुस्ती झालेली नसल्यामुळे दुरवस्था झालेली आहे. पावसाळा उलटून गेल्यानंतर या मार्गावर प्रचंड धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. या धुळीपासून तात्पुरता दिलासा देण्यासाठी प्रबोधनकार ठाकरे उद्यान ते मैत्री पार्कदरम्यान प्रशासनाकडून पाण्याचा फवारा मारण्यात आला. काही तासांसाठी धूळ खाली बसली असली, तरी दुपारनंतर वाहनांच्या वर्दळीबरोबर पुन्हा धुळीची तीव्रता वाढून श्वास घेणेदेखील कठीण झाले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम काही दिवसांपूर्वीच सुरू झाले होते, मात्र ते अपूर्ण राहिल्याने अनेक खड्डे आचारसंहितेच्या कचाट्यात अडकून जैसे थेच राहिले आहेत. बारीक खडी टाकलेल्या ठिकाणी विशेषतः धूळ अधिक उडत असल्याची तक्रार नागरिकांनी केली. खड्डे परवडतील, पण धूळ नको, अशी परिस्थिती बनली असून, दुकानदार आणि स्थानिक नागरिकांकडून प्रखर नाराजी व्यक्त होत आहे. तात्पुरत्या उपायांपेक्षा कायमस्वरूपी दिलासा देण्यासाठी रस्त्याचे हॉट मिक्सिंगद्वारे डांबरीकरण तातडीने करावे, अशी मागणी होत आहे.

## रस्ते, पदपथांवर वाहनांचे अतिक्रमण



**नवी मुंबई :** नेरुळच्या शिरवणे गावातील मुख्य रस्ते व पदपथांवर वाहनांनी अतिक्रमण केले आहे. परिसरातील वाहनांच्या शोरूम आणि गॅरेजकडून रस्त्यावर व पदपथावर मोठ्या प्रमाणावर वाहने उभी केल्यामुळे वाहतूक कोंडी, असुविधा आणि अपघाताचा धोका वाढला आहे. ही समस्या दिवसेंदिवस तीव्र होत असून पादचारी, शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. गावाच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत येताच रस्त्याच्या दोन्ही बाजूंना चारचाकी-दुचाकी वाहने आणि टेम्पोचे शोरूम्स तसेच गॅरेज आहेत. या शोरूम्समध्ये विक्रीसाठी ठेवलेली वाहने, गॅरेजमध्ये दुरुस्तीसाठी आलेली वाहने किंवा चाचणीसाठी काढण्यात आलेली वाहने थेट रस्त्यावर आणि पदपथांवर उभी केली जातात. आस्थापनासाठी जागा अपुरी असल्याने सार्वजनिक रस्ताच 'वाहनतळ' म्हणून वापरला जात असल्याने पादचाऱ्यांकडून याबाबत नाराजी व्यक्त होत आहे. पदपथ व रस्त्यांवरील अतिक्रमण हटवावे, शोरूम-गॅरेजची वाहने निर्धारित मर्यादेत ठेवण्यास बांधील करावे, तसेच नियमित तपासणी मोहीम राबवावी, अशा मागण्या नागरिकांनी महापालिकेला वारंवार केल्या आहेत. परंतु परिस्थितीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने स्थानिकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

## तारापूरमधील हवेची गुणवत्ता खालावली

**पालघर :** तारापूर औद्योगिक परिसरातील हवेची गुणवत्ता खालावली आहे. कारखान्यांमधून निघणारा धूर, बांधकाम प्रकल्प, रस्त्यांची कामे आणि दगड खाणींमधून हवेत पसरणारे धुलीकण यामुळे प्रदूषणात वाढ होत असून हवेचा गुणवत्ता निर्देशांक धोकादायक पातळीवर पोचला आहे. प्रदूषित हवामानामुळे श्वसन आणि इतर विकारांच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक बुधवारी १५५ या धोकादायक पातळीवर नोंदविण्यात आला. पहाटेच्या सुमारास वातावरण धूसर राहत असल्याचे बघावयास मिळत आहे. बोईसर, सरावली, खैरेपाडा, कोलवडे, पास्थळ, सालवड या औद्योगिक परिसरात आठवडाभरापासून हवेचा गुणवत्ता निर्देशांक १५० ते १६० या दरम्यान राहत असून ही पातळी लहान मुले, वृद्ध तसेच सामान्य नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक मानली जाते. प्रदूषित हवेमुळे अस्थमा, श्वास घेण्यास त्रास, सर्दी, डोकेदुखी, कफ, खोकला आणि त्वचा विकाराच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. तसेच, तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण कमी करण्यासाठी उद्योगानी कोळश्या ऐवजी स्वच्छ इंधन म्हणून पीएनजी वायूचा वापर करण्याचे निर्देश प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०१५ मध्ये दिले होते. मात्र पीएनजी इंधनाचे दर कोळशाच्या दरापेक्षा अधिक असल्याचे कारण देत उद्योगानी या निर्देशाचे पालन करण्याकडे दुर्लक्ष केल्याने हवेच्या प्रदूषणाचा प्रश्न कायम राहिला आहे.

## वेश्याव्यवसायप्रकरणी महिलेला अटक

**ठाणे :** बदलापूर पश्चिम येथील एका हॉटेलमध्ये एक दलाल महिला काही असह्य मुलींकडून वेश्याव्यवसाय करून घेण्यासाठी आल्याची माहिती ठाणे शहर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गोरडे यांना मिळाली. त्यानुसार त्यांच्या पथकाने सापळा लावून महिलेला ताब्यात घेतले. या महिलेविरोधात पथकाने बदलापूर पश्चिम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून तिच्या तावडीतून दोन पीडित मुलींची सुटका करण्यात अनैतिक वाहतूक प्रतिबंधक कक्षाला यश आले आहे. या दलाल महिलेने आणखी किती मुलींना वेश्याव्यवसाय करण्यासाठी भाग पाडले आहे. तसेच या व्यवसायात तिचे अजून किती साथीदार आहेत, याचा तपास पोलीस करीत आहेत.

# पहिल्या श्वासापासून सुरक्षिततेपर्यंत...

**आजकाल जग एवढे प्रगत झाले असले तरी आणि हल्लीच्या माता सुशिक्षित असतील तरीदेखील नवजात बाळांची काळजी कशी घ्यावी याविषयी चर्चा होणं, विचारमंथन होणं ही काळाची गरज आहे. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये अजूनही लहान बालकांची काळजी घेण्याविषयी बरेच समज-गैरसमज दिसून येतात. नवजात बालकांची काळजी कशी घ्यावी, याविषयी मातांना वेळोवेळी आरोग्यविषयक मार्गदर्शन करणं आजही गरजेचं होऊन गेलं आहे.**



**डॉ. राजेंद्र चांदोरकर**
९९७०६६६३१७

प्रसूती झाल्यानंतर नवजात बालकास मातेचा स्पर्श होणं खूप गरजेचं असतं. शक्य असेल तेव्हा प्रसूती झाल्यानंतर लगेचच बालकास मातेच्या अंगावरील दूध देणे अनिवार्य मानावे. मातेचं पहिल्या दोन ते तीन दिवसांमधील दूध ज्याला आपण चिक दूध (कॉलोस्ट्रम) म्हणतो, ते बाळाला देणं फार गरजेचं असतं, कारण चीक दुधामार्फत बाळाला आयुष्यभराची प्रतिकारशक्ती येते, वेगवेगळ्या आजारांशी लढण्याची ही अजब शक्ती असते. तसेच बाळाच्या मेंदूचीही चांगली वाढ होते व मुलांची बुद्धी वाढण्यास मदत होते. त्याचप्रमाणे सुरुवातीच्या स्तनपानाने बाळांना भविष्यात न्यूमोनिया, मेंदूज्वर, अतिसार तसेच सेप्टीसेमिया अशा प्रकारच्या गंभीर आजारांपासून संरक्षण मिळते.

प्रसूतीनंतर बाळाला आईच्या कुशीत द्यावे, मातेने बाळास स्पर्श करावा, बाळाची पा घ्यावी. मातेच्या अंगाचा स्पर्श बाळाला गरजेचा असतो. हा स्पर्श बाळाला ऊबदार ठेवतो, तसेच त्यानंतर मातेला अंगावरचे दूध येण्यास/वाढण्यासही मदत होते. मातेने बाळाबरोबर संवाद साधण्याचा प्रयत्न करावा, गप्पा मारण्याचा प्रयत्न करावा.

प्रसूती कक्षात बाळाचं अंग पुसणे, नाळ कापणे, गरज असल्यास नाका-तोंडातून सक्शन करणं इत्यादीबरोबरच बाळाला व्हिटामिन 'के'चं इंजेक्शन दिलं जातं.

माता व बाळ प्रसूती कक्षातून वॉर्डमध्ये आल्यानंतर बाळाला बाहेरून जंतुसंसर्ग होऊ नये म्हणून नातेवाईकांची वर्दळ कमी ठेवणे गरजेचे असते. नवजात बालकाची हाताळणी कमीत कमी ठेवावी. कोणी बाळाला घ्यावयाचे झाल्यास हात स्वच्छ धुवून व हाताला सॅनिटायझर लावूनच बाळाची हाताळणी करावी. बाळाला ऊबदार कपड्यांमध्ये गुंडाळून ठेवणे गरजेचे असते. बालकांना नवनवीन कपडे न घालता जुने, धुतलेले, स्वच्छ व ऊबदार कपडे घालावेत. बाळाचं डोकं व कान झाकतील अशी कानटोपी घालणे गरजेचे असते.

बाळाला दर दोन ते तीन तासांनी अंगावरील दूध द्यावे, स्तनपान करावे. जन्मतःच नवजात बालकांना पोलिओ व कावीळची लस देणे गरजेचे असते. काही कारणास्तव या लसी देण्याच्या राहून गेल्या, तर बालरोगतज्ज्ञ डॉक्टरांकडे त्या पंधरा दिवसांच्या आत द्याव्यात. बाळ आठवड्याचे झाल्यानंतर व बाळाचे वजन चांगले असेल तर बाळ जेव्हा रडेल, तेव्हा त्यास दूध द्यावे. सहा महिन्यांपर्यंत बाळांना फक्त आणि फक्त अंगावरचे दूध द्यावे. वरचे दूध, डब्यातील पावडरचे दूध देणे टाळावे. माता आजारी असेल, मातेस काही विशिष्ट जंतूसंसर्गाचा आजार असेल अथवा मातेचं सिझेरियन झाले असेल, तर बाळाला पर्यायी दूध काय द्यावे, याविषयी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. बाळांना बाटलीने दूध देणे चुकीचे आहे, जे टाळलेले बरे. बाटलीने दूध दिल्यामुळे बाळांना गॅस्ट्रो, ॲलर्जी, दम्याचा त्रास उद्भवतो, तसेच गॅसेसमुळे पोटात दुखून मूल विनाकारण खूप रडण्याची शक्यता असते.

बाळाला पहिली अंघोळ शक्यतो दुसऱ्या दिवशी घालावी व त्यानंतर रोज अंघोळ घालावी. अंघोळ घालताना वापरण्याचा साबण व शाम्पू हे डॉक्टरांना विचारून वापरावे. अंघोळ घालण्यापूर्वी पाण्याचे तापमान चेक करणे गरजेचे आहे. बाळाच्या अंघोळीचे पाणी कोमट ते सर्वसाधारण गरम असावे. अंघोळीपूर्वी बाळाला खोबरेल तेल लावून मसाज केला तरी चालतो, त्यामुळे बाळाला झोप चांगली लागते व बाळाचे वजन वाढायलाही मदत होते. बाळाने २४ तासांमध्ये सहा ते आठ वेळा लघवी करणे गरजेचे आहे. याचा अर्थ, बाळाला मातेचे दूध पुरेसं मिळतेय असा होतो. बाळाने २४ तासांमध्ये दोन ते तीन वेळा शी करणं (शौचास होणं) सामान्य असतं.

नवजात बालकाच्या कानात, नाकामध्ये तेल टाकू नये. त्यामुळे बाळास न्यूमोनिया होण्याची व कानामध्ये जंतुसंसर्ग होण्याची शक्यता असते. बालकांना पाणी, मध, साखरपाणी पाजू नये. मधामार्फत बाळांना 'बॉट्युलिझम' नावाचा जंतुसंसर्ग व आजार होतो, जो खूप गंभीर आजार समजला जातो. बाळांना बाळकडू, ब्रह्मदंड, बालघुट्टी, ग्राईप वॉटर इत्यादी देऊच नये. या बऱ्याचशा लिक्विड्‌समध्ये स्टिरॉइड्‌ससारखी औषधं असतात, ज्यामुळे बाळाचं वजन वाढतं व काहींमध्ये झोप येणारे केमिकल्स असतात, ज्यामुळे बाळ खूप चांगलं झोपतं. महत्त्वाचं म्हणजे, या औषधांचा बाळाच्या बुद्धिमत्तेवर वाईट परिणाम होण्याची शक्यता असते.

बाळांच्या डोळ्यांना काजळ लावू नये, ज्यामुळे बाळांच्या डोळ्यांमध्ये जंतुसंसर्ग होण्याची शक्यता असते. अंगाला चण्याचे पीठ, दुधावरची साय, कच्च अंडं, हळद, डाबर लाल तेल, गोडेतेल, तिळाचं तेल, ऑलिव्ह ऑइल इत्यादी लावू नये, ज्यामुळे बाळाच्या अंगावर लालसरपणा व ॲलर्जी येण्याची शक्यता असते. धुरी देऊ नये, हाता-पायाला, मानेमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे धागेदोरे बांधू नयेत, केसांमध्ये खूप तेल लावू नये. डोळ्यातून पाणी किंवा कचरा येत असेल, तर डोळे आणि नाक यांच्या बरोबर मध्यभागी चांगला मसाज करावा. अंगावरील दूध दिल्यानंतर बाळाला उभं पकडून बाळाची ढेकर काढावी. बेंबीवर कोणतं औषध अथवा पावडर लावली नाही तरी चालते; परंतु जर बेंबीतून चिकट द्राव, रक्त येत असेल व खूप दर्प येत असेल, तर अँटीसेप्टिक पावडर व खड्याचं जाडं मीठ बेंबीवर लावावे.

बाळांच्या नाळेची व बेंबीची योग्य ती काळजी घेतली नाही तर त्यांना या मार्गाद्वारे जंतुसंसर्ग होऊ शकतो. बाळाच्या बेंबीभोवती शक्यतो कोणतंही कापड बांधू नये. नवजात बालकांना साधं लंगोट घालावं; परंतु डायपर लावणं शक्यतो टाळावे. बाळांना डायपर लावलं तर जांघेत जंतुसंसर्ग व ॲलर्जी होण्याची, लालसरपणा येण्याची शक्यता असते, जे आपण टाळू शकतो. प्रवास करत असताना डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार योग्य ती काळजी घेऊन डायपर लावलं तरी चालेल.

नवजात बालकास एखाद दुसरी उलटी होणं सामान्य समजलं जातं. पहिल्या काही दिवसांमध्ये बाळ १६ ते १८ तास झोपतं. पहिल्या आठवड्यामध्ये बाळाचं वजन दहा टक्क्यांनी घटतं. त्यानंतर रोज बाळाचं वजन २० ग्राम्सने वाढतं. बाळाचं वजन बरोबर वाढत असेल, बाळ लघवी बरोबर करत असेल व वर नमूद केल्याप्रमाणे बाळाची झोप चांगली असेल, तर मातेचे दूध बाळाला पुरतंय असं आपण गृहीत धरायला काही हरकत नाही.

जर नमूद केलेल्या या गोष्टी घडत नसतील, कारण नसताना बाळ खूप रडत असेल, तर बालरोगतज्ज्ञांचा सल्ला घेणं खूप गरजेचे असतं.

मातेच्या दुधामध्ये 'ड' जीवनसत्वाचे प्रमाण कमी असतं. त्यामुळे सर्वच नवजात बालकांना एक वर्षापर्यंत विटामिन 'डी'चं औषध देणं गरजेचं असतं. त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही औषधाची बाळाला गरज नसते. आवश्यकता वाटल्यास व बाळाला काही त्रास असल्यास बालरोगतज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेऊन औषधोपचार करणे, डॉक्टरांकडून फोनवर औषध मागवणे किंवा गुगल सर्च करून औषध देणं चुकीचं असतं.

प्रसूती झाल्यानंतर बाळ लगेच रडलं नसेल तर, वजन कमी असेल-प्रिम्यॅचूअर असेल तर, बाळाच्या फुफ्फुसामध्ये त्याची शी गेली असेल तर, बाळाला श्वास घ्यायला त्रास होत असेल, तर अथवा बाळाला पहिल्या दोन दिवसांच्या आत कावीळ झाली, तर वेळीच बाळाचे उपचार बालरोगतज्ज्ञांच्या सल्ल्याने करणे गरजेचे असते.

शेवटी एक बालरोगतज्ञ म्हणुन म्हणावंसं वाटतं, "Hopeful Nation lies in Healthy Beginning" आणि "Caring for every Newborn will build a Healthier Nation".

**(लेखक एम.डी. बालरोग व नवजात शिशु तज्ज्ञ आहेत.)**

**

## निवडक

### जानू राऊत यांचे निधन



**कोलाड** :रोहा तालुक्यातील गोवे गावचे रहिवासी जानु बाळू राऊत यांचे शनिवार, दि. १५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५८ वर्षांचे होते. ते प्रेमळ व परोपकारी स्वभावाने सर्वांना परिचित होते. तसेच ते सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय होते. त्यांच्या निधनाची बातमी समजताच त्याच्या अंत्यदर्शनासाठी त्यांचे नातेवाईक तसेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर व समस्त गोवे ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, दोन मुलगे, एक मुलगी, नातवंडे व मोठा राऊत परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवार, दि. २४ नोव्हेंबर, तर उत्तर कार्यविधी गुरुवार, दि.२७ नोव्हेंबर रोजी त्यांच्या गोवे येथील निवासस्थानी होणार आहेत.

### रोहा तालुक्यात थंडीची हुडहुडी




**कोलाड** : रोहा तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रात थंडीची हुडहुडी वाढली असून, नागरिकांनी ऊबदार कपडे खरेदी करण्यासाठी गर्दी केली आहे. तसेच या थंडीमुळे आरोग्यासाठी फायदा तसेच विपरीत परिणाम ही दिसून येत आहे. यामुळे हिवाळ्यात काळजी घेणे महत्त्वाचे ठरणार आहे. तापमानाचा पारा १५ अंशांच्या खाली गेल्यामुळे थंडीपासून संरक्षण मिळविण्यासाठी ऊबदार कपडे खरेदी करण्यासाठी ग्राहक दुकानांमध्ये गर्दी करीत आहेत.

### अंबानींकडे नोकरी लावण्याचे आमिष दाखवून फसवणूक

**नवीन पनवेल** : अंबानींकडे चालक म्हणून नोकरीला लावतो असे आमिष दाखवून परदेशी नागरिकांची फसवणूक करणाऱ्या दिनेश मनोहर कदम आणि कविता दिनेश कदम (तळोजा) यांच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात दि. १७नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. जेसन मरेंडा, तानिया मरेंडा आणि लिडन मरेंडा यांच्या ओळखीचे दिनेश मनोहर कदम आणि त्यांची पत्नी कविता दिनेश कदम यांनी जेसन याला अंबानीकडे चालक म्हणून नोकरीला लावतो असे आमिष दाखवले आणि त्याच्याकडून ६०००० घेतले. त्यानंतर जेसन आणि तानिया यांच्याकडून पॅन कार्ड, आधार कार्ड घेऊन विजय सेल्स सीबीडी बेलापूर व वाशी सेक्टर १७ येथील मोबाईल शॉपमध्ये जाऊन मोबाईल, एसी, टीव्ही असे ४ लाख ८७ हजार रुपये किमतीच्या वस्तू खरेदी केल्या. तसेच एना लीडन मरेंडा यांच्याकडून तीन ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या कानातल्या रिंग आणि चार ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी घेऊन सोनाराकडे गहाण ठेवली आणि आरोपींनी ते पैसे घेतले. मात्र, नोकरीला लावले नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# रोबोटद्धारे गुडघा प्रत्यारोपण

## पनवेलच्या पटेल रुग्णालयात पाचशेहून अधिक शस्त्रक्रिया

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील पटेल हॉस्पिटलमध्ये डॉ. कुणाल मखिजा यांनी रोजा रोबोटद्वारे ५०० गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया गेल्या दोन वर्षात पूर्ण केल्या आहेत. पटेल हॉस्पिटल पनवेल हे रोजा रोबोटिक द्वारा गुडघ्याची ५०० सर्जरी करणारा महाराष्ट्रातील पहिले हॉस्पिटल झाले आहे. सव्वा पाचशे ते साडेपाचशे लोकांनी आतापर्यंत याचा लाभ घेतला आहे.




रोबोट सर्जरीमध्ये लोकांचा फायदा असा होतो की, स्नायू न कापता आणि लिगामेंट ना कापता गुडघ्याचं ऑपरेशन (नी रिप्लेसमेंट) करता येतो. शस्त्रक्रिया करताना रोजा रोबोट ०.५ मिलिमीटर आणि ०.५ डिग्री परफेक्शननी ऑपरेशन करू शकतो. ज्याचा फायदा रुग्णाला होतो. ज्यामुळे रुग्ण त्याच दिवशी चालायला लागतो. रुग्णाचा पाय खूप जास्त वाकतो. हॉस्पिटलमध्ये कमी दिवस राहावा लागतो. रुग्ण पहिल्या किंवा दुसऱ्या दिवशी घरी जातो तेव्हा तो चालत घरी जातो. आणि घरीसुद्धा पंधरा-वीस दिवसांनी लवकरच नॉर्मल लाईफ मध्ये येऊन जातो. याला इंजेक्शन कमी लागतात. गोळ्या कमी लागतात. हॉस्पिटलमध्ये कमी दिवस द्यावा लागतात. या रोबोट सर्जरीत वयाची समस्या नाही, शस्त्रक्रिया ३५ वर्षाच्या माणसांमध्ये पण करू शकतो आणि पटेल हॉस्पिटलमध्ये रोबोट शस्त्रक्रिया ९३ वर्षाच्या रुग्णामध्ये सुद्धा केला आहे.

ही शस्त्रक्रिया ७०, ८०, ९० किलोमध्ये पण करू शकतो आणि १२० ते १४० किलो वजनाच्या रुग्णावर पटेल हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. गुडघ्याची शस्त्रक्रिया खूपच कॉमन झाला आहे. पटेल हॉस्पिटलमध्ये पनवेलमधील ग्रामीण विभागातून रुग्ण गुडघ्याच्या रोबोटिक सर्जरीसाठी आले आहेत. रुग्णालयात रोबोटिक सर्जरीसाठी पेण, रायगड, थला, मंडणगड, म्हसळा, सांगली, सांगोला, विटा, सोलापूर, पंढरपूर, कोल्हापूर, युपी, बिहार, दुबई आणि बांगलादेशहून रुग्ण आले आहेत.

शस्त्रक्रिया झालेले सगळेच रुग्ण प्रसन्न आहेत. कारण याचे रिझल्ट खूपच चांगले आहेत. ही शस्त्रक्रिया सामान्य माणसाला सुद्धा परवडते. कारण ही शस्त्रक्रिया इन्शुरन्समध्ये पण कव्हर होतो आणि सामान्य माणसाला जे नॉर्मल गुडघ्याची प्रत्यारोपण आहे तेवढेच पैसे घेत असून, रोबोटचे वेगळे जास्तीचे पैसे घेत नसल्याचे डॉ. कुणाल माखिजा यांनी सांगितले.

## मधुबन कट्ट्याचे कविसंमेलन उत्साहात



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

दर महिन्याच्या १७ तारखेला होणारे उरण कोमसापचे मधुबन कट्ट्यावरील १२१ वे कविसंमेलन नुकतेच संपन्न झाले. या कविसंमेलनाचे अध्यक्षस्थान लायन्स क्लब ऑफ उरणचे अध्यक्ष प्रा. साहेबराव ओहोळ यांनी भूषविले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात प्रा. ओहोळ यांनी 'अजब दुनिया माणसांची' या विषयावर ज्या कविता कवींनी सादर केल्या, त्या कविता मानवी वृत्तीवर आणि शासकीय व्यवस्थेवर आसूड ओढणाऱ्या व मानवी संवेदना जाग्या करणाऱ्या असल्याचे सांगितले.

रायगडभूषण प्रा. एल.बी. पाटील यांनी आपल्या कवितेमधून जवळपास १७ प्रकारच्या मानवी प्रवृत्तीवर प्रकाश टाकला. तर, उरण कोमसापचे अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे यांनी 'आपल्या मजल' या काव्य प्रकारातून सादर केलेली 'काही माणसे' ही गजल रसिकांना भावली. कविसंमेलनात अजय शिवकर, हेमंत पाटील, अनामिका राम, संजीव पाटील, समता ठाकूर, दर्शन मोकल, मारुती तांबे, रामचंद्र म्हात्रे, नरेश पाटील या सर्व कवींनी आपल्या बहारदार कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या उत्तर भागात वंदना म्हात्रे (गोवठणे) यांना शैक्षणिक सेवेबद्दल तर जीवन पाटील (भाकरवड) यांना सामाजिक सेवेबद्दल जीवन गौरव पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमास देविदास पाटील, रंजना केणी, सुरेश मेस्त्री, चंद्रकांत मुकादम, दत्ताराम नीलवर्ण, सुरेश शिंदे, सुरेश गायकवाड, विकास पूरो, भुवनेश्वर पाटील, शंकर पाटील आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## एक कोटी ३५ लाख ३१ हजारांची फसवणूक

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

लोन काढलेल्या रकमेपेक्षा अधिकचे रक्कम देण्याचे आश्वासन देऊन सहा जणांची एक कोटी ३५ लाख ३१ हजार ४९० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अमित अशोक शेट्टी (रा. से. आरटू माय गोपाळ सोसायटी वडघर) याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

किरण कांबळे हे करंजाडे, सेक्टर ५ येथे राहात असून, त्यांची ओळख अमित अशोक शेट्टी यांच्याशी झाली. अमित शेट्टी यांनी त्याच्याकडे पैसे मागितले. पैसे दिल्यानंतर ते पैसे लगेच परत केल्याने त्यांचा व्यवहारावर विश्वास बसला. त्यानंतर अमित याने त्याच्याकडील चेक देऊन किरण यांच्या नावावर क्रोमा कामोठे येथून सॅमसंग कंपनीचा मोबाईल व आयफोन या वस्तू फायनान्स करून घेतल्या. यानंतर जमिनीचे खोटे पेपर बनवले आणि किरण यांच्या नावावर ऑनलाईन पर्सनल लोन घेऊन पुन्हा नवीन मोबाईल विकत घेतले. त्या बदल्यात पंचवीस लाखांचा चेक दिला. किरण यांच्या पत्नीकडून तीन तोळ्याचे मंगळसूत्र घेतले आणि त्या बदल्यात पाच तोळ्याचे मंगळसूत्र आणून देतो असे सांगितले. मात्र, मंगळसूत्र दिले नाही. असे एकूण ११ लाख ९८ हजार रुपयांचे वस्तू आणि लोन घेतले. अमित शेट्टी यांनी ते चेक वटवण्यास नकार देऊन त्या बदल्यात खरेदी केलेले आणि लोन काढलेल्या रकमेपेक्षा अधिकची रक्कम देण्याचे आश्वासन दिले. तसेच पनवेल परिसरात प्लॉट खरेदी करून देतो असे आश्वासन देऊन किरण यांची फसवणूक केली आहे.

## १६ लाखांची फसवणूक

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

व्यवसायाच्या गुंतवणुकीसाठी दिलेले सोळा लाख रुपये परत न करता फसवणूक केल्याप्रकरणी निलेश निफाडे पाटील (रा. शिरवाडे वणी, निफाड, नाशिक) यांच्याविरोधात कामोठे पोलीस ठाणे दाखल करण्यात आला.

वर्षा या सेक्टर १९ कामोठे येथे राहात असून, त्यांची निलेश निफाडे पाटील यांच्यासोबत ओळख झाली. त्याने तो मोठा व्यावसायिक असल्याचे भासवले होते. तो वर्षा यांच्याकडे पैसे मागू लागला. त्यानुसार त्यांनी त्यांना पैसे पाठवले. व्यवसायासाठी त्यांनी निलेश याला पैसे दिले. व्यवसायाच्या गुंतवणुकीसाठी एकूण १६ लाख रुपये घेऊन ते पैसे आज देतो, उद्या देतो असे बोलून फसवणूक केली.

## वाघ्रण येथे चंपाषष्टी सोहळा

**। वाघ्रण । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथे दि.२१ ते २६ नोव्हेंबरदरम्यान सलग अकराव्या वर्षी चंपाषष्टी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. वाघ्रण येथील कडेपठार महाराज श्री खंडेराय भक्त दिपक अनंत पाटील यांच्या निवासस्थानी हे आयोजन करण्यात आले आहे.

पंचक्रोशीसह तालुक्यात प्रसिद्ध हा उत्सव मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा २१ नोव्हेंबर ते मार्गशीर्ष शुद्ध षष्टी २६ नोव्हेंबर या काळात होत असून, त्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये पहिल्या दिवशी अभिषेक व घटस्थापना तसेच मार्तंड पारायण सकाळी ११ वाजता प्रारंभ होणार आहे.

शनिवारी रात्री ९ वाजता गोपाळ कृष्ण प्रासादिक भजन मंडळ मानकुळे, गायक स्वराज पाटील, मृदुंग साथ कुशांत पाटील तर रविवारी श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ नवगाव गायक किशोरबुवा बोराडे, मृदुंग साथ भूषण म्हात्रे, तबला दर्शन पवार तसेच सोमवारी रात्री जय हनुमान भजन प्रासादिक मंडळ वाघ्रणचा भजनांचा कार्यक्रम होणार आहे मंगळवारी रात्री ७ वाजता शिवभैरव गोंधळ मंडळ शहाबाजचा जागरण गोंधळ होणार आहे.



अखेरच्या दिवशी सकाळी ११ वाजता मार्तंड विजय ग्रंथ पारायण समाप्ती, तर दुपारी १२ वाजल्यापासून देवाचा तळीभंडारा व महाप्रसाद असा कार्यक्रम होणार आहे.

उत्सवाची तयारी जोरदार सुरू आहे. हा उत्सव सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी दीपक पाटील यांच्या मातोश्री सुरेखा पाटील, वडील अनंत पाटील, भाऊ मनोज पाटील यांच्यासह मित्रमंडळी, ग्रामस्थ, भाऊबंद, शेजारी, श्री मार्तंड भक्त मेहनत घेत आहेत.

या कार्यक्रमासाठी प्रशस्त मंडप, दुतर्फा रोषणाई, आकर्षक प्रवेशद्वार, बैठक व्यवस्था आणि रेलचेल यामुळे भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. या सोहळ्याला पंचक्रोशीतून मोठ्या संख्येने भक्तगण उपस्थित राहून खंडेरायाचे दर्शन घेतात, असे आयोजकांकडून सांगण्यात आले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुउद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११
- अलिबाग एसटी स्टँन्ड जवळ दुकानगाळा अलिबाग समुद्राजवळ फ्लॅट विक्री करणे आहे. विद्यानगरजवळ हॉटेल भाड्याने देणे आहे.९७६४५४८६७९.
- Vacancy for, office staff ,for office in Alibag Attractive salary Call 9923750549
- गिरीष एंटरप्रायझेस येथे ऑफीस कामासाठी मुलगी पाहिजे. शैक्षणिक पात्रता : १२ वी उत्तीर्ण, टु व्हीलर चालवता येणे आवश्यक. स्थानिक उमेदवारास प्राधान्य. संपर्क -८२३७३१६२१८. ऑफीस वेळ :- ९-३० ते ६-३०
- कन्स्ट्रक्शन ऑफीस अलिबाग येथे ३ महिन्याकरिता अकाऊंटच काम करण्यासाठी तात्पुरती मुलगी पाहिजे. संपर्क-८८०६७५९०९०
- अंश एन्टरप्रायजेस सोलर ऑफीसमध्ये ऑफीस कामाकरिता १ मुलगी आणि १ मुलगा पाहिजे. शिक्षण कमीत कमी १२ वी पास किंवा पदवीधर पाहिजे. मो.नं. ८४८३९९९२२९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

**म्हसळ्यात मार्गदर्शन शिबीर** | **प्रेरणादायी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक**

# शिक्षकांसह विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

कोकण कम्युनिटी रीजनल फाऊंडेशन, कोकण एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर असोसिएशन आणि कोकण टिच यांच्या संयुक्त विद्यमाने म्हसळा घनसार हॉल येथे विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन व शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण या दोन महत्त्वपूर्ण उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.




डॉ. मुबारक कापडी यांनी करिअर निवड, शैक्षणिक संधी व भविष्यातील नियोजनाबाबत प्रभावी मार्गदर्शन केले. ॲड अबिद अहमद कुंदलम यांनीही प्रेरणादायी विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अहमद अली पेणकर होते. यावेळी म्हसळा पोलीस निरीक्षक राजेंद्र पारखे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आयोजनात नबील काझी, डॉ. सुफयान काझी, तजम्मुल पंगारकर, आरिफ पठाण यांचे विशेष सहकार्य लाभले.

यावेळी शिक्षणप्रेमी फजल हळदे, फारुख पठाण, शाहिद युकये, समाजसेवक अ. शकूर गणेश घणसार, श्री. घराडे आदी मान्यवर उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात अंजुमन हायस्कूल येथे शिक्षकांसाठी प्रशिक्षण सत्र झाले. डॉ. मुबारक कापडी यांनी एनइपी, शिक्षक नेतृत्व, विद्यार्थीकेंद्रित अध्यापन आणि वर्गव्यवस्थापन यांसह आधुनिक शैक्षणिक तंत्रांची माहिती दिली. सत्राचे संयोजन डॉ. मुब्बशीर जमादार यांनी केले. दोन्ही कार्यक्रमांना मिळून सुमारे ९०० उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उपक्रम अतिशय उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरल्याचे समाधान सहभागानी व्यक्त केले. आयोजकांनी अशाच गुणवत्तापूर्ण उपक्रमांचे सातत्य ठेवण्याचे आश्वासन दिले.

## नवीन पनवेलमध्ये वाहतूक कोंडीला दिलासा

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

नवीन पनवेल स्टेशन परिसरातील वाढती वाहतूक कोंडी, अनधिकृत पार्किंग आणि त्यामुळे निर्माण होणारी नागरिकांची होरपळ या सर्व समस्यांवर पनवेल वाहतूक विभागाने तातडीने कारवाई करत मोठा दिलासा दिला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या नेतृत्वाखाली ५०० ते ६०० वाहनक्षमता असलेला अस्थायी पार्किंग प्लॉट उपलब्ध करून देण्यात आला आहे.



या पार्किंगचे उद्घाटन माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी सभागृहनेते परेश ठाकूर तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे परिसरातील वाहतुकीतील गोंधळातील मोठी घट झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. यावेळी वाय टी देशमुख, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक मनोज भुजबळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे आगरकोट, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत / बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक मधुरा सुरेश तोडणकर रा. १/१, वसंत निवास, गोखले रोड, मुंबई ४०००८१ यांच्या नांवे असलेली बागायत/बिनशेती मिळकत माझे अशिलांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा करारनामा विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १. आगरकोट ता.अलिबाग | ३९/४ | ०-१४-१० <br> पो.ख.०-११-७० <br> एकूण ०-२५-८० | ९.०७ |

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| २. आगरकोट ता.अलिबाग | ४८ | ९-५२-०० | ९५.२० |
| ३. आगरकोट ता.अलिबाग | ४७ | ०-००-०६ | ००.१० |
| ४. आगरकोट ता.अलिबाग | ४० | ०-००-५० | ००.१२ |

सबब सदरहू बागायत/बिनशेती मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २०/११/२०२५

सही / -
**ॲड, धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## Change in Name

I AMRUTA YOGESH GAIKWAD RESIDENT AT FLAT 403 SUNRISE RESIDENCY C WING DASTURI NAKA, MAHAD, RAIGAD, MAHARASHTRA 402301, DECLARE AND AFFIRM AS UNDER, MY OLD NAME (BEFORE MARRIAGE) WAS PRAJAKTA PRABHAKAR NAGE. I HAVE CHANGED MY NAME TO AMRUTA YOGESH GAIKWAD FOR ALL FUTURE PURPOSES. AS Per Maharashtra state Gazette copy at 11-17 july, 2013 registration no- (x-14838-A)

SIGN
**AMRUTA YOGESH GAIKWAD**
**(New Name)**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.दयाराम गोविंद काठे रा.मु. कामथ, पो. किहीम, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या येथे खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे कामथ, ता.अलिबाग, जि.रायगड**

| कामथ भूमापन हिस्सा क्रमांक | पुर्वीचा किहीम भूमापन क्रमांक व हिस्सा क्रमांक | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २७४ | २७४ | ०-१८-४० | ३.५० |
| २७६ | २७६ | ०-१०-४० | २.४४ |
| ४९७/१ | १०५९/अ | ०-०९-१० | २.१२ |
| ४९७/२ | १०५९/ब | ०-०९-१० | २.०९ |

सदरहू मिळकतींसदर्भात दि. १४/०३/२०२५ रोजी ॲड. रविंद्र व्ही. ओक यांनी त्यांचे अशिल (मिळकतींचे तथाकथित खरेदीदार) यांच्यामार्फत दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे.

असे असले तरी ॲड. रविंद्र व्ही. ओक यांचे अशिल (मिळकतींचे तथाकथित खरेदीदार) यांच्याबरोबर आमचे अशिल श्री. दयाराम गोविंद काठे यांनी मिळकती हस्तांतरणासंबंधी कोणताही लेखी अथवा तोंडी करार दि.१४/०३/२०२५ रोजी अथवा तत्पुर्वी व त्यानंतरही आजतागायत केलेला नाही. अथवा मिळकतींसंदर्भात आमच्या अशिलांनी बयाणा म्हणून कोणतीही रक्कम घेतलेली नाही.

सदरहू मिळकती या आमच्या अशिलांच्या मालकीच्या आहेत व त्या त्यांच्या ताबेकब्जे वहिवाटीत व कसवणूकीत असून निर्वेध व बोजाविरहित आहेत.

अलिबाग.
दिनांक : २०/११/२०२५

**ॲड. सुनिल के. वाकडे**
डी-१, तळमजला,
हिराबाग को. ऑप. हौ. सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ९८६७७१५५२४

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**
दूरध्वनी कार्यालय:- ०२२-२७४५८०४०,४१,४२ फॅक्स: ०२२-२७४५२२३३
ई-मेल :- panvelcorporation@gmail.com
वेबसाईट-www.panvelcorporation.com

जा.क्र.पमपा/पापुवि/१२२५/प्र.क्र.०२/१२०७/२०२५ दि.२०/११/२०२५

**दरपत्रके मागविणेकामी**

| अनु.क्र. | प्रकरण क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | प्रकरण/पमपा/पापुवि/१२२५/प्र.क्र.०२/१२०७ २०२५ | पनवेल महानगरपालिकेच्या अधिपत्या खालील देहरंग धरणावर स्वयंचलित पर्जन्यमापक यंत्र पुरविणे,बसविणे आणि कार्यान्वित करणे. |

या दर पत्रकाची वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि. २२/११/२०२५ ते दि. २७/११/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत पाणी पुरवठा विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेतस्थळ www.panvelcorporation.com व पनवेल महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

## ग्रुप ग्रामपंचायत आपटा

समाविष्ट महसुली गावे : आपटा, सारसई, कौरळ
मु. पो. आपटा, ता. पनवेल, जि. रायगड.
ई-मेल : grampanchyatapte@gmail.com

दिनांक : २०/११/२०२५

**निविदा जाहिरात देणेबाबत**

उपरोक्त विषयान्वये कळविणेत येते की, ग्रामपंचायत आपटा हद्दीत खालीलप्रमाणे कामांच्या जाहिरात देणेत याव्यात.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम |
|---|---|---|
| १) | ग्रामपंचायत आपटा हद्दीत नवीन कोळीवाडा अंतर्गत रस्ता तयार करणे. | १,४९,९६५/- |
| २) | ग्रामपंचायत आपटा हद्दीत गोपाळ सावंत ते तटकरे घरापर्यंत गटार बांधणे | १,२०,०००/- |

## जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमच्या आशिल यांचे मयत वडील कै. मधेश्वर प्रसाद सिंग यांच्या मालकीच्या व त्यांचे पश्चात आमच्या अशिल सौ. निता यशपाल शर्मा यांच्या ताबे वहीवाटीच्या मौजे-चई, ता-कर्जत, जि-रायगड येथील खालील नमुद प्रमाणेच्या जमिन मिळकती:-

| सर्वे.न. | हिस्सा.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १५ | ८/ब | ०.३१.०० | ०.२८ |
| १६ | १ | ०.१७.०० | ०.१२ |
| १६ | ४ | २.५७.०० | १.१२ |
| १६ | ५ | ०.२९.०० | ०.१९ |
| १६ | ६/ब | ३.००.०० | २.६२ |
| १६ | ११ | १.२६.०० | ०.६६ |
| १६ | १३ | ०.४३.०० | ०.२२ |
| १६ | १७ | ०.२०.०० | ०.०९ |
| १९ | ३ | ०.५०.०० | ०.२२ |
| १९ | ५ | १.६०.०० | ०.६९ |
| २० | ३ | ०.०७.०० | ०.०३ |
| २० | ९ | १.४४.०० | ०.६९ |
| २१ | ७ | १.१३.०० | ०.४७ |
| २२ | १ | ०.१२.०० | ०.०९ |

सदर मिळकतींच्याबाबत आमच्या अशिल यांने वरील नमुद मिळकतींच्या ७/१२ सदरी त्यांचे मयत वडील कै.मधेश्वर प्रसाद सिंग यांचे नावाची नोंद महसुल दप्तरी ७/१२ संगणीकृत करत असतांना चुकीने नावा मधेश्वर ऐवजी मोरेश्वर झाल्याचे त्यांना या दरम्यानच्या काळात निदर्शनास आलेले आहे. सदरात आमच्या अशिल यांने या बाबत मा. तहसिलदार साो. कर्जत यांचे कार्यालयात या दुरुस्ती कामीचा अर्ज केलेला असुन या बाबतची प्रक्रिया प्रलंबीत असतांना सदर वरील नमुद जमिन मिळकतींबाबत श्री. मोरेश्वर प्रसाद सिंग यांने सदरील मिळकती विक्री करणे बाबतची नोटिस ही दिनांकः २९/१०/२०२५ रोजीच्या दैनिक वृत्तपत्र ''पुण्य नगरी'' या वृत्तपत्रात जाहीर करण्यात आलेली होती, सदर नोटीसीस आमच्या अशिल सौ. निता यशपाल शर्मा व त्यांच्या तर्फे कुळअखत्यारी श्री. मनिष प्रताप आशर यांने हरकत उपस्थित केल्यावर सदरील जाहीर नोटीस ही दिनांकः १३/११/२०२५ रोजीच्या दैनिक वृत्तपत्र ''पुण्य नगरी'' या द्वारे मागे घेण्यात आलेली आहे.

सदरच्या जमिन मिळकतींबाबत आमचे अशिल कोणताही विक्री व्यवहार करत नसुन, जमिन मिळकतीच्या ७/१२ वरील सध्यस्थितीत असलेली नावाची नोंद या मधील दुरुस्ती प्रक्रिया प्रलंबित आहे, त्यामुळे सदर नोटिसीने आपणास कळविण्यात येत आहे की, वरील नमुद जमिन मिळकती बाबत आमच्या अशिलांची वारस नोंद होण्याच्या कालावधीत सदर जमिनीचा व्यवहार अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्थांतरीत ते करणार नाहीत हे त्या या नोटीसीने जाहीर करत आहेत.

ठिकाण: कर्जत
दि: १९/११/२०२५

वकील
**ॲड. सचिन संजय सुर्वे**
पत्ता: नाथ सदन, आमराई रोड, ता-कर्जत,
जि-रायगड, ४१०२०१ मो.नं :९०२८५४६१५७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक सौ. कुसुम उर्फ वनिता गोपाळ घुडे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे-जामरूंग, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| २८ | ७ | ०.१२.०० | ०.०३ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि.२१/११/ २०२५

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४.
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे श्रीगांव, ता. अलिबाग येथील खालील नमूद मिळकत, सदर मिळकतीचे मालक मोरेश्वर जगन्नाथ पाटील वगैरे, रा. श्रीगांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांजकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

संदर्भित जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे अवधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे श्रीगांव, तालुका अलिबाग येथील भूमापन क्रमांक व उपविभाग २५८, एकूण क्षेत्र २-६२-०० हे. आर. आकार रु.४-४४ पै. ही भातशेती मिळकत

अलिबाग,
दिनांक : २०.११.२०२५

सही/-
**(ॲड. श्री. प्रसाद विजय वर्तक )**
जिल्हा न्यायालय
अलिबाग-रायगड.

## ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक

**ता. माणगाव, जि रायगड**

**जाहीर निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत,इच्छित ठेकेदारा/पुरवठादार कडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव/वस्तूचे नाव | कामाचे परिमाण (संख्या) | निधीचा स्तोत्र | रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करणेचा: अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | १% इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कविलवहाळ बुद्रुक येथील सावरीचा माळ आ.वाडी येथे धोबीघाट बांधणे | १ | १५% ग्रामनिधी | १०००००/- | ६ महिने | २८/११/२०२५ | साय १०.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १०००/- | २००/- |

**अटी व शर्ती**

१) प्राप्त निविदा दि. ०१/१२/२०२५ रोजी स. ठीक १०.०० वाजता ग्रा.पं. कविलवहाळ बुद्रुक येथे मा.सरपंच यांच्या समक्ष उघडणेत येईल.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार मा.सरपंच कविलवहाळ बुद्रुक यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे मा.सरपंच कविलवहाळ बुद्रुक यांचे मार्गदर्शन व देखेरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा. पं.ने राखून ठेवला आहे.
४) काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्या नंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.
६) अनुसूचित जाती व नव बौध वस्तीचा विकास करणे योजनेचा निधी उपलब्ध झाले नंतरच देयक अदा करण्यात येईल.

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बुद्रुक**

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

**अर्ज क्र.५७५/२०२५**

मेहताब अब्दुल माजीद मुला
रा. टेमपाले, ता. माणगाव, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
टेमपाले, ग्रामपंचायत टेमपाले
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. मेहताब अब्दुल माजीद मुला यांचा जन्म/मृत्यू मौजे टेमपाले ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.५-०४-१९८४ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. १६-१०-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू टेमपाले येथे दि.५-४-१९८४ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि..........रोजी टेमपाले ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव
**दिनांक :- १३-११-२०२५**

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

**अर्ज क्र.५३८/२०२५**

महमदइस्हाक अब्बास लोखंडे
रा.निजामपूर. ता.माणगाव — अर्जदार
जि. रायगड
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
निजामपूर, ग्रामपंचायत निजामपूर
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.महमदइस्हाक अब्बास लोखंडे यांचा जन्म/मृत्यू मौजे निजामपूर ता. माण-गाव, जि. रायगड याठिकाणी दि.०१-०६-१९६० रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. १७-०९-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू निजामपूर येथे दि. ०१-०६-१९६० रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि. .... रोजी निजामपूर ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव
**दिनांक :- १३-११-२०२५**

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

**अर्ज क्र.५१४/२०२५**

आरिफा इस्माईल जालगांवकर
रा.निजामपूर. ता. माणगाव — अर्जदार
जि. रायगड (मज्जीद ॲन्ड मज्जीद मोहल्ला)
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
निजामपूर, ग्रामपंचायत निजामपूर
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. आरिफा इस्माईल जालगांवकर यांचा जन्म/मृत्यू मौजे निजामपूर ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.०७-०६-१९६८ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. २९-०९-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू निजामपूर येथे दि. ०७-०६-१९६८ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि. .... रोजी निजामपूर ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव
**दिनांक :- १३-११-२०२५**

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

**अर्ज क्र.५३९/२०२५**

लियाकत याकूब दळवी
मु.पो. निजामपूर, ता. माणगाव, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
निजामपूर, ग्रामपंचायत निजामपूर
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. लियाकत याकूब दळवी यांचा जन्म/मृत्यू मौजे निजामपूर ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.४-०५-१९६९ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. २२-०९-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू निजामपूर येथे दि. ४-५-१९६९ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि.....रोजी निजामपूर ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव
**दिनांक :- १३-११-२०२५**

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

**अर्ज क्र.२५९/२०२५**

संगीता सुधीर गांधी,
रा.इंदापूर ता. माणगाव जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
इंदापूर, ग्रामपंचायत तळाशेत
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. महादेव धोडू तोडकर यांचा जन्म/मृत्यू मौजे इंदापूर ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.२४-०५-२०१२ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. २१-०८-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू इंदापूर येथे दि. २४-०५-२०१२ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि.....रोजी इंदापूर ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव
**दिनांक :- २१-११-२०२५**

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

**अर्ज क्र.५१५/२०२५**

अहमद उस्मान राऊत
मस्जिद ॲन्ड मस्जिद मोहल्ला
रा.निजामपूर. ता. माणगाव जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
निजामपूर, ग्रामपंचायत निजामपूर
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. अहमद उस्मान राऊत यांचा जन्म/मृत्यू मौजे निजामपूर ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.१०-०५-१९६० रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. २०-०८-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू निजामपूर येथे दि. १०-०५-१९६० रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि.१०-०५-१९६० रोजी निजामपूर ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव
**दिनांक :- १३-११-२०२५**

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

**अर्ज क्र.५४०/२०२५**

जैनब अब्बाज लोखंडे
मु.पो. निजामपूर. — अर्जदार
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
निजामपूर, ग्रामपंचायत निजामपूर
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. जैनब अब्बाज लोखंडे यांचा जन्म/मृत्यू मौजे निजामपूर.... ता. माणगाव,जि. रायगड याठिकाणी दि.१-०३-१९६८ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. २२-०९-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू निजामपूर येथे दि. ०१-०३-१९६८ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि.....रोजी निजामपूर ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव
**दिनांक :- १३-११-२०२५**

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

**अर्ज क्र.५३७/२०२५**

रुखसाना हसन जालगांवकर
निजामपूर, ता. माणगाव, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
१.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
निजामपूर, ग्रामपंचायत निजामपूर
ता. माणगाव, जि.रायगड — सामनेवाले
२.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव जि.रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. रुखसाना हसन जालगांवकर यांचा जन्म/मृत्यू मौजे निजामपूर ता. माणगाव,जि. रायगड या ठिकाणी दि.१०-०७-१९६४ रोजी झाला आहे. त्याची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांनी दि. १७-०१-२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू निजामपूर येथे दि.१०-७-१९६४ रोजी झाला असल्याचे घोषित करुन मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वत:चे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म-मृत्यू दि.....रोजी निजामपूर ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगाव
**दिनांक :- १३-११-२०२५**

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि.रायगड**

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक



### न्हावा गावाची मानसी भोईर सीए उत्तीर्ण

**चिरनेर :** न्हावा येथील मानसी शिवनाथ भोईर ही सीएच्या परीक्षेत नुकतीच पहिल्या प्रयत्नांमध्ये उत्तीर्ण झाली आहे. त्याबद्दल आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी तिचे सुखकर्ता बंगल्यावर अभिनंदन केले. गुणवंती शिवनाथ भोईर यांची कन्या, तर माजी सरपंच हरिश्चंद्र बाळाराम म्हात्रे यांची ती भाची आहे. रोटरी एज्युकेशन सोसायटीमध्ये तिचे दहावीपर्यंतचे शिक्षण झाले, तर महाविद्यालयीन शिक्षण उरण एज्युकेशन सोसायटी, तर बीबीए पुणे विद्यापीठाच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठात बेलापूर येथे झाले. सध्या मानसी उरण-बोरी येथे स्थायिक असून आगरी समाजातील मुलगी सीए झाल्याने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### गुणवंत विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच वाटप

**नवीन पनवेल :** लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर



यांच्या ७५ व्या अमृत महोत्सव निमित्ताने अडसुळे दाम्पत्यांकडून गुणवंत विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच वाटप करण्यात येणार आहे.गतवर्षी अजित अडसुळे आणि उषा अडसूळे या दांपत्याकडून गुणवंत विद्यार्थ्यांना टॅब वाटपाचा कार्यक्रम मोठा उत्सवात पार पडला होता. यानंतर पुन्हा रविवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजता विपग्यर हायस्कूल य सेक्टर १५, खारघर येथील मैदानावर इयत्ता दहावी आणि बारावीतील प्रथम, द्वितीय, तृतीय श्रेणीतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवर खा. रामशेठ ठाकूर, माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्या उपस्थितीत स्मार्ट वॉच तसेच प्रशस्तीपत्र देऊन गुणगौरव करण्यात येणार आहे.

### बाईकर्सना पोलिसांनी शिकवला धडा

**नवीन पनवेल :** वाशी सेक्टर १७ ते बेलापूर असा पामबीच



रोडवर बायकर्सने त्यांच्या परदेशी बनावटीच्या दुचाकी या भन्नाट वेगाने हाकण्याच्या स्पर्धा करत असल्याबाबत नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. या स्पर्धात्मक रॅश ड्रायव्हिंग करणाऱ्या बाईकर्सना पोलिसांनी धडा शिकवत तिघां विरोधात नेरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. प्रणव पद्माकर जाधव (रा. वाकोला ब्रिज नेहरूनगर मुंबई), सूर्यदेव सिंह सर्जेराव देसाई (रा. टिळक नगर चेंबूर), अभिषेक देवदास साबळे (रा. जय मल्हार संस्था अपार्टमेंट शेडुंग गाव) अशी तिघांची नावे आहेत.१९ नोव्हेंबर रोजी नेरूळ पोलीस ठाण्याचे वपोनि ब्रह्मानंद नाईकवाडी यांना पामबीच रस्त्यावर तीन ते चार बाईकर स्पर्धात्मक मोटारसायकल भन्नाट वेगाने दिसून आले. त्यांनी स्वतः बाईकरचा पाठलाग करून पामबीच रोडवर सारसोळे सिग्नल ते वज्राणी सिग्नल नेरूळ येथे रात्री दीडच्या सुमारास त्यांना आणि त्यांची बाईक रोखून ताब्यात घेतली. याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.



### नाणोरे शाळेत ऋणानुबंध सोहळा

**माणगाव :** राज्य शासनाकडून सन २०२५ च्या शिक्षक बदल्यांचा कार्यक्रम सप्टेंबर २०२५ मध्ये पार पडला. या बदल्यांमध्ये शाळेत मागील नऊ वर्षांपासून कार्यरत असलेल्या शिक्षिका वनिता पंढरीनाथ डोळस यांची तालुक्यातील बागवाडी या शाळेमध्ये ऑनलाईन पद्धतीने बदली झाली व त्यांच्या जागेवर डोंगरोली वरची वाडी येथे कार्यरत असलेले शिक्षक अमित पानसरे हे हजर झाले. त्या अनुषंगाने शाळा व्यवस्थापन समिती व पालक वर्ग शाळा नाणोरे यांनी ऋणानुबंध सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे, गावचे पोलीस पाटील भारत पाटोळे, तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अन्वी मासुक व मुख्याध्यापिका सायली वाटवे यांनी शिक्षिका वनिता डोळस यांच्या कार्याविषयी गौरवोद्गार काढले. यावेळी सर्व सदस्य व पालकांनी वनिता डोळस यांचे औक्षण करून शाळेतर्फे त्यांचा सत्कार करुन भेटवस्तू दिली. शिक्षिका वनिता डोळस यांनी शाळेसाठी वॉटर फिल्टर भेट दिला, तसेच विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप केले. शाळेत नवीन आलेले शिक्षक अमित पानसरे यांचेही यावेळी व्यवस्थापन समिती व पालक वर्गातर्फे शाल, श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी केंद्रप्रमुख शंकर शिंदे, गावचे पोलीस पाटील भारत पाटोळे, व्यवस्थापन समिती अध्यक्षा अन्वी मासुक, सदस्य रिना सावंत, निकिता लाड, ज्योत्स्ना शिगवण, सुष्मिता लाड, मेघा मोरे, रेखा पाटोळे, रितू गुजराती, पूनम पाटोळे इत्यादी सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक अमित पानसरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका सायली वाटवे यांनी केले.

### उरण : छाननीत सहा अर्ज अवैध

**उरण :** उरण नगरपरिषद निवडणुकीच्या नामनिर्देशन पत्रांची गुरुवारी छाननी करण्यात आली. यात दाखल करण्यात आलेल्या नगराध्यक्ष पदाच्या ९ अर्जांपैकी २ अर्ज अवैध ठरले आहेत. तर, नगरसेवक पदासाठी एकूण ७८ अर्ज दाखल करण्यात आले होते. यातील ४ अर्ज अवैध ठरविण्यात आले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली. उरण नगर परिषदेच्या निवडणूक रिंगणात नगराध्यक्ष पदासाठीच्या एका जागेसाठी ७ तर नगरसेवक पदाच्या २१ जागांसाठी ७४ उमेदवार रिंगणात आहेत. यातील २१ नोव्हेंबरपर्यंत किती अर्ज मागे घेतात याकडे उरणवासियांसाठी जनतेच लक्ष लागून राहिले आहे.

# 'कोरस'विरोधात ग्रामस्थांचा ठिय्या



**। चणेरा । प्रतिनिधी ।**

**घाटाव औद्योगिक क्षेत्रातील प्रख्यात कारखाना कोरस इंडिया प्रायव्हेट लिमिटेडमधील तीन स्टाफ कामगारांना कंपनी व्यवस्थापकाने टर्मिनेट केले होते तसेच गेल्या अनेक दिवसांपासून स्टाफ कामगारांचं कामबंद आंदोलन सुरू होतं. त्याच अनुषंगाने स्टाफ कामगारांच्या न्याय्य हक्काच्या लढ्यासाठी रोहा तालुक्यातील शेकडो ग्रामस्थांनी कंपनीच्या गेटवर भूमीपुत्रांसाठी बुधवारी (दि. १९) रोजी आंदोलन छेडण्यात आले होते.**

या ठिय्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी स्थानिक नागरिक, महिला, युवक, सर्वपक्षीय नेते आणि सामाजिक संस्थांचा प्रचंड अभूतपूर्व पाठिंबा मिळाला. मात्र, कंपनी प्रशासन, पोलीस प्रशासन तसेच स्थानिक सर्वपक्षीय पदाधिकारी यांच्यातील झालेल्या बैठकीमध्ये कंपनी व्यवस्थापकाने

**■ रोह्यात न्याय्य हक्कासाठी स्थानिक एकवटले**

**■ न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा**

समाधानकारक उत्तर न दिल्यामुळे हे बैठक निष्फळ ठरल्याने कामगारांच्या गोटामध्ये असंतोषाचा भडका उडाला. दरम्यान, कामगारांनी न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवू, असा निर्धार जाहीर केला.

दरम्यान, गेल्या काही दिवसापासून स्टाफ कामगारांचा कामबंद आंदोलन सुरू होतं, त्याच अनुषंगाने गेटवर स्थानिकांच्या न्याय्य हक्कासाठी आंदोलन छेडण्यात आलं होतं.

यावेळी रोहा उपविभागीय पोलिस अधिकारी प्रसाद गोकुळे, पोलीस निरीक्षक मारुती पाटील तसेच कंपनीचे अधिकारी यांनी यांच्यासोबत तब्बल दोन वेळा मध्यस्थीचे प्रयत्न करून कंपनीच्या

**शेवटपर्यंत लढणार**

कामगारांना कंपनीने कामावरुन काढल्यामुळे त्यांना न्याय मिळावा यासाठी कंपनीच्या गेटवर आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला सर्व स्तरातून पाठिंबा मिळत आहे. दरम्यान, शेकडो ग्रामस्थ कंपनीविरोधात एकवटले असून, जोपर्यंत कामगारांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत लढा देणार, असा निर्धार त्यांनी केला आहे. कंपनी प्रशासनाची मुजोरी खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे. कंपनीने प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

एमडी साबू यांच्याशी संपर्क साधण्यात आला असता त्यांनी सांगितले की, या बैठकीत कंपनी प्रशासनाने ७५ कामगारांना घेण्याची तयारी दर्शवली, तसेच टर्मिनेट केलेल्या ३ पैकी २ जणांना पुन्हा घेण्याचा शब्द दिला. मात्र, तिसऱ्या कामगाराबाबत १०१५ दिवसांत निर्णय घेऊ, अशी टाळाटाळीची भूमिका घेतल्याने कामगार संतप्त झाले. कामगारांनी कंपनीचा निर्णय फोल ठरवत स्पष्टपणे जाहीर केले. परंतु, चर्चा निष्फळ ठरली. तसेच मधुकर पाटील यांच्या फोनवरूनदेखील खा. सुनील तटकरे यांनी साबू यांच्याशी संवाद साधला; परंतु त्यांनादेखील साबू यांनी घेण्याचा शब्द दिलेला नाही, असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे कंपनी प्रशासनाने घेण्याबाबतची रचना त्यानंतर आयोजित सर्वपक्षीय बैठकदेखील निष्पन्न न ठरल्याने कामगारांमध्ये कंपनी प्रशासनाविरोधात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. भूमीपुत्रांचा न्याय नाकारला जाणार नाही; तिन्ही टर्मिनेट कामगारांना पुनर्नियुक्ती मिळालीच पाहिजे. या आंदोलनात स्थानिक नागरिक व कामगारांच्या कुटुंबिय आले होते.

यावेळी सर्वपक्षीय कार्यकर्ते, पदाधिकारी, सामाजिक, धाटाव विभागातील शेकडो महिला व तालुक्यातील नागरिक उपस्थित होते. तर महिलांनी काढलेल्या हंबरड्यामुळे वातावरण क्षणाक्षणाला भावनिक बनत गेले. वर्षानुवर्षे आम्ही या कंपनीसाठी घाम गाळला आणि आता न्यायच नाही? हा कोणता विकास? असा सवाल कुटुंबियांनी कंपनीवर टीका केली, तर येणाऱ्या काही दिवसात कंपनी प्रशासनाने हा प्रश्न सोडवला नाही तर आणखी हा वाद चिघळण्याची शक्यतादेखील वर्तवली जात आहे.

# हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचलित अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द विद्यालयात इयत्ता दहावी बॅच २००३-०४ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न झाला. मुंबई, घाटकोपर, वसई, नालासोपारा, चेंबूर, डोंबिवली आदी ठिकाणांहून मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माजी विद्यार्थी व समाजसेवक किशोर शिंदे तर अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे हे होते. २१ वर्षांपूर्वी शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या जुन्या शालेय आठवणींना उजाळा देण्याचा सुखद अनुभव मिळाला. जुन्या बेंचवर बसण्याचा आनंद, त्यावेळचे इंग्रजी शिक्षक श्री. सुर्वे यांच्या हातून प्रतिकात्मक 'छडी' घेण्याची मजा यांनी वातावरणात आनंद निर्माण केला. डिजिटल सुविधा, सुसज्ज प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय आणि संगणक कक्ष पाहून माजी विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. मैदानावर खेळलेला खो-खोचा खेळ विशेष आकर्षण ठरला. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट भोजनाची व्यवस्था केली होती. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून संस्थेचे आणि जुन्या शिक्षकांचे कौतुक केले. त्या काळातील शिक्षकांचा शाल, भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. शाळेतून घडलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

माजी विद्यार्थी मिलिंद तांबडे (भानंग कोन्ड), उद्योजक मुंबई यांनी शाळेच्या वॉल कंपाऊंडसाठी आर्थिक मदत जाहीर केली. दहावीच्या बॅचनेही या उपक्रमासाठी निधी दिला. संस्थेचे सरचिटणीस डॉक्टर निलेश रेवगडे तसेच शालेय समितीचे अध्यक्ष किशोर अल्हाट यांनी शुभेच्छा दिल्या. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक गावित यांनी केले. सूत्रसंचालन सिद्धी पतारे व विशाखा नटे यांनी केले. संगीत विभागाच्या वतीने सिद्धेश घाग यांच्या मदतीने ईशस्तवन, स्वागतगीत सादर करण्यात आले.

## सुरक्षेसाठी अभियान...



● सागरी सुरक्षा अभियान सुरु असल्याने अलिबागमध्ये येणाऱ्या प्रमुख मार्गांवर पोलिसांकडून वाहनांची तपासणी करण्यात येत होती. (छायाचित्र : समीर मालोदे)

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना 'वेद'ची साथ

**। महाड । प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागातील विद्यार्थी शैक्षणिकरित्या सक्षम व्हावे यासाठी वेद प्रतिष्ठानच्या माध्यमातून भेलोशी पंचक्रोशी माध्यमिक शाळा व जिल्हा परिषद शाळा येथे वेद प्रतिष्ठानचे संस्थापक, भेलोशी शाळेचे सहाय्यक शिक्षक स्वर्गीय मनोज नारायण गोडांबे यांच्या ४६ व्या जन्मदिनानिमित्त वेद प्रतिष्ठान अध्यक्षा मधुरा मनोज गोडांबे यांच्या नेतृत्वाखाली शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

शिक्षक म्हणून सेवा बजावताना सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी स्वर्गीय मनोज गोडांबे यांनी २०२१ साली वेद प्रतिष्ठानची स्थापना केली. ग्रामीण भागातील विद्यार्थी वर्गाचा सर्वांगीण विकास हेच या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट्य.परंतु याच उद्दिष्ट्यपूर्तीच्या दिशेने मार्गक्रमण करत असतानाच गोडांबे यांना ७ मे २०२४ रोजी काळाने



गाठलं. परंतु या धक्क्यातून सावरत त्यांच्या पत्नी मधुरा गोडांबे यांनी ही सामाजिक बांधिलकीची ज्योत अखंडपणे तेवत ठेवण्याचा दृढनिश्चय केला. आणि स्वर्गीय मनोज गोडांबे यांचे कार्य, इच्छाशक्ती त्यांच्या पश्चातही अशा विविध सामाजिक उपक्रमांतून जिवंत ठेवली आहे.

या कार्यक्रमाप्रसंगी भेलोशी पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष इनायतखान देशमुख, सचिव नारायण गोडांबे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रमेश राणे, शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र बनसोडे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक भूषण ढगे, ज्येष्ठ ग्रामस्थ विठोबा रेवाळे, दगडू रेवाळे, आत्माराम शेंडल, महादेव धारशे, नथुराम बैकर, मधुरा गोडांबे यांच्यासह वेद प्रतिष्ठान, मनोज दादा मित्र मंडळ सदस्य, शिक्षक यांच्यासह विद्यार्थी व पालकवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

यादरम्यान निलेश गोडांबे, जितेंद्र रेवाळे, संतोष राणे, संदेश राणे, संतोष यादव, प्रतीक यादव, संदेश रेवाळे, शांताराम गोडांबे, अमित यादव, नंदू राणे, प्रसाद सकपाळ, अंकुश गोडांबे, राजेश गोडांबे, दिनेश गोडांबे, प्रणित पवार, प्रफुल्ल पवार, वेद गोडांबे, परी गोडांबे, विधी गोडांबे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

# 'टीएमसी'त रक्तदान शिबीर



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रक्तदान हे जीवनदान व सर्वश्रेष्ठ दान असून आपल्या रक्ताच्या एका थेंबाने एखाद्याचा जीव वाचू शकतो ही समाजसेवी भावना नजरेसमोर ठेवून माणगाव येथील शैक्षणिक क्षेत्रातील अग्रगण्य नाव असणारे जे.बी. सावंत एज्युकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगाव यांच्यावतीने शासकीय रुग्णालय अलिबाग रक्तपेढी यांच्या सहकार्याने गुरुवार, दि.२० नोव्हेंबर रोजी टिएमसी कॉलेज माणगाव येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराला राज्याचे माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई, जे.बी. सावंत एज्युकेशन संस्थेचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत, महाविद्यालयीन विकास कमिटीचे सभासद रामदास पुराणिक, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दिपक देशमुख, पहल संस्थेच्या मॅनेजर मीनाक्षी सबनीस, रक्त संक्रमण तंत्रज्ञ मनीषा नवाले आदी मान्यवरांनी भेट देऊन कौतुक केले. त्यांच्यासह सर्व रक्तदात्यांचे कॉलेजच्या प्राचार्या डॉ.अमृता देशमुख, सर्व शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारीवृंद व विद्यार्थी यांनी स्वागत केले.

# मायणी शाळेला शैक्षणिक साहित्याची भेट

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

गुंज सामाजिक संस्था, मुंबई यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मायनी पेण या शाळेला शैक्षणिक साहित्याचा संच भेट म्हणून देण्यात आला. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाला मोठा हातभार लाभणार आहे.

शाळेमध्ये आयोजित विशेष कार्यक्रमास गुंज सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी आनंद खरे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अंजनाताई पवार, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेच्या प्रतिनिधींनी गुंज सामाजिक संस्थेचे उद्दिष्ट, विविध सामाजिक उपक्रम आणि शिक्षण क्षेत्रातील कामकाज याविषयी मनोगत व्यक्त केले. सामाजिक बांधिलकीतून सुरू केलेले कार्य

**गुंज संस्थेची सामाजिक बांधिलकी**



असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सक्षमतेकडे पाऊल ठरावे, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.यावेळी विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन्स, पेन्सिली, ड्रॉइंग साहित्य, शैक्षणिक चार्ट्स, गणित व विज्ञान शिकवणीसाठी लागणारे साहित्य, खेळण्यांचे साहित्य अशा वर्षभर पुरेल इतक्या शैक्षणिक साहित्याचे संच विद्यार्थ्यांना देण्यात आले. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेला नक्कीच चालना मिळेल, असा विश्वास मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक अमित महागावकर यांनी, तर आभार मंगेश पाटील यांनी मानले. या उपक्रमामुळे मायणी शाळेला 'साहित्यसंपन्न शाळा' हा नवा आत्मविश्वास लाभल्याची भावना शिक्षक व पालकांनी व्यक्त केली.

# 'कोपरातील रेशन दुकानावर कारवाई करा'

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघर शहरातील कोपरा गावामधील रेशनिंगच्या दुकानावर कारवाई करण्याची मागणी सिद्धेश विष्णू ठाकूर यांनी पुरवठा अधिकारी पनवेल यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. खारघर सेक्टर १०, कोपरा गाव येथे रेशनिंगचे दुकान असून, त्या ठिकाणी रेशनिंगच्या धान्याची काळ्या बाजारात विक्री होत असल्याचा आरोप सिद्धेश ठाकूर यांनी केला आहे. पनवेल शहर आणि तालुक्यात एकूण रेशनिंगचे १९९ दुकाने आहेत. सर्वच ठिकाणी अशा प्रकारे रेशनिंगच्या धान्याची काळा बाजारात विक्री होत असल्याचे यानिमित्ताने समोर आले आहे. मात्र, पुरवठा अधिकारी कारवाई करत नसल्याने या दुकानदारांचे फावत असल्याचे बोलले जात आहे.

**आधुनिक तंत्रज्ञान घराघरात पोहोचवण्याचा संकल्प | नाईक-अंतुले महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा पुढाकार**

# 'महाविस्तार' ॲप शेतकऱ्यांसाठी वरदान

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

आधुनिक व वैज्ञानिक शेती पद्धती, शासनाच्या योजना आणि डिजिटल साधनांचा लाभ प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी स्वयंसेवकांची महत्त्वाची भूमिका आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने विकसित केलेल्या 'महाविस्तार' ॲपविषयी जागरूकता आणि प्रशिक्षण देण्यासाठी वसंतराव नाईक कला, वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय, म्हसळा येथील एन.एस.एस. विभाग व वनस्पती शास्त्र विभागातर्फे संयुक्तपणे





मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमातून तंत्रज्ञानाचा लाभ दुर्गम भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य दिगंबर टेकळे, मंडळ कृषी अधिकारी सुशील कुमार घोडगे, उपकृषी अधिकारी रामेश्वर मगर, सहाय्यक कृषी अधिकारी अधिराज गायकवाड, तसेच सहाय्यक कृषी अधिकारी अशोक सानप उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना माहिती देताना सांगितले की, 'महाविस्तार' हे एआय आधारित नि:शुल्क ॲप आहे, जे शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापन, खत नियोजन, हवामान मार्गदर्शन, तसेच कीडरोग नियंत्रणाबाबत अचूक आणि तात्काळ माहिती उपलब्ध करून देते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मोबाईलद्वारे ॲपचा वापर करून मार्गदर्शन घेतले. डाऊनलोड, नोंदणी, लॉगिन कसे करायचे याचे प्रात्यक्षिक करण्यात आले. ॲपमधील चा वापर करून आंबा तसेच इतर पिकांवरील कीडरोग, उपाययोजना आणि शिफारसी कशा मिळवायच्या याचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. पिकानुसार खताची मात्रा, त्यासाठीचे मार्गदर्शन आणि हवामानानुसार पिक निवड यासंबंधीची माहितीही विद्यार्थ्यांना देण्यात आली.

महाविस्तार ॲपबरोबरच कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी उपयुक्त अशा १७० पेक्षा जास्त डीबीटी कृषी योजनांची माहिती दिली. तसेच शेतीस पूरक आधुनिक तंत्रज्ञान, पद्धती आणि उपयुक्त योजनांवरही सविस्तर चर्चा झाली.

कार्यक्रमाच्या यशासाठी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. राजेंद्र हलोर व प्रा. मयुर बढे यांनी विशेष परिश्रम घेतले.

> **"विद्यार्थ्यांनी मिळवलेली माहिती स्वत:पुरती न ठेवता गावातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचवा. 'महाविस्तार' ॲपचा योग्य वापर झाल्यास हजारो शेतकऱ्यांचे जीवन बदलू शकते."**
> **- सुशील कुमार घोडगे, मंडळ कृषी अधिकारी**

**विद्यार्थ्यांचा निर्धार**

विद्यार्थ्यांनी आपल्या गावातील नागरिक, शेतकरी, महिला बचत गट आणि तरुणांपर्यंत ही माहिती पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला.




## राशीभविष्य

- **मेष** : कार्यात उत्तम प्रगती होईल. गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. उपजत कला-गुणांना वाव मिळेल.
- **वृषभ** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. बाकी चिंता नसावी.
- **मिथुन** : महत्त्वाची कामं प्रलंबित राहतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. प्रकृतीच्या तक्रारी राहतील.
- **कर्क** : नव्या योजनांना गती मिळेल. धार्मिक स्थळांची यात्रा घडेल. वैद्यकीय कारणांसाठी धावपळ होईल.
- **सिंह** : आर्थिक बाबतीत दिलासा मिळेल. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. जुनी येणी सहज वसूल होतील.
- **कन्या** : आजचा दिवस अडचणींचा राहील. नोकरीत ताण-तणाव वाढीस लागतील. प्रकृतीची काळजी घ्या.
- **तूळ** : अचानकधनलाभ संभवतो. मंगलकार्याची बोलणी सफल ठरतील. अनावश्यक खर्च टाळायला हवा.
- **वृश्चिक** : मोठे व्यवहार शक्यतो टाळावे. दिलासादायक घटना घडतील. कार्यकर्तृत्त्वाचा उचित वाव मिळेल.
- **धनु** : अर्थार्जनाचे नवे पर्याय समोर येतील. वैवाहिक सौख्य लाभेल. भागीदारी व्यवसायात लाभ होईल.
- **मकर** : वरिष्ठांची मर्जी राहील. बदली, बढतीसाठी अनुकूलता लाभेल. कोर्टाची कामं वेळीच करून घ्यावीत.
- **कुंभ** : बोलण्यातून गैरसमज संभवतात. आर्थिक अडचणी वाढत जातील. मौल्यवान वस्तुंची काळजी घ्या.
- **मीन** : मनाप्रमाणे साऱ्या गोष्टी घडतील. मानसिक स्वास्थ लाभेल. विद्यार्थ्यांची अपेक्षित प्रगती होईल.

## दिनविशेष

### २१ नोव्हेंबर

**१९६३** : सुप्रसिद्ध विनोदी लेखक चिंतामण विनायक जोशी अर्थात चिं.वि. जोशी यांचं निधन.
**१९७०** : भारतीय शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रमण यांचं निधन.
**२०१३** : 'तहेलका' साप्ताहिकाचे संपादक तरुण तेजपाल यांच्यावर महिला पत्रकाराने लैंगिक शोषण केल्याचा आरोप.
**२०१५** : मालीची राजधानी असणाऱ्या वामाको येथील पंचतारांकित हॉटेलमध्ये दोन सशस्त्र दहशतवाद्यांनी १७० नागरिकांना ओलिस ठेवले.

## आरोग्यमंत्र

### कसं ठरतं मुलगा की मुलगी?

एखादी स्त्री बाळंत होईपर्यंत नातेवाईकांच्या विशेषत: तिच्या आईच्या जीवात जीव नसतो. केव्हा एकदा मुलगा झाल्याची बातमी कानावर येते असे त्यांना झालेले असते. आपला समाज पुरूषप्रधान असल्यामुळे व मुलगा हा कुलदीपक, म्हातारपणाचा आधार वगैरे कल्पना रुजलेल्या असल्यामुळे मुलगा झाला नाही तर दुसरे लग्न करणे, बायकोला टाकून देणे अशा गोष्टी घडतात. मुलगा होणार वा मुलगी हे कसे ठरते, यामागचे शास्त्रीय कारण बघितले; तर मुलगा न होण्यात स्त्रीची काहीच चूक नसते, असे आपल्या लक्षात येईल.



मूल होण्यासाठी पुरुषांचा शुक्राणू व स्त्रीबीज यांचे मिलन होणे आवश्यक असते. यालाच गर्भधारणा असे म्हणता येईल. लिंग ठरवण्यासाठी माणसाच्या शुक्राणूत व स्त्रीबीजात लिंगसूत्रे असतात पुरुषांत एक्स व वाय ही लिंगसूत्रे, तर स्त्रीमध्ये एक्स व एक्स अशी लिंगसूत्रे असतात. पुरुषांच्या काही शुक्राणूत एक्स तर काही शुक्राणूत वाय हे लिंगसूत्र असते. सर्व स्त्रीबीजात मात्र एक्स हेच लिंगसूत्र असते. पुरुषांचे एक्स व स्त्रीचे एक्स लिंगसूत्र एकत्र आले, तर मुलगी होते. पुरुषाचे वाय व स्त्रीचे एक्स ही गुणसूत्रे एकत्र असल्यास आल्यास मुलगा होतो. अर्थात पुरुषाकडून वाय लिंगसूत्र मिळाल्याखेरीज मुलगा होऊ शकत नाही. या दृष्टीने बघायला गेल्यास मुलगा न होण्यामागे पुरुष जबाबदार असतो. स्त्रीला दोषी मानणे हे अन्यायकारक आहे. हे शास्त्रीय सत्य सर्व समाजाला माहीत होणे आवश्यक आहे. त्यामुळे स्त्रियांवर अकारण होणारे अत्याचार बंद होतील.

## सफर देशांची

### दक्षिणपूर्व आशियातला कंबोडिया

कंबोडिया हा दक्षिणपूर्व आशियातला देश आहे. कंबोडियाला कांपुचिया असंही म्हटलं जातं. खमेर ही कंबोडियाची अधिकृत भाषा, फनॉम पेन्ह ही राजधानी आहे. या देशाचा इतिहास खूप जुना आहे. अंगकोर वॅट हे इथलं जगप्रसिद्ध ठिकाण आहे. हे जगातलं सर्वात मोठं धार्मिक स्थान आहे. हिंदू आणि बौद्ध संस्कृतीचं हे केंद्र आहे. बाराव्या शतकात हे मंदिर बांधण्यात आलं होतं. तेराव्या शतकापासून या देशात बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार झाला. श्रीलंकेतून आलेल्या बौद्ध भिक्षूंमुळे इथे बौद्ध धर्म फोफावला. आज बौद्ध हा इथला अधिकृत धर्म आहे. कंबोडिया विषुववृत्तीय प्रदेशात येतो. मेकाँग ही इथली प्रमुख नदी आहे. मेकाँग नदी देशाच्या मध्यभागातून वाहते. गेल्या काही वर्षांपासून कंबोडियाची अर्थव्यवस्था वेगाने वाढते आहे. या देशाचा बराचसा भाग जंगलांनी व्यापला आहे. कंबोडियाच्या मध्यभागात भातशेती आहे. इतर पिकांचं उत्पादनही याच भागात घेतलं जातं. कौप्रे हा कंबोडियाचा राष्ट्रीय प्राणी आहे. कौप्रे ही जंगली गाय आहे. कपडे, लाकूड, रबर, भात, मासे, तंबाखू आणि पादत्राणं यांची हा देश निर्यात करतो. तर पेट्रोलियम उत्पादनं, सोनं, मशीन यांची आयात केली जाते.

## फॅशन पॅशन

### ब्रोकेडचे भन्नाट प्रकार

ब्रोकेड हे विणकाम केलेलं अत्यंत सुंदर आणि आकर्षक कापड असतं. या कापडावर विणकाम करण्यासाठी रंगीबेरंगी धाग्यांचा वापर केला जातो. सिल्क, कॉटन, पॉलिस्टरसह सोनेरी आणि चंदेरी धाग्यांचा वापरही केला जातो. मुघल काळात राजे महाराजे आणि त्यांच्या राण्या ब्रोकेडपासून तयार केलेले कपडे परिधान करत असत. म्हणून ब्रोकेडमुळे रॉयल लूक मिळवता येतो. विविध प्रसंगांसाठी ब्रोकेडच्या साड्या, सलवार कमीझ, ड्रेस कॅरी करता येतील. ब्रोकेडमध्ये आता भरपूर व्हरायटी पहायला मिळते. म्हणूनच आपला गोंधळ उडतो. ब्रोकेडचा कोणता प्रकार निवडायचा असा प्रश्न पडतो. म्हणूनच आपण ब्रोकेडच्या विविध प्रकारांची माहिती करून घेऊ या.

✲ ब्रोकेड वर्कसाठी सर्वसाधारणपणे सोनेरी आणि चंदेरी धाग्यांचा वापर केला जातो. अस्सल ब्रोकेडच्या निवडीसाठी कापडावरच्या नक्षीकामाकडे विशेष लक्ष द्यायला हवं.

✲ वेगवेगळी चित्रं असलेलं ब्रोकेड डिझाइन खूपच लोकप्रिय आहे. मुघलकालीन चित्रांनी कापड सजलेलं असतं. पदर तसंच बॉर्डरवर तशी नक्षी पहायला मिळते. हे वर्क खूप छान दिसतं. **(क्रमश:)**

## पंचांग

**शुक्रवार, २१ नोव्हेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, मार्गशीर्ष शु. १, चंद्रराशी : वृश्चिक, नक्षत्र : अनुराधा, योग : अतिगंड, सूर्योदय ६.५१ सूर्यास्त ५.५८

## फॉरवर्डस

**अब घड़ी उतार कऱ ऱख दीं हमनें...**

**वक़्त हर शख़्स क़ी औक़ात बतां रहां थां...!**

## फॅशन पॅशन

आता घरातल्या एखाद्या लग्नाची तयारी सुरू होईल. मग कॉलेजमधली स्नेहसंमेलनं आहेतच. डिसेंबरमध्ये कॉलेजमध्ये वेगवेगळे डेज असतात. त्यातही ट्रॅडिशनल डे महत्त्वाचा. या दिवशी स्वत:ची जबरदस्त छाप पाडता येते. शिवाय न्यू ईयर पार्टी आहेच. कोणत्या प्रसंगी काय कॅरी करता येईल हे जाणून घेऊ या.

✲ नेहमीचा कुर्ता-पायजमा आणि नेहरू जॅकेट हे कॉम्बिनेशन हिट आहे. पण रंगसंगतीकडे लक्ष द्या. आपल्या वर्णाला साजेशा रंगांची निवड करा. तुम्ही भाव खाऊन जाणार यात शंकाच नाही. **(क्रमश:)**

## करिअरवाटा

### ऑफबिट ऑप्शन्स

करीअरचा विचार करताना काही ऑफ बीट म्हणजेच फारशा प्रचलित नसणाऱ्या अभ्यासक्रमांची निवड करायची असेल खालील पर्यायांचा अवश्य विचार करा.



✲ ह्युमॅनिटीजचा अभ्यास ही संकल्पना आता नवीन राहिलेली नाही. पण इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये हा अभ्यासक्रम वेगळ्या रूपात आहे. सामाजिक विज्ञान, ह्युमॅनिटीज आणि नैसर्गिक विज्ञान यांच्यातली दरी कमी करण्याचा प्रयत्न संस्थेने केला आहे. मॅपिंग सायन्स, सोसायटी रिलेशनशीप आणि जर्नलिझम फॉर सायंटिस्ट्स असे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यामुळे विज्ञानाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला मदत होईल. ✲ भूकंप, पूर, त्सुनामी यांसारख्या नैसर्गिक तसंच आगीसारख्या मानवनिर्मित आपत्ती वारंवार येत असतात. या आपत्तींना समोरं जाण्यासाठी कुशल तज्ज्ञांची गरज असते. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसमध्ये डिझास्टर मॅनेजमेंट म्हणजे आपत्ती व्यवस्थापनावरचा अभ्यासक्रम आहे. ✲ नवी दिल्लीच्या श्रीराम कॉलेजमध्ये ग्लोबल बिझनेस ऑपरेशन्सचा पदवी अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमात आंतरराष्ट्रीय नातेसंबंध आणि धोरणं यांची सरमिसळ पहायला मिळते.

## खेचाखेची

### आत्मनिर्भर

आमची पोरं भाजी आणायला गेली तरी आईला दोनदा फोन करतात, अर्धा किलो आणू की एक किलो?

नेत्यांची पोरं कोट्यवधी रुपयांची जमीन खरेदी करतात अन् बापाला पत्ता पण नसतो!

याला म्हणतात आत्मनिर्भर!!!

## वेगळं काही

ब्रिटनमधल्या स्टीव्ह डॉकर्टी यांच्या घरच्या दारावर जोरात थाप पडली. त्यांनी दरवाजा उघडला तर समोर अग्निशमन दलाची टीम हजर होती. तुमच्या घरात फायर अलार्म वाजत असल्याचं त्यांनी स्टीव्ह यांना सांगितलं. आपल्या घरात आग लागली नसल्याचं त्यांनी या जवानांना सांगितलं. पण फायर अलार्म वाजत असल्याचं लक्षात आल्यानंतर स्टीव्ह सर्वांसह घरात आले. आत आल्यानंतर ही पोपटाची खोडी असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. स्टीव्हनी पाळलेला पोपट हुबेहुब फायर अलार्मचा आवाज काढत होता. हाच आवाज ऐकून अग्निशमन दलाची टीम त्यांच्या घरी पोहोचला होता. जॅझ असं या पोपटाचं नाव आहे. जॅझ हा आफ्रिकन ग्रे जातीचा पोपट आहे.

## संगोपन

### मुलांशी संवाद हवा

बरेचदा काहीही कारण नसताना मुलं खोटं बोलू लागतात. अशा परिस्थितीत पालकांनी त्यांच्याशी हळूवारपणे संवाद साधणं गरजेचं आहे. यामागील कारणंही शोधायला हवी.



✲ काही पालक मुलांना नेहमी हे करू नको, ते करू नको या पद्धतीने टोकत असतात. अशा वेळी मुलांमध्ये ते काम करून पाहण्याची उत्सुकता निर्माण होते. उत्कंठा शमवण्याचा प्रयत्न केल्यास पालक रागवतील या भीतीने मुलं खोटं बोलतात. त्यामुळे एखादी कृती चुकीची आहे हे मुलांना समजावताना ती का चुकीची आहे हे देखील सांगा. ✲ मुलांसमोर पालकांनी खोटं बोलणं टाळावं. यातून मुलाला तुमच्याबद्दल विश्वास वाटू लागतो. अशा वेळी मुलांशी मैत्री करणं सहज शक्य होतं. ✲ पालकांनी मुलांना त्यांची चूक शांत स्वरात लक्षात आणून देणं गरजेचं आहे. अशा वेळी मुलांना रागवल्यास चूक स्वीकार करण्याची शक्यता कमी असते. ✲ अनेक पालक व्यस्ततेमुळे मुलांना वेळ देऊ शकत नाहीत. अशा वेळी संवाद साधनांच्या सहाय्याने का होईना, मुलांशी सतत संवाद साधत राहणं गरजेचं आहे.

## सुडोकू ३०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ६ | | | १ | ७ | ९ | | |
| | ४ | | | ५ | | | २ | ६ |
| | ३ | | | ६ | | | | |
| ४ | २ | ८ | ७ | | १ | ६ | ५ | ३ |
| १ | | | | | | | | ९ |
| ५ | ९ | ६ | ८ | | ४ | २ | १ | ७ |
| | | | | ८ | | | ९ | |
| ९ | १ | | | ७ | | | ६ | |
| | | २ | ६ | ४ | | | ७ | ५ |

**टीप -**

✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू २९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ५ | ६ | ८ | ३ | २ | ९ | १ | ७ |
| २ | ८ | ९ | १ | ४ | ७ | ५ | ६ | ३ |
| १ | ३ | ७ | ९ | ६ | ५ | ४ | ८ | २ |
| ८ | ४ | १ | ७ | ५ | ९ | २ | ३ | ६ |
| ७ | २ | ५ | ६ | १ | ३ | ८ | ९ | ४ |
| ६ | ९ | ३ | २ | ८ | ४ | १ | ७ | ५ |
| ९ | ६ | २ | ४ | ७ | १ | ३ | ५ | ८ |
| ५ | ७ | ४ | ३ | ९ | ८ | ६ | २ | १ |
| ३ | १ | ८ | ५ | २ | ६ | ७ | ४ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ३०



**आडवे शब्द :-**
१) रीत, प्रथा
३) वर्तमानकाळाच्या पुढचा व मागचा काळ
९) जेव्हा
१०) सप्तस्वरातील पहिला
११) लेखणी
१५) देवस्थान
१७) दोरा
१८) प्रपंचाच्या फेऱ्यात सापडणे
२१) लिहिता-वाचता येणे
२४) दरवाजा
२५) सत्वांश
२७) वाळलेले
२८) घराची व्यवस्था पाहणारी
२९) मासे पकडणारा कोळी
३०) पाठवलेला
३२) उभट आकाराचे लोटी
३४) सध्या
३६) रस्ता
३८) गंध
४०) यम
४३) सं. ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४५) सगळे
४६) बंगाली भाषेत रुपाया
४८) वर्ष (ग्रा.)
४९) हुक्की, लहर
५२) सात पुत्रांची आई
५४) रखवाली करणारा
५८) द्रव्य, पैसा अडका
५९) वाईट (हिं.)
६१) माफी मागणे
६५) सवाद्य मिरवणूक
६६) बाजू, काठ
६७) त्वरित, चटकन

**उभे शब्द :-**
१) विजार
२) यावर्षी
४) जहर
५) सबब, निमित्त
६) खाण्याची तीव्र इच्छा, क्षुधा
७) समशेर
८) कार्य
१२) वेतनधारी
१३) कांद्याचे हिरवे पान
१४) पादत्राण
१५) ठाण्याचा रहिवासी
१६) अनेक कप्प्यांचा बटवा
१९) काहीही करुन (प्रसिद्धी मिळविणे
२०) अभिनेता
२२) जैन साधू
२३) चंद्र २६) सभेसाठी बांधलेला मांडव
२८) अक्षरापुढची उभी रेघ
३१) गाईचे बछडे
३३) कागद, कापडाचा ओला गोळा
३५) सैन्याचा मुक्काम, बूड
३७) जेमतेम, मोठ्या प्रयासाने
३९) सारखे प्रमाण
४१) सुमन
४२) सहा
४४) तरुणी, तारुण्याचा भर, नवी पालवी
४५) आदराने सासऱ्याचे संबोधन
४७) सरकारी नियम
५०) हात
५१) मत्सर
५३) मुलगी
५५) छोटा खड्डा
५६) निकट
५७) रक्षण करणारा ६०) गवंडी
६२) नारळाचे झाड
६३) हलणारे, विनाशी
६४) होडी

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | ष | म | ता | | व | स | न | वा | त | | उ | जे | ड |
| जा | | ह | | ध | न्य | वा | द | | दो | | दा | | फ |
| ती | र | क | मा | न | | शे | | उ | त्त | रो | त्त | र | |
| य | म | | ती | | क | र | न | क | र | | | त | रु |
| | मा | न | मो | डी | | | वा | ल | | को | म | ल | |
| घ | ण | | ल | | स | ब | ब | | वा | प | र | | खे |
| रो | | सा | | आ | | हु | | उ | द | र | | ना | ट |
| बा | र | व | | प | र | भा | रे | | वि | | स | म | र |
| | | | पा | प | | षी | | ज | वा | न | म | र्द | |
| वा | | नि | वा | र | क | | स | न | द | शी | र | | मा |
| स | ल | ग | | भा | र | वा | ह | क | | ब | | वि | ळी |
| रु | | रा | घ | व | | र्ता | | ज | ल | वा | ह | न | |
| | पा | णी | | | त | ह | | न | य | न | | व | चा |
| फा | या | | | का | ळ | र | ज | नी | | | क | णी | क |

# नववर्षाला युवा वर्ल्डकपचा धुरळा

## ।। १५ जानेवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान स्पर्धा ।। ६ फेब्रुवारीला रंगणार अंतिम सामना

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आयसीसीने २०२६ च्या १९ वर्षांखालील पुरुष विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. स्पर्धेचा १६ वा हंगाम १५ जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान खेळवण्यात येणार आहे. झिम्बाब्वे आणि नामिबिया या स्पर्धेचे आयोजन करणार असून अंतिम सामना हरारे स्पोर्ट्स क्लब येथे खेळला जाणार आहे. १६ संघ सहभागी होणार असून ज्यामध्ये झिम्बाब्वे आणि नामिबिया पहिल्यांदाच यजमानपद भूषवणार आहेत.

आयसीसीकडून बुधवारी १९ वर्षांखालील पुरुष विश्वचषकाची घोषणा करण्यात आली आहे. ज्यामध्ये एकूण १६ संघ सहभागी होणार आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे, झिम्बाब्वे आणि नामिबिया संयुक्तपणे स्पर्धेचे आयोजन करणार असून हे दोन्ही देश संयुक्तपणे जागतिक आयसीसी स्पर्धेचे आयोजन करण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे. या स्पर्धेत दोन नवीन संघ सहभागी झाले आहेत. यामध्ये टांझानिया जपान या दोन देशांचा समावेश आहे.

२०२६ च्या १९ वर्षांखालील विश्वचषकासाठी दोन नवीन संघांची निवड केली गेली आहे. टांझानिया पहिल्यांदाच या मोठ्या स्पर्धेत सहभाग नोंदवणार आहे. यापूर्वी २०२० मध्ये खेळलेला जपान देखील दुसऱ्यांदा सहभागी होणार आहे. या दोन्ही संघांच्या प्रवेशामुळे स्पर्धेची व्याप्ती आणि स्पर्धात्मकता वाढणार आहे.

२०२४ मध्या झालेल्या वर्ल्ड कप प्रमाणेच २०२६ मध्येही स्पर्धेचे स्वरुप असणर आहे. सहभागी १६ संघांना चार गटात विभागले जाणार आहे. २३ दिवसात ४१ सामने खेळवले जातील. त्यानंतर सुपर सिक्स फेरी होईल. पहिल्या फेरीनंतर चारही गटातील अव्वल तीन संघ सुपर सिक्समध्ये आल्यानंतर एकूण १२ संघ होती. या १२ संघांची सुपर सिक्समध्ये पुन्हा दोन गटात विभागणी होईल. त्यानंतर दोन्ही गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहचतील. उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीसाठी राखीव दिवस असणार आहे. ५ वेळा विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाला ग्रुप 'ए'मध्ये ठेवण्यात आले आहे.




### उपांत्य फेरीतील सामने

**३ आणि ४ फेब्रुवारी आणि अंतिम सामना ६ फेब्रुवारीला होणार आहे. हरारे स्पोर्ट्स क्लब (हरारे), ताकाशिंगा स्पोर्ट्स क्लब (हरारे), क्विन्स स्पोर्ट्स क्लब (बुलवायो), नामिबिया क्रिकेट ग्राऊंड (विंढोक) आणि एचपी ओव्हल (विंढोक) या मैदानांवर या स्पर्धेतील सामने होणार आहेत.**

### गट विभाग खालीलप्रमाणे

**गट अ– भारत, बांगलादेश, अमेरिका, न्यूझीलंड**
**गट ब– झिम्बाब्वे, पाकिस्तान, इंग्लंड, स्कॉटलंड**
**गट क– ऑस्ट्रेलिया (गतविजेता), आयर्लंड, जपान, श्रीलंका**
**गट ड – टांझानिया, वेस्ट इंडिज, अफगाणिस्तान, दक्षिण आफ्रिका**
**या स्पर्धेचा अंतिम सामना ६ फेब्रुवारी रोजी खेळला जाईल. यासाठी तयारी पूर्ण झाली आहे. गट टप्प्यानंतर, शीर्ष चार संघ बुलावायो येथे होणाऱ्या उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील.**

या ग्रुपमध्ये भारतीय संघासहित न्यूझीलँड, बांगलादेश आणि अमेरिकेच्या संघाचा समावेश आहे. या स्पर्धेचा पहिला सामना झिम्बॉब्वेमधील मैदानात भारत आणि अमेरिकेमध्ये होणार आहे.

दुसरीकडे ग्रुप 'बी'मध्ये पाकिस्तान, यजमान झिम्बॉब्वे, इंग्लंड, स्कॉटलँड या संघाचा समावेश आहे. 'सी' ग्रुपमध्ये ऑस्ट्रेलिया, आयरलँड, जपान आणि श्रीलंकेचा समावेश आहे. ग्रुप 'डी' मध्ये तंजानिया, वेस्टइंडिज, अफगाणिस्तान आणि दक्षिण आफ्रिकेचा समावेश आहे.

## मुंबई उपनगर कबड्डी असो. जिल्हा कबड्डी स्पर्धा

# स्वस्तिक मंडळाचे पूर्व विभागात चौथे जेतेपद

। मुंबई । प्रतिनिधी ।






स्वस्तिक मंडळाने मुंबई उपनगर कबड्डी असो.ने आयोजित केलेल्या ४३ व्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या पूर्व विभाग प्रथम श्रेणी पुरुषांत सलग चौथ्यांदा जेतेपद पटकवले. याच विभागात द्वितीय श्रेणी पुरुषांत हा मान शूर जवान कबड्डी संघाने मिळविला. पश्चिम विभाग महिलांत संघर्षने विजेतेपद मिळविले. गजानन मंडळ व पार्ले महोत्सव स्पोर्ट्स् अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आ. पराग आळवणी, आयोजक मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार्ले येथील प्ले-ग्राउंडवर हे सामने सुरु होते. पूर्व विभाग प्रथम श्रेणी पुरुषांच्या अंतिम फेरीत कुर्ल्याच्या स्वस्तिक मंडळाने घाटकोपरच्या ओवळी मंडळाला ३१-२४ असे नमवीत सलग चौथ्यांदा विजेत्यापदाची किमया साधली.

संयमी सुरुवात करीत स्वस्तिकने पहिल्या डावात १६-०९ अशी आघाडी घेतली. दुसऱ्या डावात आहे ती आघाडी टिकवीत जेतेपदावर शिकामोर्तब केले. अक्षय बर्डे, ऋतिक कांबळे यांच्या चढाई पकडीच्या खेळाला निलेश शिंदे या आंतर राष्ट्रीय खेळाडूच्या कुशल मार्गदर्शनाची साथ लाभल्याने हे शक्य झाले. निलेश प्रत्यक्ष मैदानात उतरला होता. ओवाळीच्या आर्यवर्धन नवाले, अलंकार पाटील यांनी उत्तरार्धात उत्कृष्ट खेळ करीत सामन्यात चुरस आणली. पण पहिल्या डावातील आघाडी त्यांना मोडून काढण्यात ते अपयशी ठरले.

पश्चिम विभाग महिलांच्या अंतिम सामन्यात गोरेगावाच्या संघर्ष मंडळाने बांद्राच्या महात्मा गांधी स्पोर्ट्स् अकादमीचा ३४-३० असा चुरशीच्या लढातीत पराभव करीत या गटाचे विजेतेपद आपल्या नावे केले.

कोमल देवकर, प्रणाली नागदेवते यांच्या संयमी व धूर्त खेळाला या विजयाचे जाते. स्नेहल चिंदरकर, करीना कामतेकर यांचा खेळ महात्मा गांधी संघाचा पराभव टाळण्यास थोडा कमी पडला. पूर्व विभाग द्वितीय श्रेणी पुरुषांच्या अंतिम सामन्यात मुलुंडच्या शूर जवान कबड्डी संघाने कुणाल पाटील, निखिल चव्हाण यांच्या झंझावाती खेळाच्या बळावर विक्रोळीच्या टागोर नगर मित्र मंडळावर ४५-२० असा लिलाया विजय मिळवीत विजेतेपदाचा चषक उंचावीला. टागोरनगरचा हर्ष शिगवण चमकला.

## निवडक

### रांजणपाडा येथे क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन



**चिरनेर :** रांजणपाडा येथील जय हनुमान क्रिकेट क्लब स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांच्या हस्ते बुधवार (दि. १९) नोव्हेंबर रोजी करण्यात आले. यावेळी जासईचे संतोष घरत, आदित्य घरत, भूषण म्हात्रे, प्रेमनाथ ठाकूर, मुरलीधर ठाकूर, संजय ठाकूर, हेमराज म्हात्रे, रमेश पाटील, राजेश ठाकूर, अंगद ठाकूर यांच्यासह रांजणपाडा ग्रामस्थ आणि क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सिल्व्हर स्टार संघाला विजेतेपद

**रत्नागिरी :** संगमेश्वर तालुक्यातील पांगरी येथे पांगरी प्रिमिअर लीग या ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धेत सिल्व्हर स्टार पांगरी संघाने विजेतेपद मिळवले. पांगरी स्ट्रायकर संघाने उपविजेतेपद मिळविले. दोन दिवसांच्या स्पर्धेत गावातील ८ संघांनी व १२७ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. उत्कृष्ट फलंदाज संदीप बावदाने, गोलंदाज व मॅन ऑफ दी सीरिज अनिकेत मुळे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अभिषेक गावडे यांनी पारितोषिके मिळवली. पांगरीत होणारी ही पांगरी प्रिमिअर लीग स्पर्धा आता गावाच्या अभिमानाचा उत्सव बनली आहे. खेळ, एकता आणि बंधुत्वाचा संदेश देणारी ही लीग गावातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरली आहे, असे यावेळी आयोजकांनी सांगितले. स्पर्धा यशस्वितेसाठी हरेश म्हादे, सेक्रेटरी ओंकार तेगडे, अमित कातकर, अजय दुडये, सल्लागार दीपक तेगडे, सुनील म्हादे, सचिन पानगले, गौरव पानगले, दीपक गावडे, अक्षय म्हादे, संजय बावदाने, शुभम गावडे, संदेश दुडये, सुरज कांबळे व सर्व कमिटी सदस्यांनी आणि ग्रामस्थांनी खुप मेहनत घेतली.

### भारतीय खेळाडूंना हिंसेचा फटका



**नवी दिल्ली :** आशियाई अजिंक्यपद स्पर्धा रद्द करण्यात आली, ही स्पर्धा झाल्यानंतर ढाकाहून घरी परतताना भारतीय तिरंदाजांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला, ज्यामुळे ते जवळजवळ १० तास विमानतळावर अडकून पडले होते. हिंसाचारग्रस्त बांगलादेशच्या राजधानीत त्यांना सुरक्षा नसलेल्या स्थानिक बसमध्ये बसवण्यात आले आणि नंतर एका निकृष्ट दर्जाच्या आश्रयस्थानात राहण्यास भाग पाडण्यात आले. भारताच्या २३ सदस्यांच्या पथकातील अकरा सदस्य, ज्यात दोन अल्पवयीन मुले आहेत, वारंवार होणाऱ्या उड्डाण विलंबामुळे त्रस्त झाले होते. दरम्यान, त्यांनी ज्या विमान कंपनीकडून तिकिटे बुक केली होती त्या विमान कंपनीकडून त्यांना फारसा पाठिंबा मिळाला नाही. पथकात ज्येष्ठ खेळाडू अभिषेक वर्मा, ज्योती सुरेखा आणि ऑलिंपियन धीरज बोम्मदेवरा यांचा समावेश होता. ते शनिवारी रात्री ९:३० वाजता दिल्लीला जाणाऱ्या विमानासाठी ढाका विमानतळावर पोहोचले, परंतु विमानात चढल्यानंतर त्यांना सांगण्यात आले की विमानात तांत्रिक बिघाड झाला आहे आणि ते उड्डाण करू शकणार नाही. हा असा काळ होता जेव्हा ढाकामध्ये रस्त्यावर हिंसाचार झाला. कारण विशेष न्यायाधिकरणाने पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांच्याविरुद्ध निकालाची वाट पाहत होते.

# पीएनपीच्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

। अलिबाग । प्रतिनिधी ।




क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२५/२०२६ चे आयोजन करण्यात आले होते.

विविध स्पर्धांमध्ये पीएनपी होली चाईल्ड स्कूल वेश्वी अलिबाग शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. लोकगीत स्पर्धेत मनस्वी मळेकर, मनस्वी सावंत, भार्गवी पाटील यांनी सहभाग घेवून तृतीय क्रमांक पटकावला तर कथा लेखन, चित्रकला स्पर्धेत विवेक दास याने तृतीय क्रमांक पटकावला.

या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, होली चाईल्ड एसएससी बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले व उपमुख्याध्यापिका शर्मिला शेटे ,क्रीडा मार्गदर्शक अक्षय डाकी, कला शिक्षक विनय पाटील व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# राज्य टेनिस क्रिकेट संघात अंकुर

**चिपळूण :** तालुक्यातील नारदखेरकी बौद्धवाडी येथील अंकुर हुमरे याची उत्तरप्रदेश मथुरा येथे होणाऱ्या ९व्या टेनिस क्रिकेट नॅशनल चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या टेनिस क्रिकेट संघात निवड झाली आहे. चिपळूण आणि त्याच्या गावासाठी ही अभिमानाची बाब आहे. अंकुरला लहानपणापासूनच खेळाची आवड आहे. त्याने शालेय स्पर्धांमध्येही उत्तम कामगिरी केली होती. नारदखेरकी गावच्या सन्मानात अंकुरच्या निवडीमुळे भर पडली आहे.

# अर्जुनचे आव्हान संपुष्टात

। पणजी । वृत्तसंस्था ।

भारताचा अव्वल मानांकित बुद्धिबळपटू अर्जुन एरिगेसी याला टायब्रेक फेरीत भक्कम व्यूहरचना राखणे शक्य झाले नाही, त्याचा लाभ उठवत चीनचा ग्रँडमास्टर वेई यी याने उपांत्य फेरी गाठली. या पराभवाने यजमानांचे फिडे विश्वकरंडक बुद्धिबळ स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. उत्तर गोव्यातील हडफडे येथे सुरू असलेल्या या स्पर्धेतील उपांत्यपूर्व फेरीतील दोन्ही क्लासिकल डाव बरोबरीत राहिल्यानंतर गुरुवारी अर्जुन व वेई टायब्रेक फेरीत आमनेसामने आले. अर्जुनने काळ्या मोहऱ्यांसह खेळताना पहिल्या टायब्रेक डावात फ्रेंच बचावाचा अवलंब केले. डावाच्या मध्यास तो अडचणीत होता, मात्र चिनी खेळाडूने २६ व्या चालीत चूक केली, त्यामुळे अर्जुनला सावरण्याची संधी मिळाली व अखेरीस डाव ६६ व्या चालीत बरोबरीत राहिला. दुसऱ्या डावात अर्जुन पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळत होता. वेई याचा पेत्रोव बचाव भेदण्याचा भारतीय ग्रँडमास्टरने प्रयत्न केला, पण चिनी खेळाडूने रणनीती बदलली नाही. आव्हान राखण्यासाठी अर्जुनने कसोशीने प्रयत्न केले, परंतु ७९ व्या चालीत अर्जुनचा पराभव निश्चित झाला आणि त्याला माघार घेणे भाग पडले.

# रियाने जिंकले जलतरणात तीन सुवर्ण

। कोल्हापुर । प्रतिनिधी ।



कोल्हापुरातील पॅरा स्विमर रिया पाटीलने २५ व्या राष्ट्रीय पॅरा स्विमिंग स्पर्धेत केलेल्या अभूतपूर्व कामगिरीमुळं कोल्हापूरचा गौरव वाढवला आहे. १५ ते १८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान या स्पर्धा हैदराबाद इथे पार पडल्या होत्या, ज्यात रियाने तीन जलतरण प्रकारात सुवर्णपदके जिंकली आहेत. यामध्ये १०० मीटर फ्री स्टाईल, ५० मीटर फ्री स्टाईल आणि ५० मीटर बॅकस्ट्रोकच्या स्पर्धांचा समावेश आहे. कोल्हापुरची पॅरा स्विमर रिया पाटील सेलिब्रल पाल्सी या आजाराने ग्रस्त असूनही जलतरण क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर सुवर्णपदक जिंकणारी एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व ठरली आहे. सेरेब्रल पाल्सी सारख्या गंभीर शारीरिक आव्हानांना तोंड देत असूनही, रियानं आपल्या कठोर मेहनतीने आणि अविरत प्रयत्नांनी जलतरणाच्या क्षेत्रात नवे कीर्तिमान स्थापित केलं आहे.

हैदराबाद इथे पार पडलेल्या २५व्या पॅरा नॅशनल स्विमिंग चॅम्पियनशिपमध्ये कोल्हापूरच्या रिया पाटीलने ड-५ ज्युनिअर कॅटेगरीमध्ये पहिल्या दिवशी १०० मीटर फ्री स्टाईल आणि ५० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये सुवर्णपदक प्राप्त करत कोल्हापूरचा मान उंचावला आहे. या स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी रियाने १०० मीटर फ्री स्टाईलमध्ये कमाल कामगिरी करून प्रथम सुवर्ण पदक जिंकले, यामध्ये तिने पोहण्यासाठी केवळ ३.१२ मिनिटं वेळ घेतला. त्यानंतर तिने ५० मीटर बॅकस्ट्रोक मध्ये सलग दुसऱ्या सुवर्ण पदकाची कामगिरी करत आपले जलतरण कौशल्य सिद्ध केले आहे.

# मुंबईचा पुद्दुचेरीवर डावाने मात

### ■ सिद्धेश लाड ठरला सामनावीर

। मुंबई । प्रतिनिधी ।



मुंबईच्या क्रिकेट संघाने पुद्दुचेरी संघावर एक डाव व २२२ धावांनी दणदणीत विजय संपादन करीत रणजी क्रिकेट करंडकातील 'ड' गटामध्ये सात गुणांची कमाई केली. मुंबईचा संघ आता पाच सामन्यांमधून तीन विजयांसह २४ गुणांसह पहिल्या स्थानावर विराजमान आहे. पुद्दुचेरी संघाला पाच सामन्यांमधून पाचच गुणांची कमाई करता आलेली आहे. १७० धावांची खेळी साकारणारा सिद्धेश लाड सामनावीर ठरला.

मुंबईच्या संघाने पहिल्या डावात ६३० धावा फटकावल्यानंतर डाव घोषित केला. मुंबई संघातील गोलंदाजांनी प्रभावी कामगिरी करीत पुद्दुचेरी संघाचा पहिला डाव १३२ धावांवर गुंडाळला. त्यानंतर त्यांना फॉलोऑन देण्यात आला. पुद्दुचेरी संघाने दुसऱ्या डावात तिसऱ्या दिवसअखेरीस सहा बाद २३१ धावा केल्या होत्या.

पुद्दुचेरी संघाने दुसऱ्या डावात तिसऱ्या दिवसअखेरीस ४५ षटके खेळून काढली होती. बुधवारी त्यांनी फक्त ८.३ षटके फलंदाजी केली. यादरम्यान, त्यांचे उर्वरित चार फलंदाज झटपट बाद झाले. पुद्दुचेरी संघाला दुसऱ्या डावात २७६ धावांपर्यंत मजल मारता आली. अमन खान ८६ धावांवर बाद झाला होता. सिद्धांत अदाटराव व जयंत यादव यांनी थोडीफार झुंज दिली. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले नाही. अर्थात मुंबईकडून उभारण्यात आलेला धावांचा डोंगर मोठा होता. पुद्दुचेरी संघासमोर खडतर आव्हान होते. सिद्धांत अदाटराव याने ५४ धावांची व जयंत यादवने ३२ धावांची खेळी केली. मुंबईकडून तुषार देशपांडेने ३२ धावा देत तीन फलंदाज बाद केले. शार्दुल ठाकूर व शम्स मुलानी यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. दुसऱ्या स्थानीमुंबईच्या संघाने ड गटामध्ये २४ गुणांसह पहिले स्थान पटकावले असून, जम्मू-काश्मीरच्या संघानेही या गटामधून चमकदार खेळ केला आहे. जम्मू-काश्मीर संघाने पाच सामन्यांमधून तीन विजयांसह २० गुणांची कमाई केली असून, त्यांचा संघ दुसऱ्या स्थानावर आहे. जम्मू-काश्मीर संघाने हैदराबादचा २८१ धावांनी धुव्वा उडवला आहे.

# कुराकाओ फीफासाठी पात्र

**नवी दिल्ली :** जगातला सर्वात कमी लोकसंख्येच्या देशांपैकी एक असलेल्या कुराकाओनं इतिहास घडवलाय. कॅरेबियन बेटांतील एक बेट असलेल्या कुराकाओ देश फीफा वर्ल्ड कप २०२६ साठी पात्र ठरला आहे. अवघी दीड लाख लोकसंख्या असलेला देश फीफा वर्ल्ड कपसाठी पात्र ठरण्याची ही पहिलीच घटना आहे. पात्रता फेरीत ग्रुप 'बी' मध्ये कुराकाओ टॉपवर होता. संघाचे १२ गुण असून जमैकापेक्षा १ गुण जास्त होता. तर ग्रुपमध्ये त्रिनिदाद अँड टोबॅगो तिसऱ्या स्थानी आहे. तर बर्म्युडा अजूनही खातं उघडू शकलेला नाही. किंग्स्टनमध्ये पात्रता फेरीत झालेल्या सामन्यात कुराकाओनं यजमान जमैकाला ०-० असे रोखत इतिहास घडवला. पसाठी पात्र ठरल्यानंतर देशात जल्लोष साजरा केला जात आहे.

## खुल्या वयोगटात 30 किमी अंतर पार | मालपे जेट्टी ते विजयदुर्ग जेट्टी ७ तासांत पूर्ण

# सात वर्षांच्या साराने रचला इतिहास



। अलिबाग । प्रतिनिधी ।

दुर्गामाता कला क्रीडा मंडळ आयोजित राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धा शनिवारी (दि.१५) नोव्हेंबर रोजी ऐतिहासिक विजयदुर्ग येथे पार पडली. मालपे जेट्टी ते वाघोटन बंदर आणि विजयदुर्ग किल्ला असा १५ आणि ३० किमीचा सागरी जलप्रवास या स्पर्धेत पार केला आहे.

या स्पर्धेत अलिबाग येथील सात वर्षांची सारा अभिजीत वर्तक हिने विजयदुर्ग येथील समुद्री जलतरण स्पर्धेत खुल्या वयोगटामध्ये सहभागी होऊन मालपे जेट्टी ते विजयदुर्ग जेट्टी असा ३० किमीचा समुद्रमार्ग फक्त ७ तासांत पूर्ण करून विक्रम रचला आहे.

तिचा पहिलाच समुद्री पोहण्याचा स्पर्धात्मक प्रयत्न होता, ज्यामध्ये अनेक अनुभवी पोहणारेही उतरायला घाबरतात. जोरदार भरती-ओहोटी, बदलणारे समुद्री प्रवाह आणि सलग अनेक तास पाण्यात पोहण्याचे आव्हान स्वीकारत साराने विलक्षण जिद्द, सहनशक्ती आणि मानसिक ताकद दाखवली आहे.

सारा कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी येथे कोच किशोर पाटील, रुग्वेद पाटील आणि सूरज लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेते. तिचे प्रशिक्षक म्हणतात की, सारा अत्यंत शिस्तबद्ध, निडर आणि मेहनती असून तिचा हा विक्रम महाराष्ट्रातील तरुण पोहणाऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे. साराचे आई-वडील वैष्णवी आणि अभिजीत वर्तक यांनी मुलीचा हा पराक्रम पाहताना मोठी भावना व्यक्त केली.

सारा नेहमीच जिद्दी आहे, पण तिने इतक्या कठीण समुद्री मार्गावर इतक्या आत्मविश्वासाने विजय मिळवताना पाहणे आमच्यासाठी खूप भावूक करणारे होते, असे त्यांनी सांगितले आहे.

गेल्या दोन वर्षांत साराने जिल्हा, राज्य आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक स्पर्धांमध्ये सहभाग घेतला असून तिने अनेक पदके जिंकली आहेत. तिच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे तिच्या प्रति भेची सर्वत्र दखल घेतली जात आहे.

१५ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या तिच्या या ऐतिहासिक कामगिरीनंतर क्रीडा संस्था आणि रायगडमधील स्थानिक नागरिकांनी सारावर अभिनंदनांचा वर्षाव केला आहे. अनेकांनी तिला महाराष्ट्रातील उदयोन्मुख पोहणाऱ्या खेळाडूंपैकी एक म्हणून गौरवले आहे.कठोर परिश्रम, उत्कृष्ट प्रशिक्षण आणि कुटुंबाचे दृढ पाठबळ यामुळे सारा वर्तकचे जलतरणातील भविष्य अत्यंत उज्वल असल्याचे सर्वांनी व्यक्त केले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)